# **अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

जा.क्र.अम / सका - ०३/ २०१८.
महानगरपालिका सचिव कार्यालय.
दिनांक : २५/०७/२०१८.

अहमदनगर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेची सुचना

( महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण - २ नियम क्र.१ (अ) अन्वये )

**सभा सुचना क्रमांक ०३, गुरुवार दिनांक ०२ / ०८ /२०१८.**

प्रति,
मा.श्री. / श्रीमती............................................

सदस्य,
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

महोदय,

यांस.-

याद्वारे कळविण्यांत येते की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण २ नियम क्र. १ ( अ ) अन्वये मा.महापौर यांनी अहमदनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा **गुरुवार दिनांक ०२/०८/२०१८ रोजी दुपारी १.०० वाजता अहमदनगर महानगरपालिकेचे नविन प्रशासकीय इमारत (राजमाता जिजाऊ सभागृह) औरंगाबाद रोड, अहमदनगर** सोबतच्या विषय पत्रिकेतील कामकाज चालविण्यांसाठी आयोजित केली आहे.

आपणांस सभेस उपस्थित राहण्यांची विनंती करण्यांत येत आहे.

**सोबत :** १. विषय पत्रिका
२. प्रस्तावांची टिप्पणी
३. दिनांक ३०/१२/२०१७, २६/०२/२०१८, २८/०३/२०१८, रोजीचे मागील इतिवृत्त कायम करणे बाबत...

प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

सभा क्रमांक - ३ गुरुवार दिनांक ०२ / ०८ / २०१८ रोजी दुपारी १.०० वाजता **(राजमाता जिजाऊ सभागृह) औरंगाबाद रोड, अहमदनगर येथे** होणा-या सर्वसाधारण सभेची विषय पत्रिका.

| विषय क्र. | विषय |
|---|---|
| ०५ | मागील दिनांक ३०/१२/२०१७, २६/०२/२०१८, २८/०३/२०१८ रोजीच्या सभेचे इतिवृत्त कायम करणे बाबत. |
| ०६ | दुखवटयाचे प्रस्ताव |
| ०७ | कल्याण-अहमदनगर-नांदेड (जुना एनएच-२२२) या रस्त्यावर उड्डाणपुल बांधणेसाठी भुसंपादन करणे बाबत..<br>संदर्भ :- १) अहमदनगर महानगरपालिकेचे पत्र क्र.साप्रवि-पीए-८८४ दि.१२/३/१८<br>२) प्रकल्प संचालक,एनएचएआय यांचे कडील पत्र क्र.१५० दिनांक २५/०४/२०१८. |
| ०८ | नालेगांव स.नं.१२ या जमिनीतून जाणारा मंजूर विकास योजना (वाढीव हद्द) अहमदनगर मधील नियोजीत १५ मी.रुंदीचा विकास योजना रस्ता वगळणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना १९६६ मधील कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही करणे बाबत...<br>संदर्भ :- १) श्री.व्यंकटेश सह.गृह.निर्माण संस्थेचे सभासद २३/०८/२०१८<br>२) सौ.सुवर्णा दत्ता जाधव स्थायी समिती सभापती, ३) मा.सुनिता दत्तात्रय मुदगल उपसभापती, ४) मा.श्री.संजय छगनराव शेंडगे, गटनेता, शिवसेना |
| ०९ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील पथदिव्यांचे देखभाल व दुरुस्ती बाबत...<br>संदर्भ :- दिनांक २७/०३/२०१८ रोजी महापौर, पदाधिकारी,नगरसेवक व संबंधीत प्रतिनीधींसमवेत झालेली बैठक. |
| १० | अहमदनगर महानगरपालिकेच्या हद्दीतील लक्ष्मी कारंजा ते आझाद चौक (प्रवरा बँक) या मार्गास **" डॉ.गोपाळ मिरीकर मार्ग "** असे नामकरण करणे बाबत... |
| ११ | अहमदनगर महानगरपालिका स्थायी समितीने नेहरु मार्केट बाबतचा सभा क्रमांक ६ विषय क्रमांक ६९ दिनांक २०/०२/२०१६ रोजी पारीत केलेला ठराव अंतिमतः विखंडीत झाले व तद्नंतर घ्यावयाच्या धोरणा बाबत<br>संदर्भ :- मा.शासन निर्णय क्र.अमपा २०१६/प्र.क्र.४०६/नवि-२५ दिनांक १२ जुन २०१७ चे पत्र. |
| १२ | मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज |

मा.महापौर सो, यांचे मान्यतेने.
दिनांक : २५/०७/२०१८

प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक :- ०५** **दिनांक : ०२/०८/२०१८.**

---

**प्रस्तावाचा विषय :-** मागील दिनांक ३०/१२/२०१७, २६/०२/२०१८, २८/०३/२०१८ रोजीच्या सभेचे इतिवृत्त कायम करणे बाबत.

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

मागील दिनांक ३०/१२/२०१७, २६/०२/२०१८, २८/०३/२०१८ रोजीच्या सभेचे इतिवृत्त कायम करणे बाबत.

**चर्चा :-**

**गुरुवार दिनांक ०२/०८/२०१८ वेळ दुपारी १.००वाजता सर्वसाधारण सभा इतिवृत्त**

**मा.श्री.किशोर डागवाले :-** चौपाटी कारंजा येथील भाजपाचे कार्यालय सील करण्यात आले त्याचा आम्ही धिक्कार करतो. भारतीय जनता पार्टीची बदनामी यामुळे झालेली आहे. संबंधितांवर आपण काय कारवाई करणार. ज्याच्या नावे जागा आहे त्याला नोटीस न देता दरवाजावर नोटीस चिकटविण्यात आली.

**श्री.अंबादास सोनवणे :-** मी ५-१० मिनीटात माहिती घेवून सांगतो.

**मा.महापौर मॅडम :-** माहिती घेवून देतात.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** मागील इतिवृत्तापूर्वी दुखवटयाचा प्रस्ताव यायला पाहीजे होता तुम्हीच अजेंडा पाठविला.

**नगरसचिव :-** टायपिस्ट कडून विषय खालीवर झाला आहे.

दुखवटयाचे प्रस्तावाचे वाचन करण्यात आले.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** काकासाहेब शिंदे याने मराठा आरक्षणासाठी त्याग केला त्याबद्दल माझेतर्फे मी श्रंध्दांजली वाहतो.

**मा.श्री.अभिषेक कळमकर :-** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे माजी अध्यक्ष आपल्या सभागृहातील उत्कृष्ठ सदस्य कैलास गिरवले यांचे दु:खद निधन झाले मराठा असोसिएशनचे अध्यक्ष होते. महानगरपालिकेतील विविध प्रश्नावर बाहेर देखील ज्या ज्या वेळी या नगरशहरातील जनतेवर अन्याय झाला असेल अशा वेळी रात्री बेरात्री त्यांनी सहकार्य केले. आमच्या सारख्या तरुण सदस्यांना त्यांनी मार्गदर्शन केले. समाज कारणात व राजकारणात त्यांचे जाण्यामुळे पोकळी निर्माण झाली आहे ती कधीही भरुन निघणारी नाही.

शहर राष्ट्रवादी कॉग्रेसच्या वतीने भावपुर्ण श्रध्दांजली व्यक्त करतो.

**मा.श्री.अभय आगरकर :-** गेल्या काही दिवसामध्ये अनेक जण आपल्यातुन निघुन गेले त्यापैकी डॉ.जयंत निसळ हे निष्णात डॉक्टर होते तसा शहरात प्रामाणिकपणे रुग्णसेवेचे ऋण जोपासले डी.एम.मुळे अर्बन बँकेचे ते सदस्य होते. चष्माचे व्यापारी म्हणुन नामांकित होते. बाळासाहेब पवार कार्यकर्ते गरजूंसाठी धावणारा कार्यकर्ता होता. ज्यांच्या बरोबर मी पहिल्यापासून काम केले असे माझे मित्र कै.कैलास मामा गिरवले आज येथील सभागृहात आले तर त्यांची आठवण आल्या शिवाय रहात नाही. माणूस कसा होता हे गेल्यानंतर कळते. दोस्ती करण्यालायक माणूस होता दोस्ती करणारा एक व्यक्ती म्हणून सर्वसदस्यांना मान्य आहे. कोहीनूर क्लॉथ स्टोअरचे मालक श्री.वसंतशेठ गांधी यांचे सामाजिक क्षेत्रातील योगदानाचा विशेष उल्लेख करावा लागेल. आनंदऋषीजी हॉस्पीटलला देणगी देणारे तसेच कापड व्यावसायात नावलौकीक असलेले यांचेही नावाचा समावेश करण्यांत यावा. राष्ट्रसंत भय्यूजी महाराज, मा.खासदार पांडुरंगजी फुंडकर यांचा राजकीय

प्रवास पाहीला तर एक धडाडीचे व्यक्तीमत्व भारतीय जनता पार्टीचे माजी प्रदेशाध्यक्ष, शेत मजुरांचे नेतृत्व त्यांनी उभे केले. धान्ये पिकविणारा शेतकरी यामध्ये त्यांचा नावलौकीक होता. त्यांना श्रध्दांजली अर्पण करतो.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** या सभागृहाला कैलास मामा गिरवले या सभागृहाने हुशार सदस्य गमावला याचे सर्वांना दु:ख होते. माझे ते साडूभाऊ ते एका पक्षात व मी एका पक्षात होतो. मामाचे अनेक प्रसंग सांगावेसे वाटतात कपिलेश्वर मित्र मंडळाचे वतीने जनतेसाठी देखावे उपलब्ध करुन देत असत. त्यांचे प्रेरणेने मी जनजागृती मित्र मंडळ स्थापन केले मला त्यांनी मार्गदर्शन केले. एका विशेष नावाने मला आव्हान द्यायचे स्थानिक चौकात काय आरास करायची यावर आमची चर्चा होत असे. आमचे नाते जवळचे होते. जिवाभावाचा मित्र होता. चांगला सभागृहाचा सदस्य गमावला गेला आहे. माझे परिवराचे वतीने व शिवसेनेच्या वतीने श्रध्दांजली वाहतो.

**मा.श्री.गणेश कवडे :-** या सभागृहाचे माजी सदस्य नालेगांव येथील रहिवासी ॲड.लक्ष्मण वाडेकर हे राजकारण व समाजकारणातील बहुमूल्य व्यक्तीमत्व होते. त्यांचे जाण्याने आपण पोरके झालो आहोत. तसेच या सभागृहाचे सदस्य कैलास मामा गिरवले यांचे जाण्याने आपण सर्वजण पोरके झालो आहोत. ते सतत हसतमुख असायचे. मामांनी संपुर्ण नगर शहरासाठी तसेच मराठा समाजासाठी खूप मोठे योगदान दिले त्यांच्यामुळे मराठा क्रांती मोर्चा यशस्वी झाला त्यांना मी भावपुर्ण आदरांजली अर्पण करतो. मराठा क्रांती मोर्चाचे काकासाहेब शिंदे यांचे आत्म्यास भावपुर्ण श्रंध्दांजली अर्पण करतो त्यांचे बलीदान व्यर्थ जाणार नाही. छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल अनुदगार काढणारे जर या सभागृहात उपस्थित राहणार असतील तर आम्ही सभागृह चालू देणार नाही.

श्रीपाद छिंदम यांचे सभागृहात आगमन व त्यांनी मा.महापौर यांना इतिवृत्तातील त्यांचे पद रद्द करणेबाबतच्या प्रस्तावास विरोधाबाबत वेळ दुपारी १.३० वाजता एकपत्र सादर केले

**मा.श्री.अनिल शिंदे :-** छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल अनुदगार काढले त्या व्यक्तीने या सभागृहात महापौर यांना निवेदन दिले. महापौर ताई तुम्ही ते का स्विकारले त्यांचे तोंडावर फेकायला पाहीजे होते.

**मा.श्री.अभिषेक कळमकर :-** प्रशासनाचे प्रमुख यांची भूमिका पहायची होती. पोलीस प्रशासन याठिकाणी उपस्थित आहे.

**मा.महापौर मॅडम :-** ते अचानक या ठिकाणी आले.

**मा.श्री.अभय आगरकर :-** सभागृहात जो पिठासीन अधिकारी असतो त्यांचा अधिकार आहे. काही अलिखीत अधिकार आहेत. एखाद्याला जर रजेचा अर्ज द्यायचा असेल तर तो देवू शकतो. पिठासीन अधिकारी ते स्विकारु शकतात. सभागृहाच्या भावना तिव्र आहे. आपण प्रशासनास सांगावे. या सभागृहात त्यांना एंटरटेन करण्याच कुठलही काम नाही. आपल्या अधिकारात आपण जे केले ते ठीक आहे.

**मा.श्री.अभिषेक कळमकर :-** आजची सभा ही दुखवटयाचे प्रस्तावावर भाषण होवू द्या आयुक्तांनी पोलीस प्रशासनाशी चर्चा करायला पाहीजे सभागृहाचे समोर तीन-तीन पिंजरे उभे असतील व प्रशासन म्हणत असेल आम्हाला माहित नाही. दुखवटयाचे प्रस्तावावर भाषण झाल्यावर सभा आज तहकुब करा व उद्या सभा घ्या.

**मा.श्री.गणेश कवडे :-** दुखवटयाचे प्रस्ताव वाचन झाल्यावर सभा पुन्हा सुरु करा.

**मा.श्री.गणेश भोसले :-** त्यांनी माझे समोर ठेवले. मी ते स्विकारले नाही.

**मा.श्री.अभिषेक कळमकर :-** जर आयुक्तांनी आदेश दिले असते.

**मा.श्री.गणेश कवडे :-** नगरसचिव यांनी मार्गदर्शन करावे तो आला कसा.

**नगरसचिव :-** छिंदम सद्यस्थितीत महानगरपालिकेचे सन्माननीय सदस्य आहेत.

**मा.श्री.सुनिल कोतकर :-** महापौरांचे येण्याच्या मार्गातुन तो आला कसा.

**मा.सौ.मालनताई ढोणे :-** बाहेर तीन तीन पिंजरे असतांना तो इथे आला कसा.

**मा.श्री.गणेश भोसले :-** मा.कैलासमामा गिरवले गेल्याचे दु:ख आपणा सर्वांना झाले आहे. गेल्या ५-६ वर्षात दररोज आम्ही बरोबर असायचो. दुपारचे जेवण बरोबर करायचो दिलदार दोस्त होते तसेच दिलदार दुश्मन होते. जिवाला जीव देणारा माणूस होता. कधीही कोणाची अडचण आली तर नाही म्हणत नव्हता आमचा मित्र जिवाचा भाउ होता. आमची गेल्या दिडऐक वर्षापासून मैत्री होती मामांना फिरण्याचा शौक होता. कधीही नविन ठिकाण पाहायचे, नविन कल्पना ते घडवायच्या. पालिकेचा त्यांना दांडगा अभ्यास होता. कलम नियमांचा त्यांचा अभ्यास होता. बोर्डाला आम्ही बरोबर यायचो इतक्या वर्षाचा संबंध मनातुन जाणार नाही. ते दिलखुलास माणूस होते. त्यांची इच्छाशक्ती तीव्र होती. हॉस्पीटलमध्ये आम्ही भेटण्यासाठी गेलो तेंव्हाही ते काही बोलले नाही. स्वत:च दु:ख कोणाला कधी काही सांगीतले नाही. सभागृहाचा एक चांगला नगरसेवक व एक चांगला मित्र गेला. त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो हीच मी ईश्वरचरणी प्रार्थना करतो.

**मा.श्री.किशोर डागवाले :-** मा.महापौर, सन्माननीय सभागृह मामांवर बोलायला शब्द अपुरे पडतील भाजपा युवा मोर्चात काम करायला सुरुवात केली तेंव्हापासुन ते कपिलेश्वर मंडळाची स्थापना पर्यंतचा प्रवास आपणास माहिती आहे. फटाका व्यापा-यांना एकत्र आणून फटाका असोसिएशन स्थापन केले. भारतातल्या व्यापा-यांनी येवून इथला फटाका असोसिएशनचे काम पाहीले असे उत्कृष्ट काम त्यांनी केले. कपिलेश्वर मंडळाचे आरास सुध्दा उत्कृष्ठ उभी करायचे. दुस-यांना बक्षीस मिळण्यासाठी त्यांनी पुढील वर्षी आमचे मंडळ या स्पर्धेत सहभागी होणार नाही. दुस-यांना बक्षीस मिळण्यासाठी त्यांनी ही भूमिका घेतली. आज आपण त्यांच्या जाण्याने चांगला मित्र सभागृहाचा अभ्यासू नगरसेवक गेल्याने सर्व गणेश मंडळ व भाजपाच्या वतीने भावपूर्ण आदरांजली अर्पण करतो.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** आम्ही नवीन सदस्य आमच्या नवीन सदस्यांना सभागृहात बोलायला लागलो की, आम्हाला विरोध व्हायचा पण मामांच्या मार्गदर्शनाने आम्ही बोलू शकलो. मामा गेल्याने आमची मोठी हानी झाली विषयाची ते चिरफाड करत असायचे प्रत्येक वेळेस मामांनी दाखवून दिले. प्रत्येक चुकीच्या गोष्टीला सभागृहात विरोधच केला. गणेश भोसले व डागवाले यांना जशी मामांची साथ होती. तशीच आम्हाला मामा नसले तरी आपणांकडून ती आहे. मराठा समाजाचे आंदोलन अनेक घटना घडल्या त्या सर्वांना देखील श्रध्दांजली.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** लहानपणापासून आम्ही एकत्र होतो. चांगला मित्र गेला प्रमोद कांबळे यांना उभे करण्याचे काम मामांनी केले. कपिलेश्वर मंडळाच्या माध्यमातुन प्रमोद कांबळे सारखा कलाकार उत्पन्न झाला सभागृहाचे नुकसान झाले आहे. आमच्या मित्राला मी श्रध्दांजली अर्पण करतो.

**मा.श्री.गणेश भोसले :-** त्यांना खरोखर श्रंध्दाजली अर्पण करायची असेल तर शहरात छत्रपती संभाजी महाराजांचा मोठा पुतळा आपण उभारला पाहीजे.

**मा.सौ.सुवर्णा जाधव :-** मनसेचे जेष्ठ मार्गदर्शक होते. मनसेच्या वतीने, सर्व महिला संघटनेच्या वतीने व जाधव कुटुंब व माळीवाडयाच्या वतीने मी भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करते. अहमदनगर कॅन्टीनचे मालक विद्यासागर दळवी यांचे दु:खद निधन झाले त्यांचे नावाचा दुखवटयाचे प्रस्तावात समावेश करण्यांत यावा.

**मा.श्री.संजय घुले :-** छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल अपशब्द काढणारा सभागृहात आला. तो सभागृहात आला रजिष्टरवर त्यांची सही केली. आमच्या त्या रजिष्टर वरील सही खोडा आम्ही या कामकाजात सहभागी होवू इच्छीत नाही.

**मा.महापौर मॅडम :-** आजची सभा तहकुब करुन उद्या शनिवार दिनांक ०४/०८/२०१८ रोजी दुपारी १.०० वाजता घेण्यांत येईल.

दिनांक ०४/०१/२०१८ रोजी मा.महासभेचे कामकाज पुन्हा दुपारी १.०० वाजता सुरु

**श्री.अंबादास सोनवणे :-** काल पंडीत दिनदयाळ प्रतिष्ठान या प्रॉपर्टीला सील लावले. संबंधीत संस्थेला २,३६,७८९/- रक्कमेचे सन २०१८-२०१९ या वर्षीचे बील दिले होते. दिनांक २३/०५/२०१८ रोजी मुदतीमध्ये पैसे भरण्याकरीता जप्तीपूर्वची नोटीस दिली. १५ दिवस होवून गेल्यानंतर कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. प्रकरण नियम ८४२ अ नुसार कर आकारणीची प्रकरण २ मधील मिळकतीवर प्रक्रीया नोटीसवर सही आहे. नाव लिहिलेले नाही. पंचनामाची प्रत व फोटो काढुन सर्व कार्यवाही करण्यांत आली होती.

**मा.श्री.किशोर डागवाले :-** तुमच्याकडे कोणताच पुरावा नाही. पंचनाम्याची प्रत दाखवा.

**मा.महापौर मॅडम :-** कारवाई बाबत सर्व व्यवस्थीत सभागृहाला माहिती द्या. नायर साहेबांना बोलवा व माहिती द्यायला सांगा.

**मा.श्री.किशोर डागवाले :-** २ लाखाच्या पुढच्या ज्या ज्या प्रॉपर्टी असतील त्यांची यादी द्या.

**मा.महापौर मॅडम :-** नायर साहेबांना बोलविण्यास सांगीतले आहे. विषयांचे वाचन करण्यांत यावे.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** सभागृहात जे आता निवेदन आपणास दिले ते सभागृहास कळू द्या. त्यांची मागणी काय आहे.

सभागृहात निवेदन वाचन करण्यात आले.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** नायर साहेबांची नियुक्ती जिल्हाधिकारी तथा आयुक्त यांनी त्यांचे प्रभाग अधिकारी म्हणून नेमणूक केली असल्याचे सांगीतले. थकबाकीदारावर कारवाई व्हायला पाहीजे. प्रोसेस संदर्भात सभागृहाला माहिती पाहीजे बाकीच्या झोनमध्ये कारवाई चालू आहे का. कायद्याच्या चौकटीत असून कारवाई व्हायला पाहीजे कालपासून माहिती उपलब्ध करुन द्यायला सांगीतले. आपल्याला निवेदन दिले. उत्तर कोण देणार. आयुक्तांनी वालगुडे साो ना प्राधिकृत केले का. इथे सभागृहा तुम्ही चालवता त्यांना परवानगी दिली का.

**अति.आयुक्त श्री.वालगुडे साो :-** जिल्हाधिकारी तथा आयुक्त अहमदनगर महानगरपालिका यांनी बैठकीला उपस्थित राहणे बाबत कळविले आहे. तत्कालीन आयुक्त यांनी प्रशासकीय कामकाजात आयुक्त यांचे गैरहजेरीत अतिरिक्त आयुक्त यांनी आयुक्त म्हणुन कामकाज पार पाडणे बाबत स्टॅण्डींग ऑर्डर पारीत केल्या आहे. आज मा.जिल्हाधिकारी तथा आयुक्त यांची मा.मुख्यमंत्री महोदय यांचेसोबत व्ही.सी. आहे. त्यामुळे आयुक्त साहेबांनी आजचे सभेला उपस्थित राहणे बाबत तोंडी सूचना दिल्या आहेत.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** नायर साहेबांनी एखाद्या संस्थेवर कारवाई करतांना कायदेशीर चौकटीत राहून करायला पाहीजे. आम्ही जे बोलतो ते कायद्याने बोलता. त्यांची थकबाकी कधीपासून आहे. जिल्हापरिषद, पोलीस अधिक्षक, शासकीय ऑफिसेसकडे थकबाकी आहे. कारवाई करतांना भेदभाव करणे शोभनीय नाही. आपल्या उपायुक्त चव्हाणसाहेबांना भर रस्त्यावर अर्वाच्च भाषा कोणत्या पदाधिकारी यांनी वापरली. नियमात तरतुद करुन कारवाई करा.

**अतिक्रमण विभाग प्रमुख :-** चारही प्रभागामध्ये ही कारवाई होत असते. मागील आढावा बैठकीत सूचना प्रमाणे कारवाई चालू आहे.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** ती कारवाई कशी कायदेशीर ते सांगा. ती कायदेशीर कशी.

**मा.सौ.दिपाली बारस्कर :-** पंचनामे, सर्व्हे कसे झाले हे अधिका-यांनी सांगावे.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** नायर साहेबांची नियुक्ती कशी योग्य व ही कारवाई कायदेशीर कशी.

**अति.आयुक्त श्री.वालगुडे सो :-** सर्व प्रभागात जप्तीची कारवाई चालू आहे. जप्तीपूर्व नोटीस दिल्यानंतर वॉरंट काढले जाते. प्रत्येकाला टार्गेट मा.आयुक्तांनी दिलेले आहे. वसुलीचे प्रमाण अत्यल्प असल्यामुळे टार्गेट दिले आहे.

संबंधीत कर अधिक्षक कारवाई बाबत माहिती देतील शास्ती माफी मध्ये आपण वारंवार सुट दिली. या पर्टिक्युलर केसमध्ये कारवाई कशी आली. हे संबंधीत कर्मचारी देतील.

**अति.आयुक्त श्री.वालगुडे सो :-** नायर साहेबांची नियुक्ती जिल्हाधिकारी सो यांनी त्यांचे अधिकारात केली आहे. त्यांना अधिकार आहेत. त्याची प्रत कार्यालयात उपलब्ध आहे.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** ती आदेशाची प्रत सभागृहात दाखवा.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** ॲटोमॅटीक चार्ज तुमच्याकडे कसा येतो.

**अति.आयुक्त श्री.वालगुडे सो :-** आयुक्तांनी या सभेला उपस्थीत रहा असे तोंडी आदेश दिलेले आहे. कुलकर्णी सो यांनी आयुक्तांचे अनुपस्थितीत अति.आयुक्त हे आयुक्तांचे वतीने कामकाज पाहतील असे आदेश आहेत.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** पिण्याच्या पाण्याच्या प्रश्नासाठी मी आंदोलन घेवून आपणांकडे आलो तेंव्हा आपण या निवेदनावर मी निर्णय देवू शकत नाही असे म्हणाले होते.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** प्रशासकीय कामकाजाबद्दल स्टॅण्डींग ऑर्डर आहे. शासकीय काम करण्या संदर्भात ते आदेश आहेत.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** उद्या या सभागृहावर काही ठराव झाला ही जबाबदारी नाकारु शकतात म्हणून मी हा प्रश्न केला तर काय करणार.

**मा.महापौर मॅडम :-** विषयांतर होत आहे.

**नगरसचिव :-** वालगुडे साहेब अतिरिक्त आयुक्त असून निवड श्रेणीचे अधिकारी आहेत. आयुक्त साहेबांची खुर्ची त्यांनी सांभाळली म्हणजे त्यांची जबाबदारी निश्चित होते. आस्थापना विभाग प्रमुख यांनी मा.जिल्हाधिकारी यांचेकडील आदेश ९ जुलै २०१८ याचे वाचन केले. या आदेशान्वये प्राजित प्रभाकर नायर यांची महानगरपालिकेकडे प्रभाग अधिकारी म्हणुन नियुक्ती केली त्यानंतर १२ जुलै २०१८ रोजी मा.आयुक्त यांनी आदेश काढले.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** महानगरपालिकेच्या आस्थापनेवर हे पद आहे का.

**आस्थापना प्रमुख श्री.लहारे :-** पगार गव्हर्नमेंट कडून मिळतो.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** महानगरपालिकेच्या प्रभाग अधिकारी यांचे पगार कोण देतो.

**आस्थापना प्रमुख श्री.लहारे :-** महानगरपालिका पगार देते.

आस्थापना पगार देत नाही. मग जबाबदारी कशी निश्चित होते. त्यांना आपल्याकडे कामकाज पाहण्यासाठी आदेश आहेत. भविष्यात अडचणी येवू शकते. ट्रेनिंग वाल्यास असे कारवाईचे अधिकार नाही. कारवाईवर त्यांची सही आहे का.

**आस्थापना प्रमुख श्री.लहारे :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ७२ ब नुसार आयुक्तांनी प्रभाग अधिकारी यांची नेमणूक केली आहे.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** त्यांना सह्याचे अधिकार आहेत का. कायदा काय सांगतो. आस्थापना प्रमुख यांनी अधिकार दिले आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ७२ ब हे नायर यांना लागू होत नाही. महानगरपालिकेच्या सिनिरीटी लिस्ट मधील कर्मचा-यांना लागू होतो.

**आस्थापना प्रमुख श्री.लहारे :-** आयुक्तांनी उपायुक्त कावरे मॅडमलाही अधिकार दिले आहेत.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** आयुक्तांनी एखादी चुकीची ऑर्डर काढली ती अधिकारायची का ट्रेनी म्हणुन ते कामकाज करु शकतात. तुम्ही पैसे का भरले.

**मा.श्री.किशोर डागवाले :-** देण आपल्याला होते पण दिलेली कारवाई चुकीची होती. रक्कम बीलावर आहे. वेबसाईटचा डिक्लेर केलेल्या सर्वांवर कारवाई करा.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** ट्रेनी अधिकारी हे प्रशासनाच्या कागदपत्रावर सह्याही करतात. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ७२ ब त्यांना लागू होत नाही.

**मा.महापौर मॅडम :-** विषयपत्रिकेवरील विषयांचे वाचन करण्यांत यावे.

विषय वाचन केले.

मागील सभा दिनांक ३०/१२/२०१७, २६/०२/२०१८, २८/०३/२०१८ रोजीच्या सभांचे इतिवृत्त कायम करणे

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** प्रस्ताव क्रमांक ३३, ३६, २८ वाचुन दाखवा.

ठराव वाचून दाखविण्यांत आले.

प्रस्ताव क्रमांक ३३ दिनांक ३०/१२/२०१७ वाचन करण्यांत आला.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** तसेच उत्तर महापौर किंवा प्रशासनाने द्यावे. नगरसचिव यांनी उत्तर द्यावे. तसेच प्रशासन मान्यता देणार का.

**नगरसचिव :-** महासभा सर्वोच्च आहे.महासभेने महानगरपालिकेच्या हिताविरुध्द निर्णय घेतल्यास कलम ४५१ खाली सदरचा ठराव विखंडीत करण्यासाठी मा.राज्य शासनाकडे पाठविता येतो. कलम ४५१ चे वाचन केले.

**अति.आयुक्त श्री.वालगुडे साो :-** तसेच आलेले विषय कारवाई करु नये.

महासभा दुरुस्ती करु शकते. यापुर्वी दुरुस्ती केली आहे. दुरुस्ती करायची किंवा नाही हे महासभा ठरु शकते. वस्तुस्थिती सांगण्याचा अधिकार मला आहे. महासभा सर्वोच्च आहे. मागील स्थायी समितीमध्ये एक विषय आला होता. स्थायी समितीमध्ये तो विषय मान्य न करता ठराव मंजूर केला आहे. जर हा ठराव कायद्याच्या चौकटीत बसत नसेल तर आयुक्तांच्या अधिकारात ४५१ खाली पाठवू शकतो. मा.महासभा यामध्ये सर्वोच्च आहे. कायम करतांना दुरुस्ती करु शकता. ठरावास मान्यता दिल्यानंतर तो नियमानुसार नसेल तर तो आयुक्तांच्या अधिकारात विखंडीत करण्यासाठी मा.शासनाकडे पाठवू शकतो. ठराव झाल्यानंतर आयुक्त निर्णय घेतील.

**मा.श्री.संजय घुले :-** त्या विषयापुरता नामंजूर करा.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** संबंधीत ठेकेदाराला पैसे अदा केले. मग ठराव झाला नसतांना १.५ कोटी दिले याला जबाबदार कोण इतिवृत्त कायम न होता ठेकेदाराला पैसे दिले याला जबाबदार कोण.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** इतिवृत्त मंजूर झाल्यानंतर त्यावर देयक दिले असते तर कोणतीही हरकत नाही. इतकी घाई का केली.

**मा.श्री.शेख नजीर अ.रज्जाक :-** चाँद सुलताना समोर खासदार गांधी घरासमोर पार्किंगचा प्रस्ताव आहे. रात्री १२.०० पर्यंत शाळा चालते प्रा.शाळा हायस्कुल चालते ते पार्किंग रद्द करावे.

**मा.श्री.सुवेंद्र गांधी :-** नगर शहरातील  बाजार पेठेत बाहेर गावाहुन येणा-या व्यापा-यांच्या वाहनासाठी पार्किंग व्यवस्था केली आहे. पार्किंग झोन विखंडीत करावा.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** अर्थसंकल्पाच्या सभेत काही सदस्यांनी आपणा समक्ष दिले. मागील सुध्दा इतिवृत्त तपासा व सगळे विखंडीत पाठवा एखाद्या सदस्याने जर पत्र दिले व बजेट मध्ये तरतुद करायची राहीली तर आपण ती करतो ७.२५ कोटीचे पुलाचे टेंडर आहे. ३ स्लॅब पडते. आणखी ३ स्लॅब पडलेले आहे.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** शहर अभियंता यांनी माहिती द्यावी वर्क ऑर्डर केंव्हा दिली.

**शहर अभियंता :-**  सीना नदीवरील पुलाची रक्कम रुपये ३.३८ लाख अदा केले आहे.  मार्च २०१७ पर्यंत कामाची मुदत होती.  मुदतवाढ २०१८ पर्यंत दिलेली आहे. पुलाचे निविदा रक्कम ६.१२ लाख आहे. ठेकेदाराला आतापर्यंत ३ कोटी ३८ लाख अदा केले आहेत.

**मा.अति.आयुक्त श्री.वालगुडे साहेब :-**  इतिवृत्त मंजूर करणे किंवा दुरुस्त करणे महासभा सर्वोच्च आहे. अधिकारी वैयक्तीक मत आपले देत नाही.  तसेच जो नियमानुसार नसेल तर विखंडीत करण्याचा अधिकार मा.आयुक्तांना आहे. प्रशासनाने ठराव मान्य करा किंवा अमान्य करा. हे या ठिकाणी सूचवू शकत नाही हा महासभेचा सर्वोच्च अधिकार आहे.

**मा.अति.आयुक्त श्री.वालगुडे साहेब :-**  ३ कोटी २८ लाख बील अदा केले आहे.

**मा.श्री.अभिषेक कळमकर :-** बील काढण्यासाठी कोणाचा दबाव होता का ?

**शहर अभियंता :-** सीना नदी पुल ६ कोटी १२ लाख निविदा.

आमच्या विभागाकडून बील लेखा विभागाकडे सादर केले पीएमसी ने बीलाचे मोजमाप घेवून लेखा विभागाने निधीच्या उपलब्धते प्रमाणे व सिनियॉरिटी नुसार देयक अदा करणेची कार्यवाही केली.

**मा.श्री.संजय घुले :-** ठराव मंजूर नसतांना बिलाची रक्कम एवढया घाईने कसे अदा केले.  कोणी सांगीतले.

**मा.श्री.अभिषेक कळमकर :-** कॅफो फाईल गेल्यानंतर इतिवृत्त मंजूर नसतांना बील अदा कसे केले फाईल आपण तपासली का ?

**मुख्यलेखाधिकारी :-** श्री.प्रविण मानकर यांनी आपला परिचय करुन दिला. २६/०५/२०१८ ला महानगरपालिकेत रुजू झालो. फाईल प्रथमतः पहावी लागेल. बजेट महासभेत सादर करण्यांत आले होते. प्रस्ताव क्रमाक ४२ मधील ठरावाचे वाचन केले.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** दिनांक ३०/१२/२०१७ ची सभा बजेटची होती का. बजेटच्या सभेचा विषय नाही.

**नगरसचिव :-** बजेटची सभा नव्हती.

**मा.श्री.अभिषेक कळमकर :-** इतिवृत्तामध्ये सदस्यांनी जर आक्षेप नोंदवला तर ठराव पारीत केला जातो का.

**नगरसचिव :-** मा.महासभा सर्वोच्च असते. पिठासीन अधिकारी ठराव करतात. अखेरचा शब्द नियमानुसार पुढील कार्यवाही करावा असा ठरावात शेवटी उल्लेख असतो. इतिवृत्त मा.महासभेसमोर ठेवले बहुमताने एखादा ठराव रद्द केला तर पिठासीन अधिकारी निर्णय घेवू शकतात.

**अति.आयुक्त श्री.वालगुडे साहेब :-** या कामामधील कुठल्याही कामाचे बील काढले नाही. "तसेच" चा निर्णय मा.महासभेने घ्यायचा आहे.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** अर्थसंकल्पीय सभेत मा.महापौर यांना कुठली कामे घ्यायची याबाबतचे अधिकार दिले आहेत.

**मा.श्री.गणेश कवडे :-** विषय मंजूर करुन टाका. त्यांचा विरोध नोंदवून घ्या.

**मा.महापौर मॅडम :-** इतिवृत्त मंजूर.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** ३१ कामे कोणत्या दलित वस्तीतील घेतली.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** मा.महापौर यांना अधिकार दिले आहेत.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** "तसेच" मध्ये जर विषय घेतले तर विषय मंजूर होतो का.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** मुख्यलेखाधिकारी पुल पाहायला गेले होते का. छोटया छोटया कामांना त्रास देतात. साईड इन्स्पेक्शनचा शेरा मारतात. रसिक कोठारी काय यांचा जावई आहे का.

**मा.श्री.अभिषेक कळमकर :-** तसेच हा शब्द कसा आला याचे अगोदर उत्तर द्या.

**मुख्यलेखाधिकारी :-** कुठल्याही जागेची पाहणी करण्याचे अधिकार मला नाही. मी पाहणी केली नाही. पथदिवे घोटाळया नंतर पथदिव्यांची बिले थकली होती. मा.जिल्हाधिकारी तथा आयुक्त यांचे आदेशान्वये ती बीले द्या पण तत्पूर्वी कामाची समक्ष पाहणी करा असे आहेत. कोणत्याही बीलावर मी शेरा मारत नाही.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** जे काम प्रस्तावित केले त्या इलेक्ट्रीक कामावर कोणीही सही करायला तयार नाही.

**मा.श्री.शेख नजीर अ.रज्जाक :-** इथापे यांचे जागी दुसरा नेमा.

**मा.महापौर मॅडम :-** या संदर्भात मी जिल्हाधिकारी यांचेशी बोलले आहे.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** मागील इतिवृत्त कायम करण्याचा विषय आला. झालेला विषय वाचून दाखविणे. याच्यात विरोध नोंदविता येत नाही दुरुस्ती करता येत नाही असे सभागृहाचे नियम आहेत. त्याला मतदानावर टाका. इतिवृत्त तुम्ही का कॅन्सल करता त्यावर ऑर्डर होईल. कलेक्टरांनी पैसे का दिले. अजेंडयावरचा विषय नव्हता. पुल उभारण्याचा विषय केंव्हा मंजूर झाला. सदर कामाची वर्क ऑर्डर दोन वर्षा पुर्वीची होती. निधी अपुरा पडला व काम पूर्ण व्हावे. दलित वस्तीचा निधी आला त्या कामाला वापरता येते असे शासनाचे आदेश आहे. दलित वस्तीच्या निधीवरील व्याज वापरता येते हे शासनाचे परिपत्रक असतांना दिले आहे. मागे अनेक कामात असे पैसे दिले आहेत. ४५१ खाली केंव्हा जाते. संस्थेच्या हिता विरुध्द असेल तर ४५१ खाली जाते. मग प्रत्येक विषय ४५१ खाली पाठवा. सभा कामकाजाचे नियम आहेत. पैसे देता येत नाही असे नाही. मुलभूत मध्ये पैसे कमी पडत होते त्यावेळीही ५ कोटी वर्ग केले. व्याजाचे पैसे दिले.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** त्याच कामावर पैसे द्यायचे असे प्रधान सचिव यांचे पत्र आहे. लोखंडी पुल दळणवळणाचा पुल असल्याने मा.मुख्यमंत्री महोदयांनी देखील पत्र दिले आहे. मा.राज्य शासनाने मंजूरी दिली आहे.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** दलित वस्तीकरीता आलेल्या निधीचा २०१३ ला ठराव झाला. दलित वस्ती निधीचे १ कोटी रुपये वळविले. दलित वस्तीतील लोकांवर अन्याय झाला आहे. हडको मध्ये सुध्दा मागे ३ कोटी रुपये वापरले. अजेंडयावर विषय का आणत नाही. कायद्याप्रमाणे सभागृहाची मंजूरी घ्या. स्टॅडींग मध्ये दाखवले का हे पैसे वापरले म्हणुन कॅफोंनी दाखवले का. बी.पी.एम.सी ॲक्टमध्ये तरतुद आहे. केलेला आर्थिक व्यवहार स्थायी समितीला अवलोकन करणे गरजेचे आहे ते केले का. यापुढे एक ठराव करा विषय पत्रिकेवरील विषयच घेण्यात यावेत. यामध्ये बदल करता येत नाही.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** दलित वस्तीमधील ३१ कामांची यादी वाचून दाखवा.

**शहर अभियंता :-** ही यादी उपायुक्त यांची सही होवून आयुक्तांकडे सादर केलेल्या फाईल मध्ये आहे.

दिनांक ०३/०८/२०१८ रोजीचे सभेतील चर्चेत भारतीय जनता पार्टी कार्यालय सील केले बाबत झालेल्या चर्चेनुसार श्री.प्राजीत नायर, प्रभाग अधिकारी तथा प्रशिक्षणार्थी जिल्हाधिकारी यांनी कारवाई पार पाडल्याने त्यांना सभागृहात माहिती देण्यासाठी उपस्थित राहणे बाबत मा.महापौर यांनी दिलेल्या सूचनेनुसार प्रभाग अधिकारी श्री.प्राजीत नायर हे दिनांक ०६/०८/२०१८ रोजीच्या सभेत उपस्थित राहीले व माहिती दिली.

**प्रभाग अधिकारी श्री.प्राजीत नायर :-** थकबाकी दारास नोटीस डोअरवर चिकटविली. कर निरीक्षक यांची त्यावर सही आहे. माझे येणे आगोदर ही कारवाई झाली आहे.
फोटो काढलेला आहे. पण डेलीट झाला आहे.

**मा.श्री.किशोर डागवाले :-** साक्षीदार म्हणून पंचनाम्यावर सहया नाहीत फोटो डेलीट झाले म्हणुन सांगतात ही दिशाभुल आहे. यांच्याकडे शुटींग नाही. ज्याने हे खोटे काम केले त्याच्यावर कार्यवाही करा.

**प्रभाग अधिकारी श्री.प्राजीत नायर :-** एप्रिलला आपल्याकडे ७५ टक्के शास्ती माफी केली. त्यावेळी मागणी केली. आपण रक्कम भरली नाही. ५० टक्के शास्ती माफी कालावधीत मागणी केली त्यावेळीही आपण रक्कम भरली नाही. माझी कारवाई नियमानुसार केली आहे. मी लावलेल्या सीलचे शुटींग आहे.

**मा.श्री.किशोर डागवाले :-** जप्तीची नोटीस मिळालीच नाही. तुम्ही डायरेक्ट सील केले. दरवाजाला चिकटविली त्याची शुटींग द्या. पंचनाम्यावर स्वाक्षरी नाही.

प्रभाग अधिकारी श्री.प्राजीत नायर :- ज्यांची थकबाकी २ लाखाचे वर आहे त्यांच्याकडे मी गेलो. फक्त तुम्हाला टारगेट केले असे नाही. वसुली वॉर्ड क्रमांक ८ मध्ये रक्कम रुपये एक लाखा वरील थकबाकी असलेली कुळे ८० आहेत. ८० पैकी ४ लोकांवर कारवाई केली आहे.

**मा.श्री.विक्रम राठोड :-** आज किती सील केले.

**प्रभाग अधिकारी श्री.प्राजीत नायर :-** तीन दिवसापुर्वी २४ सीलींग केले. काल मी दोन कारवाया केल्या. मोबाईल टॉवर सील केले.

**मा.श्री.किशोर डागवाले :-** जप्तीची कारवाई करायच्या अगोदर नोटीस द्यायला पाहीजे होती.

**मा.महापौर मॅडम :-** नायर साहेब माहिती घेतील ते कलेक्टर साहेबांशी बोलतील जे दोषी कर्मचारी असतील त्यांचेवर कारवाई होईल.

**मा.श्री.किशोर डागवाले :-** रक्कम रुपये एक लाखावरील थकबाकीदार ८० प्रॉपर्टीची यादी आम्हाला मिळावी

**मा.श्री.दिप चव्हाण :-** नोटीस वर सही कोणाची. पाचव्या महिन्यात नोटीस काढली. नोटीस द्यायचे अधिकार आयुक्तांना किंवा आयुक्तांनी अधिकार प्रदान केलेल्या अधिका-यास आहेत. नोटीस बेकायदेशीर आहे का ? तर आमच्या कर्मचा-यांवर ऑब्जेक्शन घ्या.

**मा.श्री.अभय आगरकर :-** तुम्ही यात कसुर केली असेल, कामकाजात गल्लत केली असेल तर शासन भोगावे लागेल. नियमाच्या बाहेर जावुन कारवाई केली असेल तर कारवाईस सामोरे जावे लागेल.

**मा.महापौर मॅडम :-** सर्व माहिती घ्या व त्यानंतर कारवाई करा. अशा सूचना मी दिल्या आहेत. दोषी नसेल तर कारवाई होणार नाही. डायरेक्ट कारवाई होणार नाही.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** बेकायदेशीर कारवाई केली असेल तर कारवाई करा. तुम्हाला आयुक्तांची ऑर्डर आहे त्या प्रमाणे तुम्ही काम करता. २००५ पासुन थकबाकी आहे. कुठलाही कसुर नसतांना जर छोटया कर्मचा-यावर कारवाई केली तर मी उपोषणास बसेल.

**मा.श्री.दिलीप सातपुते :-** अशी दुर्देवी घटना घडायला नको. केडगांव मधील ५० हजारांच्या पुढील थकबाकी दारांचे नळ कनेक्शन तोडले त्यांची परिस्थिती नसल्यामुळे ते कनेक्शन जोडुन घेवू शकत नाही. भाजपा कार्यालयाकडे थकबाकी किती आहे.

**प्रभाग अधिकारी श्री.प्राजीत नायर :-** दोन चेक व्दारे थकबाकीची संपूर्ण रक्कम मिळाली आहे.

**मा.महापौर मॅडम :-** विषय पत्रिकेवरील विषय घ्या. इतिवृत्त दुरुस्तीसह कायम करणेंत येत आहे.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** प्रस्ताव क्रमांक ४० दिनांक २६/०२/२०१८ मध्ये श्रीपाद छिंदम यांचे नगरसेवक पद रद्द करणे बाबत चर्चेनुसार छत्रपती शिवाजी महाराज यांचे पुर्णाकृती पुतळयास मंजूरी दिली. त्यावर प्रशासनाने काय कार्यवाही केली.

**उपअभियंता श्री.बल्लाळ :-** छत्रपती शिवाजी महाराज पुतळया बाबत जो ठराव केला त्या ठरावानंतर प्रत्यक्ष जागेवर मा.महापौर, सहाय्यक संचालक नगररचना, व पदाधिकारी यांचे समवेत जागा पाहणी केली. मंजूरी स्तरावरची कार्यवाही नगररचना विभागाने करावयाची आहे. नगररचना विभागाने प्रस्ताव पुन्हा बांधकाम विभागाकडे पाठविला आहे. बांधकाम विभागाने पुन्हा नगररचना विभागाकडे पाठविला नगररचना विभागाकडून कार्यवाही होणे अपेक्षीत आहे.

दिनांक २६/०२/२०१६ ला ठराव झाला ५ महिने झाले तरी आत्तापर्यंत क्ले (प्रतिकृती) मंजूरीसाठी ठेवावी लागते. त्यावर अद्याप कार्यवाही झालेली नाही. नगररचना विभागाने माहिती द्यावी.

**सहा.नगररचनाकार श्री. जोशी :-** पुतळा उभारणे साठी दिनांक ०२ मे २०१७ रोजी मा.शासनाने परिपत्रक काढले आहे. त्यानुसार या प्रशासकीय इमारतीत पुतळयासाठी जागा निश्चीत केली आहे. संभाजी महाराजांचा पुतळा उभारणे संदर्भात यापुर्वी महानगरपालिकेने कारवाई केलेली आहे परंतु गृह विभागाने अजुन परवानगी दिलेली नाही. तत्वतः मंजूरी घेवून मगच कार्यवाही करावी. असे सहाय्यक संचालक यांचे मत असल्याने त्यावर कार्यवाही झालेली नाही. सहाय्यक संचालक, नगररचना यांचेकडे नगररचना विभागाचा अतिरिक्त पदभार आहे त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज पुतळा बसविण्यास स्थान निश्चीत केले आहे. असे पत्र बांधकाम विभागास दिले आहे.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** खाजगी जागेत पुतळा उभारणेस मा.शासनाची मंजूरी लागत नाही. जिल्हाधिकारी यांचे स्तरावर मंजूरी घ्यावी लागते.

**मा.श्री.संजय घुले :-** कलेक्टर साहेबांकडे फाईल आजही पेंडींग आहे. गृह विभागाचा गैरसमज झाला महानगरपालिकेच्या जागेत पुतळा प्रस्तावित केला व्यवस्थीत प्रेझेंटेशन त्यांना न झाल्याने गैरसमज झाला आहे. तातडीने कलेक्टर साहेबांशी चर्चा करुन फाईलवर स्वाक्षरी घ्या.

**श्री.बल्लाळ, उपअभियंता :-** संभाजी महाराज पुतळयासाठी चिप आर्किटेक्ट यांची मंजूरी आली आहे. एस.पी.ऑफिसची एन.ओ.सी मिळालेली नाही. एस.पी.ऑफिसच्या मतानुसार रस्तावर पुतळा बसवायचा नाही. आजुबाजुच्या परिसरात रहदारीला अडथळा निर्माण होवू शकतो. एस.पी.साहेबांकडे या विषयावर पदाधिका-यांचे स्तरावर चर्चा झाल्यास मार्ग निघू शकेल.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयाची परवानगी घ्यावयाचे काम नगररचना विभागाचे काम आहे.

**श्री.जोशी सहा.नगररचनाकार :-** सहाय्यक संचालक नगररचना विभाग जा.क्र. ३९६९ बांधकाम विभागास कळविले आहे. महानगरपालिकेचे कोणतेही स्ट्रक्चर किंवा इमारत उभारण्याचे काम बांधकाम विभागाकडुन होत असते. स्थान निश्चिती करुन देण्याचे काम आम्ही केले आहे.

**शहर अभियंता श्री.सोनटक्के :-** स्ट्रक्चर उभारण्याचे काम आमचे आहे. त्यापुर्वीच्या परवानग्या घेण्याचे काम नगररचना विभागाचे आहे. यापुर्वी परवानग्या नगररचना विभागाने आणल्या आहेत.

**मा.महापौर मॅडम :-** पाटील साहेबांना सांगा परवानग्या घ्यायच्या असतील त्या लवकर घ्या व छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बसविणे बाबत कार्यवाही करा.

**मा.श्री.गणेश कवडे :-** या संदर्भात मा.जिल्हाधिकारी साो यांचेशी चर्चा करु.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** परवानगीसाठी पुर्ण वेळ एखादा कर्मचारी नेमा व एक महिन्याचे आंत कार्यवाही करा.

**मा.श्री.सचिन जाधव :-** उपायुक्त दर्जाचा अधिकारी नेमा.

**मा.महापौर मॅडम :-** उपायुक्त व पाटील साहेब, जोशी साहेब पाहतील.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** पुतळयासाठी कमिटी गठीत करा.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** बील अदा करावयाचे, आम्ही सर्वजण वर्गणी करुन देवू. जागेच्या परवानगीस मा.जिल्हाधिकारी साो यांचे परवानगीची गरज नाही. पुतळयाच्या ड्रॉईंगचे प्रेझेंटेशन सभागृहात सादर करा. सर्वांच्या सहमतीने पुतळयाचे ड्राईंग निश्चित करु.

**श्री.बल्लाळ उपअभियंता :-** राष्ट्र पुरुषांचे पुतळे उभारणे संदर्भात मार्गदर्शक तत्वांचे, शासन निर्णयाचे वाचन करण्यांत आले.

**मा.श्री.गणेश कवडे :-** छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा आपल्या जागेत बसवायचा आहे. मा.जिल्हाधिकारी साो यांचे परवानगीची गरज नाही.

**मा.अति.आयुक्त श्री.वालगुडे :-** क्ले मॉडेलला मान्यता घेवूनच पुतळा बसवावा लागतो. मा.जिल्हाधिकारी साो यांची परवानगी घ्यावीच लागेल. क्ले मॉडेलला सुध्दा परवानगी घ्यावी लागेल.

**श्री.बल्लाळ उप अभियंता :-** पहिला ठराव झाला परंतु निधीची तरतुद नव्हती. यावर्षी ५० लाख तरतुद बजेटच्या ठरावात केली आहे.

**मुख्यलेखाधिकारी श्री.मानकर :-** परवानगी नसतांना बील अदा करण्यांस अडचणी येईल. परवानगी जर येण्याची खात्री असेल तर लेखापरीक्षण होवून फाईल माझेकडे आली तर पुढील कार्य वाही करता येईल.

**मुख्यलेखापरीक्षक श्री.खरात :-** बजेटमध्ये तरतुद केली असेल तर खर्च करता येईल. तरतुद उपलब्ध झाल्यावर त्यास प्रशासकीय मान्यता त्यानंतर तांत्रिक मान्यता व त्यानंतर त्या कामास कार्यारंभ आदेश देण्यात येवून सर्व मान्यता जोपर्यंत होत नाही तोपर्यंत बील अदा होवू शकत नाही.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** मा.आयुक्तांनी बजेट पुर्ण रिलीज केले नाही. सन २०१८-२०१९ च्या बजेटच्या प्रस्तावाला मंजूरी दिलेली आहे. दिनांक ३१ जुलै किंवा १ एप्रिल पासुन आपण खर्च करु शकतो.

**मुख्यलेखापरीक्षक श्री.खरात :-** मान्यता मिळाली आहे.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** महाराष्ट्र राज्याचे चीप आर्किटेक्ट संचालक नगररचना यांची मंजूरी घ्यायची, त्यानंतर जिल्हाधिकारी साहेबांची, त्यानंतर नगरविकास विभागाची मंजूरी घ्यावी लागेल. परवानगी साठी चांगला कर्मचारी नेमा.

**मा.महापौर मॅडम :-** सर्वांची इच्छा असेल तर श्री.बल्लाळ यांची आपण नेमणूक करावी. जोशींनाही घ्यावे.

**मा.अति.आयुक्त श्री.वालगुडे साो :-** श्री.जोशी व बल्लाळ यांनी काम पहावे.

**मा.श्री.संजय घुले :-** दिनांक १८/०७/२०१८ चे पत्रातील मुद्दा क्रमांक ४ वाचा.

**मा.महापौर मॅडम :-** बल्लाळ व जोशी यांनी एक महिन्यात परवानगी बाबत कार्यवाही करावी.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** इथापे कडुन इलेक्ट्रीक विभागाचे काम काढुन घ्या. पुतळा उभारण्याचे काम द्या.

**मा.महापौर मॅडम :-** श्री.इथापे, जोशी यांनी एक महिन्यात परवानगीची कार्यवाही करावी.

**सहा.नगररचनाकार श्री.जोशी :-** दिनांक १८/०७/२०१८ चे पत्रातील मुद्दा क्रमांक ४ चे वाचन केले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा उभारणे बाबत मा.जिल्हाधिकारी सो। यांचेकडेस मागणी केली आहे.

**मा.महापौर मॅडम :-** जागेच्या प्रस्तावाची लवकरात लवकर कार्यवाही नगररचना विभागाने करावी.

**मा.श्री.संजय घुले :-** कलेक्टर ऑफिसचा जो रस्ता आहे. त्याला काय अडचणी आहेत. एक वर्षापासुन विषय पेंडींग आहे.

**शहर अभियंता श्री.सोनटक्के :-** सन २०१६-२०१७ डी.पी.डी.सी कडे प्रस्ताव दिला होता. परंतु निधी उपलब्ध झाला नाही. परत फेर प्रस्ताव सादर केला आहे. या प्रस्तावावर मा.अतिरिक्त आयुक्त यांनी केंद्र शासन अमृत योजने अंतर्गत भुयारी गटर योजना याठिकाणी मंजूर आहे. पाणी पुरवठा विभागाचे अभिप्रायासह फेरसादर करा असा अभिप्राय नोंदवला आहे.

**मा.श्री.संजय घुले :-** अमृत योजनेची मंजूरी गृहीत धरुन करायला काय हरकत आहे.

**शहर अभियंता श्री.सोनटक्के :-** पाणी पुरवठा विभागा मार्फत वर्कींग सर्व्हे झालेला नाही. मध्यभागी ड्रेनेज व दोन्ही बाजुने गटर प्रस्तावित केले होते. पाणी पुरवठा विभागाकडुन ड्रॉईंग अजुन निश्चित झालेले नाही.

**मा.श्री.संजय घुले :-** अधिन राहुन मंजूरी घ्या.

**मा.अति.आयुक्त श्री.वालगुडे सो। :-** कामाचे डुप्लीकेशन होवू नये याकरीता पाणी पुरवठा विभागाचा अभिप्राय मागीतला आहे.

**पाणीपुरवठा इंजि.श्री.काकडे :-** केंद्र शासीत भुयारी गटर योजनेचा वर्कींग सर्व्हे चालू आहे. प्राधान्याने हा सेक्शन करायला लावतो. दीड ते दोन महिन्यात सर्व्हेचे काम करुन घेण्यात येईल.

**मा.सौ.मनिषा बारस्कर :-** बंद गटर योजनेचे आम्ही काम सुचवले तर तुम्ही खुल्यागटर करा असे म्हणता.

**शहर अभियंता श्री.सोनटक्के :-** रोडवरचे पाणी त्या गटारात जात नाही व रस्ता खराब होतो. नागरीक संडासचे पाणी या गटारीत सोडतात व पुढे ते ओढयास सोडले जाते. त्यामुळे आरोग्याचा प्रश्न निर्माण होवू शकतो. खुली ड्रेनेज लाईन मी म्हटलो नाही. बांधकामाच्या गटारी बांधा असे मी म्हटलो. पावसाचे पाणी सांडपाणी जायला हरकत नाही.

**मा.सौ.मनिषा बारस्कर :-** गटार कशी बांधणार.

**शहर अभियंता श्री.सोनटक्के :-** गटारीचे बांधकाम करुन त्या गटारीवर स्लॅब टाकू शकतो.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** भुयारी गटर कॅन्सल करणार का ?

**मा.महापौर मॅडम :-** बंद पाईपची गटर करा.

**मा.सौ.मनिषा बारस्कर :-** नगरसेवक स्वेच्छा निधीतील कामे घेण्यास ठेकेदार तयार नाहीत. निवडणूका जवळ आल्या आहेत.

**मा.श्री.सचिन जाधव :-** छत्रपती संभाजी महाराज यांचे पुतळयाचे पेमेंट किती दिवसापासुन पेंडींग आहे.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** बजेटमध्ये १२ लाखाचा निधी मंजूर केला आहे. १०० टक्के निधी वापरण्यासाठी मंजूरी दिलेली आहे. तुम्ही रुलिंग द्या.

**मा.श्री.किशोर डागवाले :-** असे जर कोणी अधिका-याने आडकाठी केली तर त्यांचेवर कार्यवाही करा आम्ही तुमच्या पाठीशी आहोत.

**उपायुक्त श्री.पठारे :-** अर्थसंकल्पात दोन बाजू आहेत. जमा व खर्च बाजू दोन्ही पण बरोबर चालल्या तर तेवढी बीले अदा करु शकतो.

**मा.श्री.सचिन जाधव :-** बजेटच्या पुस्तकात सर्जेपुरा मंगलगेट येथील समाज मंदिराचे कामाचा उल्लेख आहे. काम अर्धवट आहे. त्याचे पेमेंट बाबत पुस्तकात उल्लेख आहे. या ठिकाणी महापुरुषांचे कामे होत नसतील तर तुम्ही कोणते बील काढणार.

**मुख्यलेखाधिकारी श्री.मानकर :-** मागील बरीच बीले पेंडींग आहेत. आपली आर्थिक परिस्थिती नाजूक आहे.

**मा.श्री.किशोर डागवाले :-** मागच्या वर्षी जो नगरसेवक स्वेच्छा निधीचा ठराव झाला त्याच्या बद्दल सांगा.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** मोबाईल टॉवरमधुन प्राधान्याने अदा करावे असा ठराव झाला आहे.

**मुख्यलेखाधिकारी श्री.मानकर :-** बांधकाम विभागा मार्फत फाईलसह सोनटक्के मा.जिल्हाधिकारी यांनी चर्चा केली आहे. व मीही बोललो आहे. मी आल्यापासुन तीनदा फाईल पुटअप केली पण निर्णय होत नाही.

**मा.श्री.सचिन जाधव :-** कचरा संकलन वाहतुक करणे चौदाव्या वित्त आयोगातुन बील अदा करता येते का.

**मुख्यलेखाधिकारी श्री.मानकर :-** संबंधित विभागाकडुन जशी केडीएमसी येते त्यानुसार पुढील कार्यवाही होते. लेखापरीक्षणा नंतर फाईल माझ्याकडे येते.

**मुख्यलेखापरीक्षक श्री.खरात :-** याबाबत घनकचरा विभागाने लेखापरीक्षणास टिप्पणी पाठविली आहे. ठेकेदाराची बरीचशी बिले प्रलंबित होती. दसरा व दिवाळीच्या वेळेस कचरा संकलन व वाहतुक बंद होण्याने शहरात कचरा साठण्याची शक्यता होती. व आरोग्य विषयक गंभीर परिस्थिती निर्माण झाली असती. चौदाव्या आयोगातील निधी मधुन देयक अदा करु शकत नाही. सदरची नस्ती माझेकडेस आल्यानंतर शहरामध्ये हिवताप व मलेरियाची लागण होवू शकते याची शहनिशा करुन १४ व्या वित्त आयोगातून रक्कम अदा करणेबाबत अभिप्राय नोंदवुन प्रशासकीय मंजूरीसाठी सादर केले.

**मा.श्री.अभय आगरकर :-** एका विशेष परिस्थितीत बील काढले इथपर्यंत ठिक आहे. एका राष्ट्रपुरुषाच्या सभामंडपाचे देयक तुम्ही थांबवता. या महामानवाच्या संदर्भात तुम्हाला राष्ट्राभिमान आहे किंवा नाही. राष्ट्रपुरुषांचे कामासाठी कायदा आडवा आणता.

**मा.श्री.सचिन जाधव :-** या ठिकाणी चार महिने झाले अजुन काम होत नसेल तर मी या पदाचा राजीनामा देतो.

**मा.श्री.अभय आगरकर :-** मी अनेक फाईल दाखवील कसा कायदा वाकविला. आमच्या संयमाला आवर घालतो याचा अर्थ आमच्या संयमाचा अंत पाहू नका.

**मा.श्री.सचिन जाधव :-** मागे एक कर्मचारी त्याचे देणे मिळत नव्हते वैतागुन तो सभा चालू असतांना सभागृहात आला.

**मा.श्री.दिलीप सातपुते :-** समाज मंदिर व संभाजी महाराजांच्या पुतळयाचा चेक त्वरीत बनवा.

**मा.महापौर मॅडम :-** डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृह बांधकाम करणे या कामाचा चेक व संभाजी महाराज यांचे पुतळा उभारणे साठीचा चेक बनवुन आणा.

**मा.श्री.किशोर डागवाले :-** तुमचा आदेश जर कोणी पाळला नाही तर त्यांचेवर कारवाई करा.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** समाज मंदिराचे काम अडचणीमुळे थांबत असेल तर ते चुकीचे आहे. जोवर निर्णय होत नाही तोपर्यंत पुढे आम्ही सभा चालू देणार नाही.

सभागृहात गोंधळ नगरसेवक यांनी खाली बैठक मारली.

**मुख्यलेखाधिकारी श्री.मानकर :-** मा.महापौर यांचेशी चर्चा झाली. मी दोन चेक पैकी समाज मंदिराची फाईल माझेकडे आहे तो चेक मी काढू शकतो. दुसरी संभाजी महाराजांची फाईल माझेकडे आत्ता उपलब्ध नाही. देयक अकौंट विभागाकडे आल्यानंतर दोन्ही चेक मिळतील.

**मा.श्री.अभय आगरकर :-** संभाजी महाराज पुतळा बनविणा-या आर्टीस्टचे पेमेंटचे दोन हप्ते दिलेले आहेत. पुतळा स्थानापन्न करतो त्यावेळी पेमेंट अदा केले तरी चालेल. असे ॲग्रीमेंटमध्ये आहे.

**मुख्यलेखाधिकारी श्री.मानकर :-** संभाजी महाराजांचे पुतळयाची फाईल स्टोअर विभागाकडे आहे.

**श्री.जाधव, स्टोअर विभाग :-** पुतळयाची किंमत १०.७० लाख आहे. पहिल्या वेळी ५ लाख ३५ हजार व त्यानंतर ३ लाख रुपये आर्किटेक्ट यांना देण्यात आले आहेत. रक्कम रुपये २.३५ लाख देणे बाकी आहे. पुतळयाची जागा निश्चीत झालेली नाही त्यामुळे रक्कम अदा करता येत नाही.

**मा.श्री.अभय आगरकर :-** पुतळा महानगरपालिकेत आला तर त्या कामाला गती मिळणार आहे.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** सन २०१७-२०१८ व सन २०१८-२०१९ नगरसेवक स्वेच्छा निधीचा ठराव बांधकाम परवानगी व्यतीरिक्त केलेल्या बांधकामास दंड आकारुन मिळणा-या निधीतून या कामाचे देयक अदा करावे असा झालेला आहे. मला आता किती अतिरिक्त बांधकाम केले याची यादी द्या.

**मुख्यलेखाधिकारी श्री.मानकर :-** नगरसेवक निधीतील १०२ नंबर पर्यंत कामाचे देयक अदा केले आहे. या महिन्यात उर्वरीत जणांचे काढणार आहे. एकुण २६३ आहेत.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** मागील व चालू नगरसेवकांचे निधीतील कामे अतिरिक्त बांधकाम निधीतून अदा करावेत असा ठराव झाला तुम्ही यादी द्या किती रक्कम जमा आहे.

**मुख्यलेखाधिकारी श्री.मानकर :-** मनपा निधीचे जुने देयक काढतो आहोत. नगरसेवक स्वेच्छा निधीचेही चेक काढत आहोत.

**मा.श्री.किशोर डागवाले :-** आपत्कालीन चे चेकही काढत नाहीत. आयुक्तांनी आदेश देवूनही ते पाळत नाहीत. आपत्कालीनचे ३२ चेक आपण काढले.

**मुख्यलेखाधिकारी श्री.मानकर :-** प्रत्येक हेडची कामे करत आहेत. सर्वांना आपण १०० टक्के समाधानी करु शकत नाही.

**मा.श्री.दिलीप सातपुते :-** तुम्ही काही झाले की, कलेक्टरची भिती दाखवता. येथे महापौर पिठासीन अधिकारी आहेत. वालगुडे साहेब आहेत त्यांचे आदेश पाळा.

**मा.श्री.सचिन जाधव :-** आपत्कालीनचे काम दाखवा म्हणता. तातडीने काम करा म्हणता. व नंतर बील देण्यास उशीर करता.  आयुक्तांचे केबीनचे दुरुस्तीचे काम चालू आहे. येथे सभागृहाची दुरुस्ती करणे गरजेचे आहे. ते सोडून दुसरेच काम चालू आहे. त्या कामाचे टेंडर झाले का.

**शहर अभियंता श्री.सोनटक्के :-** मनपा इमारतीसाठी वार्षिक निविदा मागविलेली आहे. बैठक व्यवस्था बदलणे बाबत नगररचनाकार यांनी ड्राईंक सादर केले. ढगे साहेब आयुक्त असतांना असणारी बैठक व्यवस्था होती ती बदलली. मा.जिल्हाधिकारी यांचेशी चर्चा झाल्यानंतर तत्कालीन नगररचनाकार धोंगडे यांनी ड्रॉईंग सादर केले आहे.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** जिजाउ मॉ साहेबांचा फोटो सभागृहात लावावा असा ठराव झालेला आहे. तो अद्याप लावला नाही.

**मा.श्री.दिलीप सातपुते :-** आयुक्तांचे केबीनचे काम बंद करायला सांगा. व सभागृहाचे काम चालू करा.

**शहर अभियंता श्री.सोनटक्के :-** ठीक आहे.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** एक कोटी चाळीस लाख रुपये कोठे वापरले. जकात ठेकेदाराकडुन राखीव ठेवलेले पैसे गेले कुठे.

**मुख्यलेखाधिकारी श्री.मानकर :-** या संदर्भात जकात ठेकेदाराने भरलेले पैसे डिपॉझिट रजिष्टरला आहे. बल्लाळ हे काम पाहतात.

**लोंढे अकौंट विभाग :-** डिपॉझिट रजिष्टरला जर राउंड झाले असतील तर ते बल्लाळ सांगतील.

**मा.श्री.दिलीप सातपुते :-** दिनांक ३०/१२/२०१७ ला महासभा दुपारी १.०० वाजता झाली. विषय क्रमांक ३३ महाराष्ट्र राज्य सुवर्ण जयंती वर्षे २०१०-२०११ सुजल व निर्मळ अभियान अंतर्गत शहरातील पाणी ग्राहकांच्या नळांना मीटर बसविणेसाठी महानगरपालिकेकडुन तयार करणेत आलेला अहवालास मा.शासनाकडुन मंजूरी मिळणे हा विषय होता. तो विषय मंजूर केला का स्थगीत केला.

**नगरसचिव :-** ठरावाचे वाचन केले.

**मा.श्री.दिलीप सातपुते :-** ठरावानुसार फेरसादर झाले का ?

**उपअभियंता श्री.काकडे :-** फेज-२ योजना मंजूर झाल्यानंतर असा ठराव होता. त्याच्या अगोदर टेंडर प्रोसेस केली मिटरचा विषय स्थगित आहे.

**मा.श्री.दिलीप सातपुते :-** दिनांक ३०/१२/२०१७ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषय क्रमांक ३८ मंजूर आहे का स्थगीत केला.

**नगरसचिव :-** दिनांक ३०/१२/२०१७ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषय क्रमांक ३८ चा ठराव वाचून दाखविला.

**मा.श्री.दिलीप सातपुते :-** दिनांक ३१/१२/२०१७ चा पेपर वाचला तर त्यामध्ये हा विषय स्थगीत ठेवण्यात आल्याबाबत बातम्या आल्या आहेत.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** दोन्ही विषय स्थगीत ठेवण्यात आले मग विषय मंजूर कसा झाला.

**मा.श्री.दिलीप सातपुते :-** सभेचे रेकॉर्डींग मागवा. दिनांक ३०/१२/२०१७ च्या सभेतील विषय क्रमांक ३३ व ३८ चे इतिवृत्त मंजूर करु नये. नगररचना विभागाकडे कलम ३७ चे जनरल पब्लीकचे किती प्रस्ताव पेंडींग आहेत. नगरसचिवांकडे सभेत घेण्यासाठी प्रस्ताव आले पाहीजेत.

**उपअभियंता श्री.बल्लाळ :-** विषयपत्रिकेवर विषय घेणे हा पिठासीन अधिकारी यांचा अधिकार आहे. कलम ३७ खाली नागरीक मागणी करतात पण निश्चित आकडा सांगता येत नाही.

**मा.श्री.दिलीप सातपुते :-** दिनांक ३०/१२/२०१७ च्या सभेतील विषय क्रमांक ३३ व ३८ चे इतिवृत्त मंजूर करु नये. दिनांक ३०/१२/२०१७ सभेचे सी.डी. मागवा.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** दिलीप सातपुते यांनी जी सुचना मांडली त्यास मी अनुमोदन देतो.

**मा.श्री.दिलीप सातपुते :-** हा ठराव आपण शासनाला पाठवला का.

**सहा.नगररचनाकार श्री.जोशी :-** शासनाला पाठवला.

**मा.श्री.दिलीप सातपुते :-** इतिवृत्त मंजूर नसतांना ठराव करुन पाठवला.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** जे मागच्या सभेत झालेले निर्णय घेतले ते या सभेत बदलू शकत नाही.

**मा.श्री.अभय आगरकर :-** फक्त दुरुस्ती करु शकतो.

**नगरसचिव :-** पिठासीन अधिकारी सांगतील त्याप्रमाणे कार्यवाही करता येईल.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :-** चूकीचे असेल तर रद्द करा व चांगले असतील तर मंजूर करा.

**श्री.वल्लाळ अकौंट विभाग :-** सभागृहाचे बांधकामा पोटी जकात ठेकेदाराकडुन प्राप्त निधीपैकी ३६,४४,०००/- रक्कम शिल्लक आहे.

**शहर अभियंता श्री.सोनटक्के :-** सभागृहाचे कारपेट, इलेक्ट्रीफिकेशन, साउंड सिस्टीम पदाधिका-यांच्या खुर्च्या या बाबी शिल्लक आहेत. कोटेशन मागविले आहे. आर्किटेक्ट कांकरीया यांचेकडे तपासणी साठी पाठविले आहेत. खुर्च्या व कारपेटचा निर्णय अद्यापपर्यत झालेला नाही.

**प्रभाग अभियंता श्री.पारखी :-** सभागृहाचे कारपेट, इलेक्ट्रीफिकेशन, साउंड सिस्टीम पदाधिका-यांच्या खुर्च्या या बाबी शिल्लक आहेत. डी.एस.आर.चे दर नाहीत, कोटेशनचे दर चेक करण्यासाठी आर्किटेक्ट कांकरीया यांचेकडे पाठविले आहे. साधारणत: एक महिन्यात सभागृहाचे काम होईल.

**मा.श्री.दिलीप सातपुते :-** या सभेत इतिवृत्त मंजूरीचा जो विषय आला महापौरांकडे एकाच वेळी १०-१० १५-१५ ठराव स्वाक्षरीसाठी येतात त्यांना ते वाचण्यासाठी वेळ नसतो काही कळत नाही.

**मा.श्री.सुवेंद्र गांधी :-** दिलीप सातपुते यांनी मा.महापौरांबद्दल काढलेल्या अनुदगाराबद्दल निषेध करतो. त्यांनी सभागृहात जाहीर माफी मागावी.

**मा.श्री.दिलीप सातपुते :-** मा.महापौरांबद्दल माझे बोलण्याने तुमचा व सभागृहाचा जर काही अवमान झाला असेल तर मी त्याची जाहीर माफी मागतो.

**मा.महापौर मॅडम :-** इतिवृत्त दुरुस्तीसह कायम करणेत येत आहे. पुढचा विषय वाचा नाहीतर मी सर्व विषय मंजूर करील.

**मा.श्री.दिलीप सातपुते :-** सोमवारी दिनांक ०६/०८/२०१८ पर्यंत सभा तहकुब ठेवा.

**मा.महापौर मॅडम :-** आजची सभा तहकुब करण्यांत येत आहे. ही सभा सोमवार दिनांक ०६/०८/२०१८ रोजी दुपारी १.०० वाजता पुन्हा सुरु होईल.

**ठराव :-**

मागील दिनांक ३०/१२/२०१७, २६/०२/२०१८, २८/०३/२०१८ रोजीच्या सभेचे इतिवृत्त कायम करताना दुरूस्तीसह इतिवृत्त कायम करणेस ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करावी.

प्रस्ताव क्रमांक ३६ दिनांक ३०/१२/२०१७ मधील सावेडी सर्व्हे नंबर २२९/१ अ/१ चे २९ आर ही जागा महाराष्ट्र तांत्रिक शिक्षण मंडळ, अहमदनगर या शाळेतील विद्यार्थ्यांना क्रीडांगण म्हणुन दिलेली आहे. सदर मोकळी जागा परिसरातील नागरिकांना वापरता येणार आहे. तसेच सदर जागेस वॉलकंम्पौंड नाही. फक्त विद्यार्थ्यांना खेळण्यासाठी जागेचा वापर होणार असल्याने अवास्तव भाडे शाळेस भरण्यास शक्य होणार नाही. याकरीता सदर

जागेचे भाडे, डिपॉझिट, करारनामा नाममात्र दराने आकारणेस ही सभा मान्यता देत आहे. इतिवृत्त कायम करतांना या दुरुस्तीसह इतिवृत्त कायम करण्यांत यावे. याकामी आवश्यक ती कार्यवाही प्रशासनाने नियमानुसार करावी.

प्रस्ताव क्रमांक ४२ दिनांक २८/०३/२०१८ मधील मुद्दा क्रमांक ४ मध्ये सावेडी स्मशान भुमी उभारणे करीता सार्वजनिक भवन किंवा अनुषंगीक कामासाठी जागा असे लेखाशिर्ष तयार करुन पुढील कार्यवाही करणेस ही सभा मान्यता देत आहे. इतिवृत्त कायम करतांना या दुरुस्तीसह इतिवृत्त कायम करण्यांत यावे.

प्रस्ताव क्रमांक ४२ दिनांक २८/०३/२०१८ मधील मुद्दा क्रमांक २५ मध्ये अमरधाम मधील दहन ओटयासमोरील जागेत शेड उभारणेचे काम विकासभार या निधीतुन करणे बाबत ठराव पारीत करणेत आला होता. परंतु सदरचे काम महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजना (जिल्हास्तर) सन २०१८-२०१९ मध्ये प्रस्तावित केले असल्याने सदर कामाची रक्कम रुपये ४५ लाख महानगरपालिकेच्या विकास कामांसाठी वापरण्यात यावी व यामधुन प्रभाग क्रमांक २३ मधील बेग पटांगण येथे उद्यान विकसीत करणे, याकामाचे देयक रक्कम रुपये १९ लाख विकास भार या निधीतुन देण्याबाबत प्रशासनाने उचित कार्यवाही करावी. मोबाईल टॉवर उत्पन्नातून विकास कामे करणे या लेखाशिर्षानुसार मोबाईल टॉवर प्रशासकीय शुल्क व दंडात्मक कारवाईची व मालमत्ता कराची वसुल झालेली रक्कम या खात्यामध्ये जमा करावी. यास ही सभा मान्यता देत आहे. इतिवृत्त कायम करतांना या दुरुस्तीसह इतिवृत्त कायम करण्यांत यावे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री.गणेश खंडेराव कवडे,

अनुमोदक :- मा.श्री.सचिन तुकाराम जाधव,

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक :- ०६** **दिनांक : ०२ / ०८ /२०१८**

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

**प्रस्तावाचा विषय :-** दुखवटयाचे प्रस्ताव

| अ. क्र. | विषय |
|---|---|
| १ | काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पंतगराव कदम यांचे दिनांक ९-३-२०१८ रोजी झालेल्या दुःखद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| २ | नगर शहरातील सामाजिक कार्यकर्ते व स्वरसंगीतचे चालक सुभाष करमाळकर यांचे दि.९-३-२०१८ रोजी झालेल्या दुःखद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ३ | श्रीमती.सुलोचना रतनप्रसाद तिवारी यांचे दिनांक ९-३-२०१८ रोजी झालेल्या दुःखद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ४ | उत्कृष्ट अभिनेता, दिग्दर्शक व नाटयकर्मी अच्युत देशमुख यांचे दि. २३-२-२०१८ रोजी झालेल्या दुःखद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ५ | कांची कामकोटी पिठाचे शंकराचार्य जयेंद्र स्वरस्वती यांचे दिनांक २८-२-२०१८ रोजी दुःखद निधन झाले. |
| ६ | हिंदी सिने क्षेत्रातील प्रसिध्द अभिनेत्री श्रीदेवी यांचे दिनांक २५-२-२०१८ रोजी दुःखद निधन झाले. |
| ७ | ज्येष्ठ अभिनेत्री शम्मी उर्फ नर्गिस रबाडी यांचे दिनांक ६-३-२०१८ रोजी दुःखद निधन झाले. |
| ८ | अहमदनगर नगरपालिकेचे माजी नगरसेवक ॲड.लक्ष्मणराव वाडेकर यांचे दि. १०-३-२०१८ रोजी झालेल्या दुःखद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ९ | अहमदनगर शहराचे माजी उपनगराध्यक्ष दत्तात्रय ठकाजी वाकळे यांचे दिनांक १७-३-२०१८ रोजी झालेल्या दुःखद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| १० | नगर शहरातील ओम उदयोग समुहाचे संचालक व उदयोगपती बाळासाहेब पवार यांचे दिनांक ३१-३-२०१८ रोजी झालेल्या दुःखद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ११ | ज्येष्ठ समाजवादी नेते व माजी गृहराज्यमंत्री भाई वैद्य यांचे दिनांक २-४-२०१८ रोजी झालेल्या दुःखद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| १२ | शिवसेनेचे उपशहर प्रमुख संजय कोतकर व शिवसेना कार्यकर्ते वसंत ठुबे यांचे दि.७-४-२०१८ रोजी झालेल्या दुःखद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| १३ | अ.नगर मनपाचे नगरसेवक कैलास गिरवले यांचे दिनांक १६-४-२०१८ रोजी झालेल्या दुःखद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| १४ | प्रसिध्द नाटयकलाकार व दिग्दर्शक दिलीप कोल्हटकर यांचे दिनांक ४-५-२०१८ रोजी झालेल्या दुःखद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| १५ | मराठी चित्रपट सृष्टीतील प्रसिध्द गायक अरूण दाते यांचे दिनांक ६-५-२०१८ रोजी झालेल्या दुःखद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| १६ | नगर शहरातील प्रसिध्द व्यापारी कोहिनूर क्लॉथ चे संचालक वसंतलाल गांधी यांचे दि.१६-५-२०१८ रोजी झालेल्या दुःखद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |

| | |
|---|---|
| १७ | अहमदनगर शहरातील सामाजिक कार्यकर्त्या छोटीबाई नारायण चव्हाण यांचे दि. २-५-२०१८ रोजी झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| १८ | भाजपाचे ज्येष्ठ नेते व कृषीमंत्री पांडुरंग फुंडकर यांचे दिनांक ३१-५-२०१८ रोजी झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| १९ | माजी आमदार दगडू पाराजी बडे यांचे दिनांक १६-६-२०१८ रोजी झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| २० | प्रसिध्द अध्यात्मिक गुरू भैय्यूजी महाराज यांचे दिनांक १२-६-२०१८ रोजी झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| २१ | अहमदनगर शहरातील माजी नगरसेविका सुरेखा सल्ला यांचे दिनांक १९-६-२०१८ रोजी झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| २२ | नगर तालुक्यातील सामाजिक कार्यकर्त्या बबई केरू बोरूडे यांचे दिनांक २०-६-२०१८ रोजी झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| २३ | मुकुंद मुळे (डी एम चष्मावाले) यांचे दिनांक ३-७-२०१८ रोजी झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| २४ | जिल्हा मराठा शिक्षण संस्थेच्या विश्वस्त निर्मला कानवडे यांचे दिनांक ५-७-२०१८ रोजी झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| २५ | नगर शहरातील प्रसिध्द डॉक्टर जयंत निसळ यांचे दि. ११-७-२०१८ रोजी झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| २६ | आध्यात्मिक गुरू व पुणे येथील साधू वासवानी मिशनचे संस्थापक दादा वासवानी यांचे दिनांक १२-७-२०१८ रोजी झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| २७ | केडगांव येथील सामाजिक कार्यकर्त्या वैजयंता ठुबे यांचे दिनांक १२-७-२०१८ रोजी झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| २८ | प्रसिध्द सिने अभिनेत्री रीता भादुरी यांचे दिनांक १६-७-२०१८ रोजी झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| २९ | कोकण कृषी विद्यापीठ दापोली येथील ३३ कर्मचा-यांचे दिनांक २८-७-२०१८ रोजी झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ३० | अहमदनगर शहरातील सामाजिक कार्यकर्त्या चांदकवरबाई कोठारी यांचे दि. ३०-७-२०१८ रोजी झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ३१ | अहमदनगर शहरातील सामाजिक कार्यकर्त्या विठाबाई माधवराव गाडे यांचे दि. ३१-७-२०१८ रोजी झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ३२ | श्री.काकासाहेब शिंदे, यांचे दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |

---*---

**ठराव :-**

दोन मिनीटे स्तब्ध उभे राहुन श्रध्दांजली वाहण्यात आली.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

## अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

**प्रस्ताव क्रमांक :- ०७** **दिनांक : ०२/०८/२०१८.**

---

**प्रस्तावाचा विषय :-** कल्याण-अहमदनगर-नांदेड (जुना एनएच-२२२) या रस्त्यावर उड्डाणपुल बांधणेसाठी भुसंपादन करणे बाबत..

संदर्भ :- १) अहमदनगर महानगरपालिकेचे पत्र क्र.साप्रवि-पीए-८८४ दि.१२/३/१८

२) प्रकल्प संचालक,एनएचएआय यांचे कडील पत्र क्र.१५० दिनांक २५/०४/२०१८.

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

एन.एच.ए.आय- पी.आय.यु -अहमदनगर राष्ट्रीय महामार्ग २२२ वरील अहमदनगर शहरातील सक्कर चौक ते स्टेट बॅक चौक येथील उड्डाण पुलाच्या कामाकरीता अहमदनगर महानगरपालिकेमार्फत जागा उपलब्ध करुन देण्यात येईल असे संदर्भ क्र. १ चे पत्रान्वये एन.एच.ए.आय कार्यालयास कळविण्यात आलेले आहे. तथापी एन.एच.ए.आय या विभागाच्या संबंधीत अधिका-यानी अपुरी माहीती दिल्याने संदर्भित पत्र प्रकल्प अधिकारी एन.एच.ए.आय यांना देण्यात आले होते.

वरील प्रमाणे वस्तुस्थिती मा. जिल्हाधिकारी तथा आयुक्त अहमदनगर महानगरपालिका यांच्या निदर्शनास आल्यानंतर मा. जिल्हाधिकारी महोदय यांनी प्रकल्प अधिकारी एन.एच.ए.आय यांच्याशी सविस्तर चर्चा केली . या चर्चेमध्ये खालील मुद्दे स्पष्ट झाले आहेत.

१) केंद्र सरकारच्या प्रचलित धोरणानुसार शहरातुन जाणा-या उड्डाणपुलाचे काम हे केंद्र सरकारच्या निधीतुन एन.एच.ए.आय यांच्या माध्यमातुन करण्यात येत आहे. मात्र त्यासाठी आवश्यक (रस्ता रुंदीकरणास्तव )जमिन संपादन मात्र स्थानीक प्राधिकरणा मार्फत करुन घेणे आवश्यक आहे असे केंद्र शासनाचे सर्वसाधारण धोरण आहे.

२) रस्ता रुंदीकरणाच्या भुसंपादनाकरीता आवश्यक तो खर्च देणे देखील स्थानीक प्राधिकरणांना भागविणे कठीण होत आहे ही बाब महाराष्ट्र शासनाच्या लक्षात आल्यानंतर महाराष्ट्र शासनाने दि. ४ मे २०१८ रोजी याबाबत शासन निर्णय घेतलेला आहे. या शासन निर्णयातील महत्वाचे मुद्दे खालील प्रमाणे आहेत.

अ) शहरातील सर्व रस्त्यांचे बांधकाम, नुतनीकरण किंवा उड्डाणपुल इत्यादी बांधणे ही मुलतः संबंधीत स्थानीक प्राधिकरणाची वैधानीक जबाबदारी आहे. ही वैधानीक जबाबदारी केंद्र शासन एन.एच.ए.आय. च्या माध्यमातुन पुर्ण करण्याचा प्रयत्न करीत आहे. केंद्र शासनाची उड्डाणपुल बांधणे ही वैधानीक जबाबदारी नसुन देखील केंद्र सरकर असे उड्डाणपुल शहरात बांधीत असल्यने किमान त्यासाठी आवश्यक असणा-या जागा तरी स्थानीक प्राधिकरणाने भुसंपादनाचे माध्यमातुन उपलब्ध करुन द्याव्यात अशी केंद्र शासनाची अपेक्षा आहे.

ब) वर नमुद केल्याप्रमाणे रस्तारुंदीकरणाची वैधानीक जबाबदारी पार पाडण्यासाठी देखील आवश्यक निधी स्थानीक प्राधिकरणाकडेस उपलब्ध नसल्याचे मा. राज्य शासनास आढळुन आले आहे.

क) वर नमुद केल्याप्रमाणे स्थानिक प्राधिकरणाची आर्थिक परिस्थिती ठिक नसल्याने महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानाच्या माध्यमतुन निधी उपलब्ध करुन देण्याचे कळविले आहे. यासाठी खालील प्रमाणे अटींची पुर्तता करणे आवश्यक आहे.

१) रस्ता रुंदीकरणासाठी आवश्यक ती जमिन टी.डी.आर. देवुन संपादन कराव्यात, त्यासाठी आवश्यक तेथे विकास आराखड्यामध्ये बदल करावेत.

२) वरील प्रमाणे कार्यवाही करुन देखील जागा संपादीत करणे शक्य नसल्यास मा. जिल्हाधिकारी यांनी प्रमाणीत केल्यानंतर भुसंपादनाचा निधी महाराष्ट्र शासनाने उपलब्ध करुन द्यावा. हा निधी ७० -३० या प्रमाणात देण्यात यावा , म्हणजे ७० % निधी मा. शासनाने तर उर्वरीत निधी अहमदनगर महानगरपालिकेने देणे आवश्यक आहे.

याकरीता वरील प्रमाणे अटींची पुर्तता करणेसाठी अहमदनगर महानगरपालिकेस खालील प्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे.

प्रथम येथे नमुद करण्यात येते की, एन.एच.ए.आय संस्थेने आवश्यक तेथेच रुदीकरण प्रस्तावीत केलेले असुन उड्डाणपुलच्या दोन्ही बाजुस हे रुंदीकरण दर्शविलेले दिसते, रस्त्याच्या / उड्डाणपुलाच्या मधल्या भागात सार्वजनिक बांधकाम विभागाने आवश्यक ते रस्ता रुंदीकरणासाठी चे भुसंपादन यापुर्वीच केलेले असुन या भुसंपादनापोटी अहमदनगर महानगरपालिकेस देखील रु. १९,१९,२२९/- इतकी रक्कम प्राप्त झालेली आहे. थोडक्यात या रस्त्यापैकी चा मोठा भाग योग्य त्या रुंदीच्या भुसंपादनासह सार्वजनीक बांधकाम विभागाने एन.एच.ए.आय- संस्थेस हस्तांतरीत केलेला आहे.

१) विषयांकीत उड्डाणपुलासाठीचे आवश्यक रस्तारुंदीकरण विकास आराखड्यात समाविष्ट करण्यासाठी कलम ३७ अन्वये प्रस्ताव तयार करुन तो मा. शासनास मंजुरीस्तव सादर करणे आवश्यक आहे.

२) उड्डाणपुलासाठी आवश्यक रस्तारुंदीकरणासाठी एकुण १.४०५ हेक्टर इतक्या क्षेत्राची आवश्यकता आहे. त्यापैकी ०.९८८ हेक्टर क्षेत्र केंद्र / राज्यशासनाच्या विविध विभागाच्या अख्त्यारीत आहे. हे क्षेत्र संबंधीत विभागाकडेस विना मोबदला हस्तांतरीत करण्यास अहमदनगर महानगरपालिकेमार्फत प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. या शासकीय जागापैकी काही जागा बी.एस. एन.एल. पोस्ट ऑफीस इत्यादी शासकीय विभाग तसेच सी.एस.आर.आय.डी. यांच्या मालकीचे आहे त्यांच्या बाधित क्षेत्रासाठी ते नुकसान भरपाई मागण्याची देखील शक्यता आहे. हे क्षेत्र सर्व साधारणपणे ०.२१२ हेक्टर आहे व त्याची किंमत अंदाजे ३,८१,९०,००० /- येईल तर नुकसान भरपाई ७,६३,३०,००० /- इतकी येईल.

३) सदर रस्ता रुंदीकरणासाठी ०.४१७ हेक्टर इतके क्षेत्र खाजगी मालकीचे असुन सदर खजगी मालक टी.डी.आर घेण्यास तयार न झाल्यास या भुसंपादनासाठी खालील प्रमाणे खर्च अपेक्षीत आहे.

क्षेत्र - ०.४१७

दर - अंदाजे रु. १८,००० /- प्रति चौ.मी.

. . खाजगी जमिनीची एकुण किंमत = ७,५०,६०,००० /-

भुसंपादनासाठी वरील किंमतीच्या सुमारे २.०० पट इतकी रक्कम द्यावी लागते. सबब खाजगी जागेच्या नुकसान भरपाईची रक्कम रु. १५,०१,२०,००० /- इतकी येते.

म्हणुन एकुण भुसंपादनासाठी अंदाजे खर्च हा (कमाल ) रु. २२,६४,५०,००० /- इतका येतो .

यापैकी ७० % रक्कम ३ टप्यांमध्ये मा. राज्य शासनाकडुन उपलब्ध होणार आहे.

. . १५,८५,१५,००० /- इतकी रक्कम मा. राज्य शासनाकडुन प्राप्त होईल .तर उर्वरीत रक्कम रु. ६,७९,३५,००० /- इतकी रक्कम महानगरपालिकेस भुसंपादन करीता उपलब्ध करुन द्यावी लागेल.

सबब विकास योजनेत फेरबदल करणे व उपरोक्त भुसंपादनाचा हिस्सा अदा करणेसाठी मा. महासभेच्या मंजुरीची आवश्यकता आहे. सबब सदर प्रस्ताव मा. महासभेपुढे मंजुरीस्तव सादर करणे योग्य होईल . यास्तव पुढील आदेशार्थ सविनय सादर.

यावर मा.जिल्हाधिकारी तथा आयुक्त, अहमदनगर महानगरपालिका यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

यावर मा.महापौर मॅडम, अहमदनगर महानगरपालिका यांचा अभिप्राय की, मा.महासभा

**चर्चा :-**

**मा.श्री.संजय घुले :-** नॅशनल हायवे २२२ कुठून कुठपर्यंत आहे.

**नगररचना श्री.जोशी :-** नॅशनल हायवे ॲथेरीटी ऑफ इंडिया यांचे मार्फत आलेल्या अहमदनगर राष्ट्रीय महामार्ग २२२ वरील अहमदनगर शहरातील सक्कर चौक ते स्टेट बॅक चौक येथील उड्डाण पुलाच्या

कामाकरीता उड्डाणपुलासाठी भुसंपादन करणेसाठी हा प्रस्ताव सादर केलाआहे. जुना २२२ आहे तसाच आहे. नॅशनल हायवे गावातुन जाणार आहे.

ऑफिस रिपोर्ट वाचन करण्यांत आला.

**डॉ.श्री.सागर बोरुडे :-** महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती आहे का इतकी रक्कम देणेकरीता ? वॉर्डातील छोटया छोटया कामासाठी आर्थिक निधीची परिस्थिती सांगीतली जाते. नागरिकांची महत्वाची कामे होत नाहीत.

**नगररचना श्री.जोशी :-** उड्डाणपुलासाठी आवश्यक असलेल्या जागेचा तपशील नॅशनल हायवे ॲथेरीटी ऑफ इंडियाने कळविले आहे. अगोदर विकास योजनेत या जागेचा समावेश करावा लागेल. जागेचा मोबदला देवून ॲक्वायर करावे लागेल.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** शहराच्या दृष्टीने महत्वाचा प्रश्न आहे. यामध्ये सरकारी, खाजगी, ऑफिसचे लिस्ट द्यायला हवी होती. त्यांनाही २ कोटी देत आहोत. परंतु ज्यांच्या जागा जाणार आहेत त्यांना महासभेत चर्चेसाठी बोलावले असते तर आपण त्यांना टीडीआर साठी विचारणा केली असती. त्यांनी त्यासाठी तयारी दर्शविली असती. विकास कामांसाठी ५० टक्के निधी रिलीज करण्यासाठी मंजूरी दिली आहे. आपण सांगता पैसे नसल्याने देता येणार नाही असे सांगीतले. ७ कोटी आपण कोणत्या माध्यमातुन देणार. आत्ताच नलावडे यांनी इलेक्ट्रीक साहित्यासाठी स्वखर्चाने रुपये १० हजार खर्च करुन नागरिकांच्या तक्रारी मार्गी लावल्याचे निवेदन केले. प्रत्येकाला वेळ देवून या गोष्टी कराव्या लागतात. अंदाजपत्रकाला काही अर्थ आहे की नाही. सभागृह सर्वोच्च आहे. २५० कोटी रुपये घरपट्टी थकबाकी आहे. प्रशासन काय करते. आम्हाला आगामी काळात निवडणुकीला सामोरे जायचे आहे. उड्डाणपुल झाला पाहीजे त्यासाठी तरतुद करावी. किती भुसंपादन करणार आहोत. त्यामध्ये सरकारी, खाजगी जागा किती याची माहिती मिळाली पाहीजे. जर ७० टक्के शासन देते तर १०० टक्के शासनाकडे मागणी करा. या सभागृहाच्या वतीने विनंती करतो. आणखी ३० टक्के कसा रिलीफ मिळेल याचा मा.आयुक्त व मा.महापौर यांनी मा.शासनाकडे पाठपुरावा करावा. महानगरपालिका स्थापन होवून १५ वर्षे झाली आहेत. सप्टेंबर नंतर ५० टक्के बजेट रिलीज झाले तर आमची कामे केंव्हा होणार.

**मा.महापौर मॅडम :-** ५० टक्के बजेट रिलीज करावयाचे.

**मा.जिल्हाधिकारी तथा आयुक्त साहेब :-** शहरामध्ये उड्डाणपुल आवश्यक आहे. अहमदनगर शहर हे इंडस्ट्रीयल सेंटर आहे. आपले शहरातुन कॅपेसिटीपेक्षा जास्त वाहतुक होते. त्यामुळे रस्ता दुरुस्तीसाठी वारंवार खर्च करावा लागतो. शहरी भागात उड्डाणपुल करणे ही महानगरपालिकेची जबाबदारी आहे. मात्र महानगरपालिका आर्थिक दृष्टया सक्षम नसतील आणि उड्डाणपुल बांधण्यास महानगरपालिकेकडे पैसे नसतील तर सर्व खर्च राज्य शासन करते. मात्र पुलासाठी भुसंपादनाचा १०० टक्के खर्च महानगरपालिकेने करावयाचा आहे. त्यातही नगरची महानगरपालिका ड वर्ग असल्याने त्याचा ७० टक्के खर्च राज्य शासन तर ३० टक्के खर्च महानगरपालिकेने करावयाचा आहे. ३०० कोटीचा एक पुल शहराला मिळणार आहे. त्याबदल्यात ७ कोटी रुपये द्यायला हरकत नाही.

स्वेच्छा निधी बद्दल काही रिलीज झाले आहे एक महिन्यात पूर्ण स्वेच्छा निधी रिलीज करणार आहोत.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** अवैध बांधकामाचे दंडात्मक मिळणा-या रक्कमेतुन वॉर्ड विकास निधी व नगरसेवक स्वेच्छा निधीबाबतचा ठराव मंजूर झालेला आहे. त्याबाबत कार्यवाही व्हावी अशी आमची मागणी आहे.

**मा.जिल्हाधिकारी तथा आयुक्त साहेब :-** जशा रक्कमा उपलब्ध होतील तशी बीले पुढील महिन्यापर्यंत काढल्या जातील. सन २०१७-२०१८ स्वेच्छा निधीतील दोन तीन आठवडयात क्लेअर करतो. बजेटच्या ५० टक्के रिलीज करणे बाबत तत्कालीन आयुक्तांनी आदेश काढले आहेत. उर्वरीत ५० टक्के रिलीज करणेबाबत प्रशासन सकारात्मक विचार करील.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** उर्वरीत भुसंपादनाचे पैसे भरण्यास हरकत नाही. कोणीही एकाने श्रेय घेण्याचे प्रयत्न करु नये मी माझे वैयक्तीक मत मांडतो. महानगरपालिकेचाही विचार झाला पाहीजे.

**मा.सौ.उषाताई नलावडे :-** महानगरपालिकेस जागा संपादीत करणे शक्य नसल्यास महाराष्ट्र शासनाने १०० टक्के निधी द्यावा. महानगरपालिकेवर आर्थिक बोजा टाकता कामा नये. लवकरात लवकर उड्डाणपुलाचा प्रश्न मार्गी लावा.

**मा.श्री.किशोर डागवाले :-** यापुर्वीही उड्डाणपुलाची उद्‌घाटने झाली. पण निधी मात्र आला नाही. या उड्डाणपुलासाठी मा.खासदार दिलीपजी गांधी यांचे योगदान आहे. त्यांनी एवढा मोठा निधी उपलब्ध करुन दिला आहे. केंद्रीय मंत्री नितीनजी गडकरी साहेब यांचेही अभिनंदन केले पाहीजे. नगर-कल्याण हायवे ते यश पॅलेस पर्यंतचे रस्त्याचे कामासाठी २८ कोटी रुपये मंजूर केले आहेत. हा चौपदरी रस्ता होणार असुन रस्त्याचे दोन्ही बाजुने फुटपाथ, मध्यभागी स्ट्रीट लाईट यासह रस्ता होणार आहे. या सभागृहाला विनंती मा.खासदार साहेब यांचे प्रयत्नाने निधी उपलब्ध झाला आहे. सर्वांचे वतीने मी त्यांचे अभिनंदनाचा ठराव मांडतो. मा.मुख्यमंत्री महोदय यांचेकडे या शहराचे मा.आमदार, माजी आमदार, शहरातील गटनेते यांनी भेट घेतल्यास मा.अनिल शिंदे यांनी जी सूचना मांडली त्यावर चर्चा होईल. जागा मालकांना सुध्दा याठिकाणी एकदा बोलवा. टीडीआर घेवून जर ते जागा देत असतील तर चांगली गोष्ट आहे. आपण व मा.महापौर यांनी बसून निर्णय घ्यावा.

**मा.श्री.शेख नजीर अ.रज्जाक :-** पाच वर्षापासुन लाईटसाठी मी स्वतः खर्च करतो सभागृहाने याची जाणीव ठेवावी.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** पुणे -शिरुर-औरंगाबाद आठ पदरी रोड होणार आहे. या रस्त्यावर टोल उभारणार आहे. आज जी जागा आपण ताब्यात घेणार ती रोड वाईडींग मध्ये जाणार आहे. काही ठिकाणी कंम्पौंड बांधले आहे. पुल होणार आहे. या कामात पिण्याच्या पाण्याची लाईन, ड्रेनेज लाईन फुटणार आहेत. त्याचा खर्च कोण देणार.

**श्री.दिवाण प्रकल्प संचालक :-** उड्डाणपुला बाबत सर्व सभागृहास माहिती दिली. पुलाची एकुण लांबी ३.०७ किलो मीटर व रुंदी १६.०२ किलो मीटर रुंदीचा हा उड्डाणपुल प्रस्तावीत करण्यांत आलेला आहे. त्यासाठी केंद्रसरकारने ३४७ कोटींची तरतुद केली असुन २८० कोटींची निविदा प्रसिध्द करण्यांत आली आहे. उड्डाणपुलाच्या रॅम्प साठी चार ठिकाणी जागेचे भुसंपादन होणार आहे. त्यासाठी मा.राज्य शासन ७० टक्के व महानगरपालिका ३० टक्के खर्च करेल असा निर्णय मा.राज्य शासनाने घेतला आहे. भुसंपादना बाबत केंद्र शासनाने, राज्य शासनाला जमिन उपलब्ध करुन देण्याची अट घातली आहे.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** आमची महानगरपालिकेची पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन तुटणार आहे.

**श्री.दिवाण प्रकल्प संचालक :-** पुलाच्या चढ-उतार जेथे होतो व चार जिन्यांसाठी एकुण १.४ हेक्टर जमिन नव्याने संपादीत करावी लागणार आहे. यात एक हेक्टर लॅण्ड सरकारी आहे. ४ हेक्टर जागा प्रायव्हेट मालकीची आहे. ती स्टेशन रोड जवळील आहे. १० ऑगष्टला मंत्रालयात बैठक होणार आहे. त्यात युटीलिटी बाबत निर्णय होणार आहे. पाईप लाईनचा जी.आर.अजुन आलेला नाही. याबाबत वारंवार बैठका झाल्या.

शहरातील जमिन ताब्यात नसल्याने या निविदेला मुदतवाढ देण्यांत आली आहे. त्यामुळे वारंवार टेंडर प्रसिध्द करावे लागत आहे. लॅण्ड उपलब्ध झाली नाही तर भविष्यात उड्डाणपुलाचे उभारणीसाठी अडथळे येवू शकतात. नॅशनल हायवेला या आठ-पंधरा दिवसात जर लॅण्ड उपलब्ध करुन दिली तर लवकर टेंडर प्रक्रीया मार्गी लागेल. पुलाची बाकीची कॉस्ट धरुन टोटल कॉस्ट ३४७ कोटी आहे.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** १८,००० चौरस मीटर खर्च दाखवला आहे तो कसा.

**मा.जिल्हाधिकारी तथा आयुक्त साहेब :-** तो अंदाजीत आहे.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** टोल मधुन खर्च वसुल करावा. किंवा मा.शासनाकडे मागणी करावी.

**मा.श्री.योगीराज गाडे :-** ठराव झाल्यानंतर हे काम झाले पाहीजे. गंगाउद्यान ते कलेक्टर ऑफिस पर्यंतच्या रस्त्यासाठी मुलभूत सोयीसुविधा मधे निधी उपलब्ध झाला त्यातुन रस्त्याचे काम करण्यात आले. याकामाचे एक कोटी ८० लाख ठेकेदाराला देयक अदा करण्यांत आले. तीन टप्प्यात या रोडचे काम झाले. या रस्त्यावर दोन खाजगी जागा मालकांनी कंम्पौंड टाकल्याने रस्ता वाहतुकीस खुला करता येत नाही. या खाजगी जागा मालकांचे जागेची भुसंपादनाची रक्कम महानगरपालिकेकडुन उपलब्ध होत नसल्याने जागा मालकाला मोबदला देत नाही. त्यामुळे रस्त्याचे काम अपूर्ण आहे. याबाबत मी वारंवार आपणांकडे पाठपुरावा केला आहे. भविष्यात जर उड्डाणपुलातील खाजगी जागेतील मालकांना जर मोबदला दिला नाही तर ते देखील पुलाचे जागेत कंम्पौंड टाकतील व कामात अडचण येईल भविष्यात याचे नियोजन तुम्ही कसे करणार. टोलच्या उत्पन्नातुन महानगरपालिकेस उत्पन्न मिळाले पाहीजे. आपण प्रयत्न करा

**मा.जिल्हाधिकारी तथा आयुक्त साहेब :-** गंगाउद्यान ते कलेक्टर ऑफिस रोड झाला पाहीजे. नविन कलेक्टर ऑफिस चालू होईपर्यंत रस्ता खुला होईल. टोल मधुन काही रेव्हेन्यू मिळाला पाहीजे. ही सूचना नॅशनल हायवे ॲथोरिटीला पाठवू.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** उड्डाणपुल झाला पाहीजे. ७ कोटी रुपये अतिशय कमी किंमत आहे. इतकी मोठी वास्तु महानगरपालिकेला मिळत आहे उड्डाणपुलामुळे शहराच्या विकासात भर पडणार आहे. राष्ट्रवादी कॉग्रेसचा या गोष्टीला पाठींबा आहे. भुसंपादना पोटी ७ कोटी रुपये भरण्यास आमची हरकत नाही. सर्व राष्ट्रवादी कॉग्रेस या योजनेच्या पाठीमागे आहे. नगररचनाकडील लेखाशिर्षात रक्कम शिल्लक आहे.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** उड्डाणपुलाचा विषय गेल्या अनेक वर्षापासून चालू आहे. उड्डाणपुलाचा प्रस्ताव सात आठ वर्षापासुन चालू आहे. महानगरपालिकेचा हिस्सा एवढा राहील असे महानगरपालिकेला त्यावेळेस सांगीतले नाही. मा.बबनराव पाचपुते, मा.खासदार दिलीपजी गांधी यांनी उद्‌घाटन केले. विकासाचे नावाखाली सभागृहाला अंधारात ठेवले. स्थानिक स्वराज्य संस्थेची जेंव्हा मदत लागली तेंव्हा सर्वजण बोलतात. महानगरपालिका ठेकेदारांचे ३५ कोटी रुपये देणे आहे. कर्मचा-यांचे ग्रॅज्युएटी, पेन्शन विक्री, प्रॉव्हेडंड फंड इत्यादीचे ३२ कोटी देणे आहे. ही देणी देण्यासाठी सेवा जेष्ठता यादी लावण्यात आली आहे. ४ मे २०१८ ला मा.शासनाने पत्र व्यवहार केला तो आम्हाला कळविला नाही. ४ मे २०१८ चे पत्र काय आहे ? ५/९/२०१८ पर्यंत हे टेंडर पुढे गेले आहे. मग सभागृहात हा विषय कसा आणता. तुमची प्रोसेस पुर्ण करा. पुलाचे ड्रॉईंग जेव्हा पास झाले तेंव्हा जमिनीचा मुद्दा नव्हता का. तुम्ही इतक्या वर्षापासुन महानगरपालिकेने करावयाची तरतुद कळविली असती तर आम्ही त्याची प्रोव्हीजन केली असती. यापुर्वीचे ५ बजेट झाले. महासभेला सूचीत का केले नाही. सत्यजीत तांबे यांनी मुंबईत बैठक घेतली तोपर्यंत महानगरपालिकेला माहित नव्हते. महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती अत्यंत नाजुक असल्याने महाराष्ट्र सुवर्ण जयंती योजनेच्या माध्यमातुन पैसे द्या. अगोदर महानगरपालिका कर्मचा-यांचे देणे अगोदर द्या. टोलचा मुद्दा घ्यायला पाहीजे. कॅन्टोन्मेंट मध्ये जकात नाके बंद

झाले. त्यांचेकडुन आम्हाला २६ कोटी रुपये मिळायचे. जकात नाके बंद झाले. पण कॅन्टोन्मेंट पथकर वसुली करतो. आम्हाला पथकर लावायला काय हरकत आहे. पथकर चालू केला तर वर्षाला ३५ ते ४० कोटी रुपये मिळतील. ही सुध्दा अट टाकुन घ्या. बीपीएमसी ॲक्ट मध्ये पथकर वसुलीचा अधिकार स्थानिक स्वराज्य संस्थेला दिलेला आहे. पथकर राज्य शासनाने बंद केलेला नाही. पुल होईल तेंव्हा होईल. कोणती जागा बाधीत होती ती पाच पन्नास नावे सभागृहा समोर आणायला पाहीजे होती. सभागृहाने त्यावर विषय सुचविले असते. जागा मालकांना टीडीआर, भुसंपादन, इतर ठिकाणी जागा देवून पुर्नवसन यावर निर्णय घेता आला असता. आपली महानगरपालिकेची आर्थिक परिस्थती ज्या पध्दतीने पाहीजे तशी नाही. २००३ ला फक्त बजेट ४३ कोटी रुपये होते. केंद्र व राज्य सरकार कडुन मिळणारा निधी जमा बाजू मध्ये दर्शविण्यांत आला होता.व फुगीर बजेट करण्यांत आले होते. रियल बजेट किती आहे. हे रियल बजेट फार तुटपुंजे आहे. महानगरपालिकेच्या उत्पन्नाचा सोर्स असलेले दिल्लीगेट येथीलगाळे पाडले, नेहरुमार्केट पाडले. एकही उत्पन्नाचा सोर्स महानगरपालिकेने उभारला नाही. ज्या प्रॉपर्टी चांगल्या त्या बंद करायच्या. फॉलोअप होत नाही. सर्जेपुरा प्रियदर्शनी कॉम्प्लेक्स पासुन पाच पैसे उत्पन्न येत नाही. टॉवरच्या पैशाला बजेट तरतुद नाही. दोन ते अडीच कोटी रुपयांची कामे टॉवरच्या निधीतुन खतावणी झाली. बजेट हेडला पण मर्यादा आहे. अकौंट कोड मध्ये काहीतरी तरतुदी असतील मा.शासनाने व केंद्र शासनाने दिनांक ०५/०९/२०१८ च्या पुढे जर टेंडर आले तर विचार करावा. केडगांव जवळ बायपास उपलब्ध आहे त्याठिकाणाहून ट्रॅफिक वळवली पाहीजे. शहरात येणारा लोड त्यामुळे कमी होवू शकतो याचा सर्व्हे करा रिझल्ट मिळेल. या पुलाची आवश्यकता किती आहे. सध्या महानगरपालिकेचे जे काही देणे असतील पेन्शन विक्री बंद आहे. हे चूकीचे आहे. सुवर्ण जयंतीचा पॅरा फॉलोअप करा. ५ टक्के मध्ये आम्ही कसे बसवू हे पहा. शासनाकडे रिअल बजेट मांडा. फुगीर बजेट मांडू नका. फेज - २ चे बजेट २३९ कोटींवर गेले. फेज -२ ची मुदत २१/०६/२०१० ला संपली. त्याला ८ वर्ष झाले. मा.शासनाचे जे प्रोजेक्ट १० वर्षे होवूनही संपत नाही. महानगरपालिकेने हिस्सा देवूनही प्रोजेक्ट पुर्ण होत नाही. मा.शासनाचे पैसेसुध्दा वापरात येत नाहीत. डिपॉझिटच्या ठेवी ५० ते १०० कोटींच्या ठेवी वेगवेगळया बँकांमध्ये आहेत. १०० कोटीचे व्याज महानगरपालिकेला किती मिळाले व ते कोठे वापरले ते सांगा. मुलभूत सोयीसुविधा मधील २० कोटींची कामे आजपण अपुर्ण आहेत. शहरात विकास दिसत नाही. डागवाले साहेबांनी २८ कोटी संदर्भात सांगीतले त्यालाही महानगरपालिका हिस्सा साठी पैसे भरायचे कोठून सर्व हिशोब पाहून निर्णय घ्यावा. दिनांक ०५/०९/२०१८ नंतर याचा निर्णय घ्यावा.

**मा.श्री.गणेश भोसले :-** फेज-२ चे कामाचे प्रगती संदर्भात मा.महासभेत विषय घेणे बाबत मी आपणांकडे वारंवार मागणी केली. पत्रही दिले. परंतु सभागृहात चर्चेसाठी हा विषय का येत नाही. आज पुन्हा या संदर्भात पत्र देत आहे. पुढील महासभेत विषय घेणेत यावा.

**मा.श्री.अभिषेक कळमकर :-** उड्डाणपुलाचे काम होत आहे. ही कौतुकास्पद व अभिमानाची बाब आहे. उड्डाणपुल उभारणीपुर्वी निगडीत महानगरपालिकेच्या बाबी असतील तर अजेंडयावर किंवा डायग्राम तयार करुन तो सदस्यांना दिला पाहीजे होता. उड्डाणपुल चढणार त्याठिकाणी जागा किती लागणार ही माहिती देणे आवश्यक होते. उड्डाणपुल संदर्भात जे पत्रव्यवहार करण्यांत आले. ब-याचवेळा तो निधी परत गेला आहे. केंद्र शासनाच्या वतीने तो निधी मिळणार आहे. कुठल्याही प्रकारची तांत्रिक अडचण महानगरपालिके तर्फे होवू नये प्रशासनाने याची काळजी घ्यावी. सक्कर चौक ते स्टेटबँक चौकापर्यंत उड्डाणपुल होणार आहे. त्यासाठी जागा किती संपादीत करणार रुंदी किती वाढविणार सार्वजनिक बांधकाम विभागाने १५ मीटर संपादन केले आहे. ४१ मीटर जागेसाठी कडेला स्लोपसाठी जागा लागणार. कुठल्या सिटी सर्व्हेमध्ये किती जागा लागते याचा सविस्तर प्रस्ताव

महानगरपालिकेला दिला आहे. अपुरी माहिती दिल्याने असा उल्लेख अजेंडयावरील पहिल्या पानावर आहे. आपल्याकडुन कोणताही हलगर्जीपणा करु नये अधिका-यांना सतर्क राहण्याचे आदेश द्यावेत.

**मा.जिल्हाधिकारी तथा आयुक्त साहेब :-** अपुरी माहिती दिली हा मुद्दा सुरुवातीला वेळोवेळी ज्या बैठका झाल्या त्यातील आहे. त्यावेळेचा हा मुद्दा आहे.

**मा.श्री.अभिषेक कळमकर :-** उड्डाणपुलाच्या डिव्हायडर मध्ये स्ट्रीट लाईट लावले जात नाहीत. उड्डाणपुलाच्या खाली मोठया वॅटचे लाईट बसविण्यांत यावे. मनमाड रोड ते डिएसपी चौका पर्यंत हा रस्ता पीडब्ल्यू डी कडे असल्याने मेंटेनन्स कुठल्याही प्रकारचा होत नाही. याकडे दुर्लक्ष झालेले आहे. डीपीडीसी मिटींग मध्ये याबाबीकडे लक्ष वेधावे. उड्डाणपुलाचा ब्ल्यु.प्रीट किंवा डायग्राम पुढील मिटींगपर्यंत मिळावा.

**मा.श्रीमती.नसिम शेख :-** प्राथमिक गरजेचे विषय बाजुला राहतात. वॉर्डात लाईट नाहीत. प्रॉब्लेम चालू आहेत. आपल्या पैशाने नगरसेवक लाईटचा खर्च करतात. प्राथमिक सुविधा नागरिकांना मिळाल्या पाहीजेत. डेंग्यु मलेरिया यासारख्या साथी चालू आहेत. नगरसेवकांचे मानधन वेळेवर मिळत नाही. लाईट व्यवस्था, नियमित कचरा उचलणे व धूर फवारणी ही झाली पाहीजे. मुकुंदनगर मध्ये ५० हजार लोकवस्ती आहे. मुकुंदनगरमध्ये एक उद्यान आमदार निधीतुन बनविले आहे. या उद्यानात मध्यभागी एक डी.पी. आहे. या उद्यानात लहान मुले खेळतात. या डी.पी.मुळे अपघात होण्याची शक्यता आहे. एमएसईबी कडे पत्रव्यवहार केला परंतु याकडे कोणीही लक्ष दिले नाही. तरी उद्यानामधील डी.पी.हलविण्यांत यावी. व या उद्यानासाठी एक कर्मचारी त्या ठिकाणी नियुक्त करुन मिळावा.

**मा.जिल्हाधिकारी तथा आयुक्त साहेब :-** आपण माझे दालनात या संदर्भात चर्चा करावी.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** मागील गाळे धारकांची जी सभा झाली त्यावेळी आपण फक्त विषय पत्रिकेवरील विषय घेवू असे सांगीतले. मागील इतिवृत्त मंजूर झाले आहे का.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** शनिवारीच हा इतिवृत्ताचा विषय मंजूर झाला आहे.

**मा.श्री.सुवेंद्र गांधी :-** प्रथमतः मा.नरेंद्रजी मोदी, नितीनजी गडकरी, देवेंद्रजी फडणवीस यांचे अभिनंदन करतो. परवा मा.मुख्यमंत्री साहेबांना खासदार साहेब भेटले त्यावेळी चर्चा झाली. उड्डाणपुलासाठी ९० टक्के राज्य शासन देणार व १० टक्केच महानगरपालिकेला द्यावे लागणार आहेत. नगर-करमाळा, नगर-जामखेड-बीड, नगर-कोपरगांव-शिर्डी रस्ता मंजूर झाला आहे. महानगरपालिकेला काही हातभार लावावा लागणार आहे. सर्वांनी या विषयास मान्यता द्यावी.

**मा.श्री.दिलीप सातपुते :-** १५ वर्षापुर्वी पुणे - शिरुर ते नगर पर्यंतच्या रस्त्याचे दुपदरी करणासह टेंडर झाले त्यामध्ये नगरच्या उड्डाणपुलाचा समावेश होता. या रस्त्यावर ठेकेदाराने टोल वसुली केली. उड्डाणपुल ही नगर शहराची महत्वाची गरज आहे. त्यावेळी ६० कोटी रुपयांचे अंदाजपत्रक या पुलाचे होते. ट्रायपिटचे काम सक्कर चौकाजवळ चालू झाले त्यावेळी कामगारांना मारहाण करुन पळून लावण्यांत आले. आज जवळ पास २०० कोटीच्या वर हे काम गेले आहे. यावेळी जर पुन्हा असे झाले तर कोणाला जबाबदार धरणार.

**मा.जिल्हाधिकारी तथा आयुक्त साहेब :-** आम्ही पोलीस प्रोटेक्शन देवू.

**मा.श्री.दिलीप सातपुते :-** टी.पी.च्या काही फाईल आपणांकडे पेंडींग आहेत.

**मा.जिल्हाधिकारी तथा आयुक्त साहेब :-** ६०० स्क्वेअर मीटरचे पॉवर मी डेलीगेट केले आहेत.

**मा.श्री.दिलीप सातपुते :-** अजुन जास्त करता आले तर पहा.

**मा.जिल्हाधिकारी तथा आयुक्त साहेब :-** मी पाहतो.

**मा.श्री.संजय घुले :-** डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे पुतळा उभारणे साठीचा प्रस्ताव आपणांकडे सहीसाठी पाठविला आहे. उड्डाणपुलाचे काम सुरु होईल त्यावेळी अनेक अडचणींना सामोरे जावे लागणार आहे. तरी सदर भुसंपादनाची फाईल लवकरात लवकर मार्गी लावावी ही विनंती.

**मा.श्री.विजय गव्हाळे :-** महानगरपालिकेच्या बजेट मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा उभारणेसाठी या बजेटमध्ये ५० लाखांची तरतुद केली आहे का नाही.

**शहर अभियंता :-** २० लाखांची तरतुद केली आहे. मार्च पर्यंत ही तरतुद राहील.

**मा.श्री.विजय गव्हाळे :-** रिॲप्रोप्रिएशन मध्ये ही तरतुद वाढवावी.

**मा.जिल्हाधिकारी तथा आयुक्त साहेब :-** रिॲप्रोप्रिएशनमध्ये तरतुद वाढविता येईल.

**मा.श्री.सचिन जाधव :-** आज हा उड्डाणपुलाचा महत्वाकांक्षी प्रकल्प झालाच पाहीजे. त्यासाठी महानगरपालिकने ७ कोटी काय ७० कोटी द्यायला सांगीतले तरी दिले पाहीजे. यापुर्वी ज्या जागा रिक्वायर झाल्या त्याच कंपनीने ॲक्विझिशनचे पैसे दिले आहेत. आमचेपर्यत हा विषय कधीच आलेला नाही. उड्डाणपुलाची प्रोसेस शेवटच्या टप्प्यात आहे. ज्यांची जागा जाणार आहे त्यांना ३० टक्के रक्कम महानगरपालिकेस द्यावी लागणार आहे. हा विषय केंव्हा आला.

**शहर अभियंता :-** हा विषय पहिल्या पासुन होता. शहरी भागात फ्लाय ओव्हर बांधण्याची जबाबदारी महानगरपालिकेची आहे. केंद्र शासनाने असे निर्धारीत केले आहे की, फ्लाय ओव्हरचा हिस्सा महानगरपालिकेने द्यावा. जमिनीचा खर्च संबंधित म्युनिसिपल कौन्सीलने करावा. कंन्स्ट्रक्शनचा खर्च केंद्रसरकार करणार आहे.

**मा.श्री.सचिन जाधव :-** ड वर्ग महानगरपालिका डी क्लासीफाय झालेली आहे. हा रस्ता नॅशनल हायवे २२२ करीत आहे. डी क्लासीफिकेशनची पोझीशन आम्हाला सांगा.

**मा.जिल्हाधिकारी तथा आयुक्त साहेब :-** सध्या नॅशनल हायवे मध्ये कनव्हर्ट झाला आहे.

**मा.श्री.सचिन जाधव :-** या रोडवर काही हॉटेल मालक आहेत. प्लॉट सोडुन ४-५ मीटर बांधकाम परवानगी मिळते. काही प्लॉट धारकांना जागा शिल्लक राहणार नाही. प्लॉटच शिल्लक राहणार नाही.

**श्री.दिवाण,प्रकल्प संचालक :-** शहरी भागासाठी हद्दीच्या कडेपासुन ३ ते ६ मीटर पर्यंत बांधकामाला परवानगी देतो.

**मा.श्री.सचिन जाधव :-** पुर्वीच्या हद्दीपासुन समजण्यात यावा. जे काही आज अस्तित्वात आहे त्याला हे लागू राहणार नाही. नविन साठी नियम लागू राहणार. शहरी भागात २ ते ३ हजार स्क्वेअर फुटाचे प्लॉट आहेत. सरळ येणे काढले की चारटाईम धरुन काढले.

**मा.जिल्हाधिकारी तथा आयुक्त साहेब :-** चार टाईम धरुन काढले आहे. रुरल अर्बन एरियासाठी दोन पट आहे.

**मा.श्री.सचिन जाधव :-** जी काही दीड दोन मीटर जागा घेणार आहे डी.पी.आर. मध्ये ड्रेनेज लाईन, पिण्याच्या पाण्याच्या लाईन जाणार ते जर धरले नसतील तर धरले जावे. व त्यासाठी राज्य किंवा केंद्र शासनाकडून निधी मिळावा.

**श्री.दिवाण प्रकल्प अभियंता :-** रस्ता खराब होणार आहे. पुलाखालील रस्ता सुध्दा सुस्थितीत करुन महानगरपालिकेच्या ताब्यात देणार. ड्रेनेज लाईन, पिण्याची पाईप लाईन शिफ्ट करणे, युटीलिटी या बाबी शासना कडुन मंजूरी घेवून करावी लागेल.

**मा.श्री.सचिन जाधवः-** छत्रपती शंभू राजेंचा पुतळा आर्टीस्ट कडे आहे. त्यासाठी ६-६ महिने आम्हाला थांबावे लागते. आपल्या जवळ येवून एखादे काम थांबता कामा नये. कामा संदर्भात संबंधीत नगरसेवक व

अधिकारी यांचेशी चर्चा केल्यास मार्ग निघेल. आमचे शेवटचे तीन-चार महिने राहीले आहेत. तुमच्यापर्यंत विषय जात नाही. राहीलेले बजेट रिलीज करा.

**मा.जिल्हाधिकारी तथा आयुक्त साहेब :-** मा.महापौर मॅडम यांचेबरोबर चर्चा करतो व बजेट रिलीज बाबत निर्णय घेतो.

**मा.सौ.दिपाली बारस्कर :-** आयुक्त आपण सक्षम आहात. छोटी मोठी कामे स्वखर्चातुन करावी लागतात. ३० टक्के निधी भरतांना विचार व्हावा. ३० टक्के भरायचे असतील तर जमिन मालकांना टीडीआर स्वरुपात रक्कम द्यावी. नगरसेवक निधी लवकरात लवकर रिलीज करण्यांत यावा. टेंडर प्रोसेस होण्यासाठी लवकरात लवकर निर्णय घ्यावा. फेज - २ चे कामा संदर्भात वारंवार बैठका झाल्या शेवटच्या बैठकीत सावेडीतील कामाकरीता २५ जुलै पर्यंत डेडलाईन दिली गेली होती परंतु अद्यापही काम झालेले नाही. बजेटमध्ये नागरी सुविधा करीता ५ कोटी तरतुद होती. ती तरतुद संपली ठेकेदार काम करण्यास तयार नाहीत. त्या हेडवर पैसे वाढवावेत.

**मा.महापौर मॅडम :-** रिॲप्रोप्रिएशन मध्ये निधी वाढवुन घेवू.

**मा.जिल्हाधिकारी तथा आयुक्त साहेब :-** याबाबत आम्ही चर्चा करतो.

**मा.महापौर मॅडम :-** विषय क्रमांक ५ इतिवृत्त दुरुस्तीसह कायम करण्यांत येत आहे.

**मा.श्री.अभय आगरकर :-** नियमानुसार कारवाई करावी. शासनाचे परिपत्रक येतील त्याप्रमाणे कारवाई करावी आपण १० टक्केचा ठराव केला व शासनाने मंजूरी दिली नाहीतर अडचणी येतील.

**मा.महापौर मॅडम :-** उड्डाणपुलासाठी आवश्यक जागा मंजूर विकास योजनेत दर्शविणे बाबतच्या फेरबदल करण्यास ही सभा मान्यता देत आहे. मा.शासनाचे परिपत्रकानुसार प्रशासनाने कार्यवाही करावी.

---*---

**ठराव :-**

ऑफिस रिपोर्ट व महासभेत झालेल्या चर्चेनुसार उड्डाणपुलासाठी आवश्यक जागा मंजूर विकास योजनेत दर्शविणे बाबतचा फेरबदल करण्यास ही सभा मान्यता देत आहे. भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण अंदाजे रु.२८० कोटी खर्चून महानगरपालिकेच्या हद्दीत उड्डाणपुल बांधणार असल्याने उड्डाणपुलासाठी आवश्यक असणारी खाजगी तसेच शासकीय जमीन भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांना हस्तांतरीत करण्यासाठी येणा-या खर्चास व दिनांक ०४/०५/२०१८ च्या शासन निर्णयानुसार व त्यानंतर अद्यावत होणा-या शासन निर्णया नुसार महानगरपालिके मार्फत करण्यास व आवश्यकता वाटल्यास जागा भूसंपादनासाठी टी.डी.आर. चा वापर करणेस ही सभा मान्यता देत आहे. तसेच टोलच्या उत्पन्नातुन महानगरपालिकेस उत्पन्न मिळणेच्या दृष्टीने प्रशासनाने योग्य तो प्रस्ताव मा.शासनाकडेस सादर करावा.

नियमानुसार पुढील उचित कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री.अनिल माधवराव शिंदे,
अनुमोदक :- मा.श्री.सचिन तुकाराम जाधव,
ठराव सर्वानुमताने मंजूर.

सही/-
महापौर
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक :- ०८** **दिनांक : ०२/०८/२०१८.**

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

**प्रस्तावाचा विषय :-** नालेगांव स.नं.१२ या जमिनीतून जाणारा मंजूर विकास योजना (वाढीव हद्द) अहमदनगर मधील नियोजीत १५ मी.रुंदीचा विकास योजना रस्ता वगळणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना १९६६ मधील कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही करणे बाबत...

संदर्भ :- १) श्री.व्यंकटेश सह.गृह.निर्माण संस्थेचे सभासद २३/०८/२०१८

२) सौ.सुवर्णा दत्ता जाधव स्थायी समिती सभापती, ३) मा.सुनिता दत्तात्रय मुदगल उपसभापती,

४) मा.श्री.संजय छगनराव शेंडगे, गटनेता, शिवसेना

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

संदर्भ : १) श्री.व्यंकटेश सह गृह निर्माण संस्थेचे सभासद यांचा दिनांक २३/०८/२०१७ रोजीचा अर्ज.

२) सौ.सुवर्णा दत्ता जाधव, स्थायी समिती, सभापती मनपा, अ.नगर यांची दि.११/०९/२०१७ रोजीची यादी.

३) मा.सुनिता दत्तात्रय मुदगल, उपसभापती महिला बालकल्याण समिती, मनपा,अ.नगर यांची दिनांक ११/०९/२०१७ रोजीची यादी.

४) मा.श्री.संजय छगनराव शेंडगे, गटनेता शिवसेना,मनपा,अ.नगर यांची दिनांक १३/०९/२०१७ रोजीची यादी.

विषयांकित प्रकरणी श्री.व्यंकटेश सह गृह निर्माण संस्थेचे सभासद यांनी मौजे नालेगांव स.नं.१२ या जमिनीमधुन जाणारा १५.०० मी.रुंदीचा विकास योजना रस्ता वगळणे बाबत मागणी केलेली आहे. तसेच उपरोक्त पदाधिकारी यांनी संदर्भीय पत्रे देवुन सदर रस्ता वगळणे बाबत मागणी केलेली आहे. त्या अनुषंगाने विषयांकित प्रकरणी सविस्तर अहवाल खालील प्रमाणे सादर करीत आहे.

अहमदनगर शहराच्या वाढीव हद्दीच्या विकास योजनेत शासनाने दिनांक ४ एप्रिल २०१२ रोजीच्या अधिसुचनेव्दारे मंजुर केलेली आहे. सदर मंजुर विकास योजनेत मौजे नालेगांव स.नं. १२ मधुन दक्षिणोत्तर १५.०० मी. रुंदीचा रस्ता प्रस्तावित आहे.

विषयांकित मौजे नालेगांव स.नं.१२ ही जमिन व्यंकटेश सह गृह निर्माण संस्थेच्या मालकीची असुन संस्थेने सन १९८७-१९८८ मध्येच जमिनीचे ३००.०० चौ.फुटाचे तुकडे करुन दुर्बल घटक लोकांना विक्री केलेली आहे. व त्यानुसार प्रत्यक्ष जागेवर बांधकामे होवुन विकास झालेला आहे. त्यामुळे सदर रस्ता प्रत्यक्ष जागेवर ४.५ मी. रुंदीचा विद्यमान रस्ता आहे. विषयांकित जमिन सन १९९९ मध्ये तत्कालीन नगरपरिषदेची हद्दवाढ झाल्याने नगरपरिषद हद्दीत समाविष्ट झालेली आहे.

तत्कालीन नगरपरिषद हद्दीमध्ये नव्याने समाविष्ट झालेल्या १२ गावांचा विकास आराखडा तयार करुन शासनास मंजुरीकरीता पाठविणेत आला होता. विषयांकित जमिनीत झालेला विकाससाचा विकास आराखडा तयार करतांना विचारात घेतला नसल्याचे दिसुन येते. विकास आराखडा तयार करण्यापुर्वीच सदर जमिनीचा विकास झालेला आहे. मंजुर विकास योजनेतील नियोजित १५.०० मी. रुंदीच्या रस्तयाने ९४ भुखंड बाधीत होतात. सदर भुखंडामध्ये बरीच पक्की बांधकामेही आहेत सदर विकास योजनेतील १५.०० मी. रुंदीच्या रस्त्याने ३००.०० चौ.फुटाचे ९४ भंखंड बाधीत होत असल्याने सदर दुर्बल घटक भुखंड धारकांचे नुकसान होत आहे.

सबब नालेगांव स.नं.१२ मधुन मंजुर विकास योजनेतील १५.०० मी. रुंदीचा जाणारा रस्ता नगर-कल्याण रोड ते नालेगांव स.नं.१२ च्या दक्षिणेकडील सिमेवरील १२ मी. रुंदीच्या विकास योजना रस्ता पर्यंत (भागश:) वगळणे बाबत महाराष्ट्र प्रादेशीक व नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम ३७ अन्वये वैधानिक कार्यवाही पुर्ण करुन शासनास तसा प्रस्ताव सादर करणे योग्य होईल असे मत आहे. तसेच या करीता येणा-या खर्चास मंजुरी देणे आवश्यक आहे. तरी सदर प्रस्ताव मंजुरीसाठी मा.महासभेपुढे सादर करणे बाबत आदेशार्थ सादर.

यावर मा.जिल्हाधिकारी तथा आयुक्त अहमदनगर महानगरपालिका यांचा अभिप्राय की, एमआरटीपी ॲक्ट मधील कलम ३७ सह चर्चा करावी Pl. discuses

यावर मा.जिल्हाधिकारी तथा आयुक्त अहमदनगर महानगरपालिका यांचा अभिप्राय की, चर्चा केली. प्रस्ताव मा.महासभेकडे पाठवा.

यावर मा.महापौर मॅडम, अहमदनगर महानगरपालिका यांचा अभिप्राय की, मा.महासभा

**चर्चा :-**

**मा.श्री.संजय घुले :-** ज्यांचे पत्रावर हा विषय घेतला त्या व्यंकटेश मजूर सह.गृह निर्माण संस्थेचा रजिस्टर्ड नंबर किती आहे. ते सांगता का.

**मा.श्री.किशोर डागवाले :-** असा विषय घेवून रस्ता कमी करता येतो का.

**मा.श्री.संजय घुले :-** हद्दवाढ लिंकरोड पर्यंत होती आता बायपास पर्यंत हद्द गेली आहे. खरेदी खतातील एकाचीही प्रस्तावावर सही नाही.

**मा.श्री.किशोर डागवाले :-** उद्या आम्ही पत्र देतो दिल्लीगेट ते पत्रकार चौक पर्यंतचा रस्ता कमी करा. कमी करणार का. हा विषय ना - मंजूर करा रस्ता आहे तेवढाच ठेवा.

**सहा.नगररचनाकार जोशी :-** मा.संजय शेंडगे, मा.सुवर्णाताई जाधव यांनी दिलेल्या पत्रानुसार व वस्तुस्थिती नुसार सदस्यांनी पत्र दिले आहे. ३०० फुट प्लॉट विकले आहेत. जागेवर डेव्हलपमेंट झाली आहे. वस्तुस्थिती नुसार सुचविले आहे. शासनाची फेरबदलास मंजूरी घ्यावी लागेल. आम्हाला करता येणार नाही. शासनाकडे पाठवावे लागेल. फेरबदल ६७ ची कार्यवाही करुन शासनाकडे पाठवावे लागेल.

**मा.श्री.संजय घुले :-** या विषयावर मतदान घ्या.

**मा.महापौर :-** नालेगांव स.नं.१२ या जमिनीतून जाणारा मंजूर विकास योजना (वाढीव हद्द) अहमदनगर मधील नियोजीत १५ मी.रुंदीचा विकास योजना रस्ता वगळणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना १९६६ मधील कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही करणेस ही सभा मान्यता देत आहे. व त्यावर हरकती व सूचनांची कार्यवाही करावी.

**मा.श्री.किशोर डागवाले :-** या विषयावर रुलिंग द्या.

**मा.श्री.गणेश कवडे :-** पिठासीन अधिकारी यांनी रुलिंग दिले आहे.

**मा.श्री.संजय घुले :-** यात फार मोठा आर्थिक घोटाळा झाला आहे. यावर मतदान घ्या.

**मा.श्री.किशोर डागवाले :-** रजिस्ट्रेशन नंबर संबंधीत संस्थेला आणायला सांगा स्थगीत ठेवा पुढच्या बोर्डात घ्या.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** त्या ठिकाणी गरीब लोक राहतात. यांचा विरोध नोंदवून घ्यावा.

**मा.श्री.अभय आगरकर :-** काहींचे म्हणणे रजिस्ट्रेशन नंबर नाही. काहींचे म्हणणे मंजूर करु नका. यावर मी मध्य काढतो जो पर्यंत रजिस्ट्रेशन नंबर येत नाही तोपर्यंत त्याला परवानगी देवू नका.

**मा.महापौर मॅडम :-** ठिक आहे. जोपर्यंत रजिस्टेशन नंबर देत नाही. तोपर्यत त्यांना परवानगी देवू नये.

**मा.सौ.उषा ठाणगे :-** दातरंगे मळयात गेल्या सहा महिन्यापासून दोन तीन ठिकाणी दुषित पाणी येते कोणीही अधिकारी आले नाहीत व आले तरी त्यांनी नगरसेवकांची भेट घेतली नाही.

**उपअभियंता श्री.काकडे :-** मागच्या आठवडयात आपली भेट घेतली पण आपण हा विषय घेतला नाही. दोन दिवसात पाहून घेतो.

**मा.सौ.उषा ठाणगे :-** फेज-२ ची लाईन टाकुन मिळाली नाही. व दातरंगे मळयात काही ठिकाणी घाण पाणी येते.

**अभियंता श्री.काकडे :-** फेज-२ ची लाईन चालूच नाही. जूनी लाईन चेक करतो.

---*---

**ठराव :-**

ऑफिस रिपोर्ट व महासभेत झालेल्या चर्चेनुसार नालेगांव स.नं.१२ या जमिनीतून जाणारा मंजूर विकास योजना (वाढीव हद्द) अहमदनगर मधील नियोजीत १५ मी.रुंदीचा विकास योजना रस्ता वगळणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना १९६६ मधील कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही करणेबाबत ही सभा मान्यता देत आहे. सदर प्रस्तावावर सुचना हरकती मागविणे बाबत मा.आयुक्त यांना अधिकार देण्यांत येत आहे.

नियमानुसार पुढील उचित कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री.गणेश खंडेराव कवडे,

अनुमोदक :- मा.श्री. अनिल माधवराव शिंदे,

ठराव सर्वानुमताने मंजूर.

सही/-

महापौर

अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक :- ०९** **दिनांक : ०२/०८/२०१८.**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील पथदिव्यांचे देखभाल व दुरुस्ती बाबत...

संदर्भ :- दिनांक २७/०३/२०१८ रोजी महापौर, पदाधिकारी,नगरसेवक व संबंधीत प्रतिनीधींसमवेत झालेली बैठक.

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

संदर्भ -: दिनांक २७/०३/२०१८ रोजी महापौर, पदाधिकारी,नगरसेवक व संबंधीत प्रतिनीधीं समवेत झालेली बैठक.

विनंतीपुर्वक अहवाल सादर करण्यात येतो की, उपरोक्त संदर्भान्वये मा.महापौर, उपमहापौर, पदाधिकारी, नगरसेवक, विद्युत विभागाचे अभियंते, लाईटींग इन्व्हायरमेंट डिझाईन या कंपनीचे प्रतिनीधी समवेत बैठक पार पडली.

सदर बैठकीमध्ये प्रामुख्याने अहमदनगर शहरातील पथदिव्यांच्या व्यवस्थेबाबत चर्चा झाली. लाईटींन्व्हायरमेंट डिझाईन या कंपनीस महानगरपालिकेने विद्युत विभागाचे एनर्जी ऑडीट करण्यासाठी वर्क ऑर्डर व कार्यारंभ आदेश जावक क्र.विद्युत विभाग / टेंडर/ ३४८ दिनांक १६/११/२०१७ अन्वये कार्यारंभ आदेश देवुन सदर आस्थापनेने महानगरपालिका क्षेत्रामध्ये सदर पाहणी व सर्वेक्षण करुन दिनांक ०९/०१/२०१८ रोजी एनर्जी ऑडीट बाबतचा अहवाल सादर केला आहे. सदर अहवालाचे अवलोकन केले असता त्यामध्ये प्रामुख्याने पथदिवे व्यवस्थेमधील अडीअडचणी व त्रुटी नमुद करुन उदा. मीटर कार्यरत नसणे, मीटर बंद असणे किंवा चालु असतील तर ते योग्य रित्या न चलणे, पॅनल बॉक्स सुस्थितीत नसणे, फिडर सुस्थितीत नसणे, वीज वाहक तारा, जमिनीखालील केबल पोलवरुन जाणारे केबलस् इ. सुस्थितीत नसणे, धोकेदाय असणे पोलवरील पथदिव्यांचे बल्बस, टयुबस्, एल.ई.डी.दिवे व त्यासंबंधीचे दिवे सुस्थितीत नसणे इत्यादी बाबींमुळे या व्यवस्थेमध्ये वीज जास्त प्रमाणात वापरली जाउन वारंवार बिघाड हाणे, जळण्याचे प्रमाण जास्त आहे व या गोष्टीमुळे या संपुर्ण व्यवस्थे्वर विपरीत परिणाम झालेला आहे. याकरीता संबंधीत आस्थापनेने उपाय योजना सुचवून यामध्ये प्रामुख्याने सदोष मीटर बदलणे, सर्व मीटर कार्यरत ठेवणे, मीटरची संख्या वाढविणे, फिडर पॅनल बॉक्स, स्वीच बॉक्स, इ. अद्यावत करणे आवश्यक त्या ठिकाणी नविन बसविणे, वीज वाहक तारा केबल्स वायरींग इ. योग्य त्या क्षमतेचे वापरण्यो सद्यस्थितीत कार्यरत असलेले पथदिव्यांचे बल्ब, ट्युब, सोडीयम दिवे, (जुनी व्यवस्था) कि, जे जास्त वीज घेतात अशी प्रणाली बदलुन नविन अद्यावत व उच्च तंत्रज्ञानाची व्यवस्था करणे तसेच सदर व्यवस्था स्वयंचलित करण्याबाबत शिफारस केली आहे. संदर्भीय बैठकीमध्ये वरील बाबींबाबत सविस्तर चर्चा होउन एल.ई.डी. या कंपनीच्या प्रतिनिधींनी सदर बाबत ESCO पध्दतीने निवीदा काढून सदरचे पथदिव्यांचे देखभाल दुरुस्तीस आवश्यक लागणारे मटेरियल तांत्रिक व आवश्यक कर्मचारी या बाबत कार्यवाही केल्यास महानगरपालिकेचे वीज बीलामधील मोठी बचत सुमारे ६०% पर्यंत होउ शकते असा अनुभव असल्याचे त्यांनी बैठकीमध्ये नमुद केले यावर सविस्तर व सांगोपांग चर्चा होउन राबवयाच्या प्रकल्पामध्ये भविष्यात सदर काम घेणारी संस्था व महानगरपालिका यांची काय काय जबाबदारी असेल याबाबत संबंधीताकडून माहिती घेतली या चर्चेतील प्रमुख मुद्दे खालील प्रमाणे :-

१) ESCO पध्दतीने जाहिर निवीदा काढणे

२) यामध्ये पात्र निविदा धारक कंपनीस सर्वसाधारणपणे १० वर्षाच्या कालावधीत देखभाल दुरुस्तीसाठी देणे.

३) निवीदाधारक कंपनी यांनी अस्थित्वातील पथदिव्यांच्या व्यवस्थेतील जुने व कालबाह्य सर्व प्रकारचे दिवे बदलून नवे तंत्रज्ञानाचे अद्यावत दिवे स्वखर्चाने बसविणे.

४) या व्यवस्थेमधील फिडर पॅनल बॉक्स, स्वीचेस केबल्स, सर्व्हीस वायर आय.एस.ओ.मार्क इत्यादी व्यवस्था बदलणे.

५) ज्या भागामध्ये महानगरपालिकेने करारनामा करते वेळे पर्यंत पथदिव्यांची व्यवस्था केलेली नाही. फक्त ती व्यवस्था महानगरपालिकेने स्वखर्चाने उभारुन देणे.

६) नविन उभारल्या जाणा-या व्यवस्थेमधुन जी वीज बचत होईल त्या बचत झालेल्या वीजेच्या आर्थिक मोबदल्यापैकी १०% हिस्सा महानगरपालिकेस मिळेल व उर्वरित संपुर्ण हिस्सा संबंधीत कंपनीस मिळेल. सदर व्यवस्था कार्यान्वित करताना खालील बाबींची पुर्तता संबंधीताने करणे आवश्यक आहे.

१) आवश्यक त्या ठिकाणी व पुरेसे विद्युत मीटर महानगरपालिकेने बसविणे आवश्यक आहे.

२) सद्यस्थितीत महानगरपालिकेची आर्यरत असलेले पथदिवे व त्या सोबत आवश्यक साहित्य महानगरपालिकेकडे जमा करणे आवश्यचक आहे.

३) देखभाल दुरुस्तीची कामकाज अस्तांतरीत केल्यापासून संपूर्ण शहरातील पथदिवे १००% चालू ठेवणे बंधनकारक राहील.

४) पथदिवे बंदचे किंवा देखभाल दुरुस्तीची तक्रार प्राप्त झाल्यानंतर ठराविक कालावधीमध्ये (दोन दिवस) दोष दुरुस्ती करणे बंधनकारक राहील.

५) टेंडर कालावधीमध्ये होणारे होणारे वीज बचतीचे निश्चितीकरण हे त्रयस्थ पक्ष (थर्ड पार्टी) कडून उदा. शासकीय विभाग, शासनमान्य संस्था, इ.कडून निश्चितीकरण झाल्यानंतर पुढील कार्यवाही केली जाईल.

६) याबाबत काही विवाद उपस्थित झाल्यास तो शासकीय मानांकनानुसार व शासकीय विभागाचे अहवालानुसार पुढील कार्यवाही केली जाईल.

७) संबंधीत निवीदा धसारकांस पथदिव्यांचे देखभाल दुरुस्तीचे संपूर्ण यंत्रणा व त्यासाठी लागणारे सर्व मटेरीयल साहित्य तांत्रिक व इतर कर्मचारी स्वखर्चाने पुरवावे लागतील.

८) संबंधीत निवीदा धारकास महानगरपालिकेचे मनुष्यबळ हवे असल्यास ते उपलबधतेनुसार देता येईल परंतु त्यांचे संपुर्ण वेतन संबंधीत निवीदाधारकाकडून वसुल करण्यात येईल.

९) दिलेल्या मुदतीत दोष दुरुस्ती न केल्यास होणा-या विलंबाबाबत संबंधीत निवीदा धारकास महानगरपालिकेने निश्चित केलेल्या दंडाची आकारणी केली जाईल.

१०)महानगरपालिकेचे सर्व रस्ते, सार्वजनिक जागा व ज्या ज्या ठिकाणी महानगरपालिकेचे पथदिवे आहेत त्या सर्व ठिकाणी पथदिव्यांचे प्रकाशाची योग्य ती घनता (Liman) राखणे बंधनकारक राहील.

११)एल.ई.डी. कंपनीने त्यांच्या अहवालामध्ये सुचविल्याप्रमाणे सदर कामाचे तीन टप्पे सुचविले असुन पहिल्या टप्प्यामध्ये त्यांनी देखभाल दुरुस्ती महानगरपालिकेने करावयाचे सुचविलेले आहे. परंतु सदर बाब योग्य नसुन करारनाम्याच्या दिनांकापासून संपूर्ण जबाबदारी नियुक्त ठेकेदाराची राहील.

१२) संबंधीत ठेकेदार संस्थेस प्रत्येक पोलमागे ठराविक रक्कम देणे पालिकेच्या हिताचे नाही.

१३) करारनामा झाल्यानंतर महानगरपालिकेने सहा महिन्याची बँक गॅरंटी म्हणून ठराविक बँकेत डिपॉझिट ठेवणे योग्य होणार नाही.

सद्यस्थितीत महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये सर्वसाधारण पणे ३६,५०० इतके पथदिवे असुन या पथदिव्यांच्या विजेच्या वापरापोटी दरमहा अंदाजे रक्कम रुपये ५४,००,०००/- इतके बील येते. सर्वससाधारण पणे एका वर्षासाठी

पथदिव्यांचा येणारा खर्च खालील प्रमाणे :-

| अ.नं. | वार्षिक खर्च | रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | MSEDL चे वार्षिक बील | ६,६०,००,०००/- |
| २ | देखभाल दुरुस्तीसाठीचे मटेरीयलचे वार्षिक खर्च | ७०,००,०००/- |
| ३ | महानगरपालिकेच्या कर्मचा-यांचे वेतनावरील खर्च | १,४४,००,०००/- |
| | **एकुण** | **८,७४,००,०००/-** |

तरी वरील प्रमाणे सर्वसाधारणपणे एका वर्षासाठी पथदिव्यांचे देखभाल दुरुस्तीसाठी वरील प्रमाणे अंदाजे रक्कम रुपये ८,७४,००,०००/- एवढा खर्च येतो. सदर प्रस्तावाचा विचार केल्यास येणा-या विद्युत बिलाच्या सर्व साधारणपणे ६०% बचत होणार. असे एल.ई.डी.कंपनीच्या अहवालानुसार ६०% पर्यंत बचत झाल्यास महानगरपालिकेच्या १ वर्षासाठी सुमारे ३,९६,००,०००/- एवढी बचत होईल व त्यापैकी १०% रक्कम म्हणजे ३,९६,०००/- मनपास फायदा होईल व उर्वरीत रक्कम संबंधीत ठेकेदार कंपनीसअदा करावी लागेल. तसेच देखभाल दुरुस्तीचे साहित्य व कर्मचा-यांवरील होणारा महानगरपालिकेचा खर्चात बचत होवून महानगरपालिकेचा आर्थिक फायदा होईल.

तरी वरील सर्व बाबींचा विचार करता अशा प्रकारचे योजना राबविलेल्या महानगरपालिकेकडून सविस्तर माहिती घेवुन सदर कामाची ई-निवीदा प्रसिध्द करुन पुढील कार्यवाही करणे उचित होईल. असे इकडील मत आहे. तसेच सदर बाब ही महानगरपालिकेच्या आर्थिक बाबींची व धोरणात्मक निर्णयाशी संबंधीत असल्याने सदर प्रस्ता मा.महासभेस सादर करुन महासभेच्या निर्णयानुसार पुढील कार्यवाही करणे योग्य होईल. आदेशार्थ सादर.

यावर शहरअभियंता यांचा अभिप्राय की, उपरोक्त प्रस्तावाचे अवलोकन केले असता ESCO पध्दतीने शहरातील दिवे देखभाल दुरुस्तीसाठी दिल्यास मनपाचा आर्थिक फायदा होईल मात्र सदर बाब धोरणात्मक असलेने मा.महासभेची पूर्व मंजूरी घेणे आवश्यक आहे. मा.महासभेच्या निर्णयानुसार पुढील कार्यवाही करणे उचित वाटते तथापि आदेशार्थ सादर.

यावर मा.अति.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, ESCO पध्दतीने शहरातील पथदिवे देखभाल दुरुस्ती मनपाचा आर्थिक फायदा होणार आहे. तथापि धोरणात्मक बाब असल्याने मा.महासभेची मंजुरी घेणेत यावी. तसेच मु.ले.प.यांचा अभिप्राय घेणेत यावा.

यावर मुख्यलेखापरीक्षक यांचा अभिप्राय की, (१) ESCO पध्दतीने शहरातील पथदिवे देखभाल दुरुस्ती बाबत PMC च्या अहवालात मनपातील सद्य स्थितीत असलेले ३६,५००/- पथदिव्याची किंमत किती. व त्याची विनियजोन काय याबाबत खुलासा केला नाही. (२) सद्यस्थितीतज मनपाला प्रती वर्षी वीज बिलासह इतर खर्च धरुन रक्कम रु. ८,७४,००,०००/- इतका असुन सदरची ESCO योजना वापरल्यास मनपाला प्रति महिना प्रती वर्षे किती खर्च येईल हे नमुद नाही तसेच त्यामुळे मनपाचे आर्थिक फायदा किंवा नुकसान होत नाही. याबाबत पीएमसी ने अभिप्राय स्पष्ट नाही. (३) ESCO पध्दतीने मनपा हद्दीतील सर्व पथदिवे एलईडी व इतर सुविधा बाबत अपेक्षित खर्च किती येणार आहे हे पीएमसी ने नमुद केले नाही. त्या प्रमाणे एलईडी किती व्हॅट व कोणत्या कंपनीच्या फिडर पॅनल, पॅनल बॉक्स, स्वीचेस केबल, सर्व्हीस वायर इत्यादी कोणत्या कंपनीची राहणार आहे हे नमुद नाही. (४) भविष्यातील पथदिव्यात होणारी वाढ त्यासाठी करावा लागणा-या पोल / केबल भांडवली खर्च कोणी ? करावयाच्या याबाबत पीएमसी ने अभिप्राय दिले नाहीत. तसेच दरवर्षी उभारलेल्या पोलला कलर व त्यावरील जाहीरातीच्या उत्पन्ना बाबत पीएमसीचे अहवाल स्वयंस्पष्ट नाहीत. (५) सदरची योजनेसाठी एकुण अपेक्षीत खर्च कीती आहे. त्यानुसार सदरची योजना राबविण्याची किती वर्षाची मुदत देणे आवश्यक आहे याबाबत पीएमसीचा अहवाल स्पष्ट नाही. (६) सद्यस्थितीत मनपाला पथदिव्याची वार्षिक खर्च रक्कम रुपये ८,७४,००,०००/- इतकी असुन प्रति महिना रुपये ७२,८३,०००/- इतका येतो ESCO योजनेची अंमलबजावणी करावयाची झाल्यास मनपाला प्रतिमहिना प्रतिवर्ष

किती खर्च येईल याबाबत पीएमसीचे स्वयंस्पष्ट अभिप्राय दिसून येत नाहीत. (७) पीएमसीने सदर प्रकल्पाच्या एकुण अपेक्षित खर्च किती व प्रकल्पासाठी १० वर्षे मुदत देणे याबाबत तपशिलवार प्रकल्प अहवाल सोबत सादर केला नसल्याने मनपाची प्रति माह किती बचत होईल हे स्पष्ट नमुद नाही. तसेच मनपातील कार्यरत कर्मचारी यांच्या वार्षिक खर्च रक्कम रुपये १,४४,००,०००/- बोजा हा मनपावर कायमच राहणार आहे. त्यामुळे पीएमसीने याबाबत तपशिलवार प्रकल्प अहवाल तयार करुन दरवर्षी मनपाची इतकी बचत होईल याचा अभ्यास करुन मा.उपायुक्त (कर), विद्युत विभाग प्रमुख / शहर अभियंता यांना याबाबत धोरणात्मक निर्णय असल्याने याबाबत स्वयंस्पष्ट अभिप्राय नाहीत. त्यामुळे सदरची योजना मनपाच्या आर्थिक हिताची / फायदेशीर आहे. किंवा कसे याबाबत विद्युत विभाग प्रमुख व मा.शहर अभियंता यांनी सदरची योजना भविष्य काळासाठी मनपाच्या दृष्टीने आर्थिक दृष्टया फायदेशीर आहे याबाबत खात्री करुनच मा.स्थायी समिती/ मा.महासभा यांचेकडे धोरणात्मक निर्णयास्तव सादर करणे उचीत राहील.

यावर विद्युत विभाग प्रमुख यांचेकडुन फेरसादर रिपोर्ट की, उपस्थित असलेल्या मुद्यांबाबत खालील प्रमाणे खुलासा सादर करण्यांत येत आहे. (१) सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या पथदिव्यांची किंमत इकडेस उपलब्ध नाही. जे जुने पथदिवे काढले जाणार आहेत ते संबंधीत एजन्सी कडुन जमा केले जाणार आहे. (२) याबाबत संबंधीत पीएमसी यांनी मुख्यलेखापरिक्षक यांचेकडे खुलासा सादर केला आहे. (३) याबाबत पीएमसीने मुख्यलेखापरीक्षक यांचेकडे सविस्तर खुलासा सादर केला आहे. (४) वरिल अहवालात अ.नं.५ पान क्र. T-३ चे अवलोकन व्हावे. (५) याबाबत पीएमसीने खुलासा सादर केला आहे. (६) वरिल प्रमाणे (७) याबाबत पीएमसीने सविस्तरपणे अभ्यास करुन सविस्तर अहवाल मुख्यलेखापरीक्षक यांना सविस्तरपणे सादर करणे आवश्यक आहे. याबाबत तांत्रिक व आर्थिक बाबीची संपुर्ण जबाबदारी संबंधीत पीएमसी यांची आहे. संबंधीत पीएमसी यांनी इकडेस कोणताही अहवाल खुलासा इत्यादी सादर केलेला नाही. अर्थसंकल्पीय महासभा प्रस्ताव क्रमांक ४२ दिनांक २८/०३/२०१८ रोजीचे ठरावामध्ये अ.नं,२८ वर ESCO पध्दतीने कार्यवाही करण्यास मान्यता दिली आहे.

यावर शहर अभियंता यांचा अभिप्राय की, मा.महासभा ठराव क्रमांक ४२ दिनांक २८/०३/२०१८ मधील बाब क्रमांक २८ नुसार ESCO पध्दतीने शहरातील विद्युत दिवे देखभाल, दुरुस्ती कामी प्रस्तावाप्रमाणे ई निविदा मागविणे मान्यतेस सादर.

यावर मुख्यलेखापरीक्षक यांचा अभिप्राय की, पीएमसी च्या अहवालावर विभागाचा अभिप्राय स्वयंस्पष्ट नमुद नाही. वरील पृष्ठ क्र. T-८ व T-९ वरील मा.मु.ले.प.यांच्या अभिप्रायाचे विद्युत विभाग प्रमुख व मा.शहर अभियंता यांनी अवलोकन करुन दिनांक १९-०५-२०१८ च्या अभिप्रायानुसार विद्युत विभागाने ब बाबत उचित निर्णय घ्यावा.

यावर उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, मा.शहर अभियंता व मा.मु.ले.प.नुसार ई - निविदा मागविणेस मान्यतेस्तव सादर.

यावर मा.अति.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, सोबतच्या अहवालामधील मुख्य लेखापरीक्षक यांनी नमूद केलेले अनु.क्र.१ ते ७ अन्वये पुर्तता करुन घेणे उचित होईल. तसेचनगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र.संकिर्ण -२०१७/प्र.क्र.१८३/नवि-२० दिनांक १२/०१/२०१८ अन्वये कार्यवाही करणेकामी प्रस्ताव मा.महासभेकडे सादर करणेस हरकत नाही.

यावर मा.जिल्हाधिकारी तथा आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, सदर प्रस्तावाचे दि.१२/०१/२०१८ चे जी.आर. शी काही संबंध नाही. कारण की सदर प्रस्तावात राज्य शासनाची निधी उपयोग होणार नाही. प्रस्ताव जी.बी.मध्ये ठेवण्यास हरकत नाही.

**चर्चा :-**

विषय क्रमांक ९ चे वाचन करण्यांत आले.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** सदरचा प्रस्ताव कोणी तयार केला. मागणी कोणाची होती. प्रस्तावावर सही कोणाची आहे.

**मा.महापौर मॅडम :-** आपणच घेतला.

**अतिक्रमण वि.प्रमुख इथापे :-** अंदाजपत्रकीय सभा २८/०३/२०१८ वर ठराव पारीत करण्यांत आला. बाब क्रमांक २८ वर प्रस्ताव दिनांक २५/०७/२०१८ रोजी सादर केला आहे. माझे कडे चार्ज फेब्रुवारी मध्ये आला.

**मा.श्री.दिप चव्हाण:-** एवढया मोठया प्रस्तावावर आपण टैक्नीकल नसतांना प्रस्ताव मंजूर करायचा का आपण या ठिकाणी यापुर्वीच सांगीतले मला यातले काहीच कळत नाही. यांचा प्रस्ताव आम्ही मंजूर करायचा का कारण पठारे साहेबांनी त्यांचा चार्ज इतरांकडे देणे बाबत प्रस्ताव तयार केला आहे. याबाबत माहिती दिली आहे.

**मा.श्री.किशोर डागवाले :-** अर्ध्या तासापुर्वी त्यांनी सांगीतले मला यातील टेक्नीकल बाबी कळत नाही. मग प्रस्ताव या विषयात पुढे जायलाच नको. सभागृहाचा वेळच जायला नको.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** नगरसेवकांचे प्रस्तावावरती सह्या करत नाहीत सक्षम अधिकारी ते नसतांना आपण प्रस्ताव करुन मंजूर करायचा का ?

**मा.श्री.संपत बारस्कर :-** इथापेंचे म्हणणे टेक्नीकल नाही म्हणतात याबाबत शासनाचा जी.आर आलेला आहे.

**अतिक्रमण वि.प्रमुख इथापे :-** दिनांक २७/०३/२०१८ रोजी सर्व पदाधिकारी व पीएमसी अधिका-यांसोबत मा,महापौर यांचेकडे बैठक झाली मा.महापौर यांचेकडे नगरकरांच्या तक्रारी प्राप्त होतात. महानगरपालिकेचे हित आहे असे महापौरांचे मत झालेने हा प्रस्ताव सादर झाला आहे.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** शासनाचे निर्णय जर यापुर्वी झाले असतील तर आपणांस परत विषय घेता येतो का नगरसचिव सांगा.

**अतिक्रमण वि.प्रमुख श्री.इथापे :-** मा.शासनाने ४ जुन २०१८ रोजी जी.आर.पारीत केला आहे. नंतर शासन निर्णय आला आहे. केंद्र शासनाने इसीएस कंपनीशी टायअप केले आहे. मा.शासनाने करारनामा करुन घेतला त्यांचेकडुन खरेदी करणे क्रमप्राप्त आहे. त्याचा प्रस्ताव तयार केला आहे. पण अद्याप आपल्यासमोर आलेला नाही.

**मा.श्री.सचिन जाधव :-** धोरण ठरवायचे आहे. शासनाचे परिपत्रका प्रमाणे करा.

**मा.अति.आयुक्त श्री.वालगुडे साहेब :-** महासभेने निर्णय घ्यायचा आहे.

**मा.श्री.सचिन जाधव :-** परिपत्रकाचे अनुषंगाने फक्त धोरण ठरवायचे आहे.

**मा.महापौर मॅडम :-** आपण निर्णय घेतला नंतर शासन निर्णय आला.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** सर्वोच्च राज्य शासनाने मंजूरी दिलेली आहे. त्या कंपनीचा संबंध नाही. तुम्ही प्रस्तावात ज्या कंपनीचे नाव टाकले त्यांना काम दिले जावु शकत नाही.

**मा.महापौर मॅडम :-** राज्य शासनाचे परिपत्रकाप्रमाणे कार्यवाही करावी.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** तुम्ही एखादी एजन्सी नेमत असाल तर ते चुकीचे आहे. राज्य शासन ज्याला नेमेल ते आम्हाला मान्य आहे. कंपनी व पीएमसी नेमायला सभागृहाची मंजूरी घ्यायला पाहीजे. (सभागृहात गोंधळ) तुम्ही शिवसेनेच्या महापौर आहात. चुकीच्या पध्दतीने कामकाज करु नका. एजन्सी कंपन्या शासनाने ठरवुन दिलेल्या आहेत.

**मा.महापौर मॅडम :-** राज्य शासनाचे परिपत्रकाप्रमाणे कार्यवाही करावी.

**मा.श्री.सुवेंद्र गांधी :-** मागच्या धोरणाला तिलांजली द्यावी. व राज्य शासनाचे जी.आर.नुसार कार्यवाही करावी.

**मा.श्री.अभय आगरकर :-** आत्ता जो जी.आर.आला त्यानुसार कार्यवाही करावी.

**मा.महापौर मॅडम :-** राज्य शासनाचे परिपत्रकाप्रमाणे कार्यवाही करावी.

---*---

**ठराव :-**

ऑफिस रिपोर्ट व महासभेत झालेल्या चर्चेनुसार अहमदनगर महानगरपालिका हद्दीत संपुर्ण शहरात एलईडी पथदिवे बसविणे व देखभाल, दुरुस्ती बाबत मा.शासनाचे परिपत्रकानुसार प्रशासनाने कार्यवाही करावी. यास ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार पुढील उचित कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री.सचिन तुकाराम जाधव,

अनुमोदक :- मा.श्री.अभय जगन्नाथ आगरकर,

ठराव सर्वानुमताने मंजूर.

सही/-

महापौर
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक :- १०** **दिनांक : ०२/०८/२०१८.**

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या हद्दीतील लक्ष्मी कारंजा ते आझाद चौक (प्रवरा बँक) या मार्गास **" डॉ.गोपाळ मिरीकर मार्ग "** असे नामकरण करणे बाबत...

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

संदर्भ :- श्री.देवशिष शेंडगे, अध्यक्ष डॉ.गोपाळ मिरीकर फाउंडेशन, अहमदनगर दिनांक ०८/०६/२०१८ चे पत्र.

उपरोक्त विषयान्वये विनंती रिपोर्ट की, अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील लक्ष्मी कारंजा ते आझाद चौक (प्रवरा बँक) या मार्गास **"डॉ.गोपाळ मिरीकर मार्ग "** असे नामकरण करणे बाबत संदर्भीय पत्रान्वये कळविले आहे.

त्यांनी त्यांचे पत्रात नमुद केल्याप्रमाणे कै.डॉ.गोपाळ मिरीकर यांनी सामाजिक, सांस्कृतीक, शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात अग्रेसर होते. त्यांच्या कार्यामुळे लोकांना प्रेरणा मिळावी म्हणुन विषयांकित रस्त्यास **"डॉ.गोपाळ मिरीकर मार्ग "** असे नामकरण करणे असे कळविले आहे.

त्यानुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण ६ मध्ये प्राधिकारी व अधिकारी यांची कर्तव्ये व अधिकार मधिल बाब क्रमांक ९ मध्ये महानगरपालिकेमध्ये निहित असलेल्या रस्त्यांना व सार्वजनिक जागांना नाव देणे किंवा त्यावर क्रमांक घालणे आणि अन्य जागांवर क्रमांक घालणे असे नमुद आहे.

तसेच सदर रस्त्याला नाव देणे बाबतचे रजिस्टर पहाणी केली असता सदर रस्त्यास नाव दिलेले नाही. तसेच नामकरण करणे बद्दल महानगरपालिकेचे कोणतीही नियमावली तिाा उपविधी नाही. तरी अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील लक्ष्मी कारंजा ते आझा ाद चौक (प्रवरा बँक) या मार्गास **"डॉ.गोपाळ मिरीकर मार्ग "** असे नामकरण करणे बाबतचा प्रस्ताव मा.सहाय्यक संचालक, नगररचना यांचा अभिप्राय घेवुन मा.महासभेकडे पाठविणेस आदेशार्थ तसेच ठराव मंजुरीनंतर नामफलक तयार करुन लावणेस येणा-या खर्चास मंजुरी मिळणेस्तव रिपोर्ट स.सादर.

यावर शहर अभियंता यांचा अभिप्राय की, धोरणात्मक बाब असलेने निर्णयास्तव मा.महासभेकडे सादर करणे मान्यतेस्तव सादर.

यावर नगररचनाकार यांचा अभिप्राय की, रस्त्याचे नामकरणाची बाब ही या कार्यालयाच्या अखत्यारीत येत नसल्याने अभिप्राय निरंक आहे.

यावर उपअभियंता यांचा अभिप्राय की, अभिप्रायान्वये प्रस्ताव मा.महासभेपुढे मान्यतेस सादर.

यावर शहरअभियंता यांचा अभिप्राय की, मा.स.सं.न.र.यांचे अभिप्रायानुसार व प्रस्तावानुसार मा.महासभेपुढे पाठविणे मान्यतेस्तव सादर.

यावर मुख्यलेखापरीक्षक यांचा अभिप्राय की, मा.मु.ले.प यांची अभिप्रायाची आवश्यकता वाटत नाही. विभागाने उचित निर्णय घ्यावा.

यावर उपायुक्त यांचा अभिप्राय की, लक्ष्मी कारंजा ते आझाद चौक (प्रवरा बँक) या मार्गास **"डॉ.गोपाळ मिरीकर मार्ग "** असे नामकरण करण्यासंबंधी "अ" नुसार महासभेकडे मंजुरीसाठी पाठविण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.अति.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, सोबतच्या अहवालामधील "अ" प्रमाणे प्रस्ताव मा.महासभेकडे मान्यतेस्तव सादर करण्यास हरकत नाही.

यावर मा.जिल्हाधिकारी तथा आयुक्त, अहमदनगर महानगरपालिका यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

**चर्चा :-**

**मा.श्री.कुमार वाकळे :-** माजी उपनगराध्यक्ष कै.दत्तात्रय ठकाजी वाकळे पाटील यांचे नांव पंपींग स्टेशन ते सत्यम हॉटेल पर्यंतच्या रस्त्याला देणे बाबतचा प्रस्ताव आपणांकडे पाठविला तो एक विषय बोल्हेगांव नागरिकांच्या वतीने घेण्यात यावा.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** यास मी अनुमोदन देतो.

**शहर अभियंता सोनटक्के :-** आयत्या वेळचा विषय घेण्याचा अधिकार पिठासीन अधिकारी यांचा आहे.

**मा.अति.आयुक्त श्री.वालगुडे :-** दुसरे कोठे यापुर्वी नांव दिलेले नाही याची विभागाने खात्री करावी.

**मा.श्री.अभिषेक कळमकर :-** मिरीकर यांचे प्रस्तावात त्यांनी नगर शहरात दिलेल्या योगदानाचा उल्लेख करावयास पाहीजे होता. नगरमहोत्सवाचा यात उल्लेख नाही. नगर कॉलेज मध्ये पत्रकारीतेचा कोर्स त्यांनी प्रथमतः सुरु केला. या व्यक्तीचे शहरासाठी मोठे योगदान आहे. त्यांचे कन्येने एक पत्र दिले आहे.

**मा.सौ.दिपाली बारस्कर :-** "गोपाळ" नावाऐवजी "गोपाळराव" अशी दुरुस्ती करा.

**मा.श्री.अभय आगरकर :-** ज्येष्ठ पत्रकार व राजकीय समिक्षक असा उल्लेख करावा.

**मा.महापौर मॅडम :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या हद्दीतील लक्ष्मी कारंजा ते आझाद चौक (प्रवरा बँक) या मार्गास **" ज्येष्ठ पत्रकार व राजकीय समिक्षक डॉ.गोपाळराव रामराव मिरीकर मार्ग "** तसेच **कै.दत्तात्रय ठकाजी वाकळे पाटील, माजी उपनगराध्यक्ष** यांचे नांव पंपींग स्टेशन ते सत्यम हॉटेल पर्यंतच्या रस्त्यास नाव देण्यास ही सभा मान्यता देत आहे.

---*---

**ठराव :-**

ऑफीस रिपोर्ट मंजूर. अहमदनगर महानगरपालिकेच्या हद्दीतील लक्ष्मी कारंजा ते आझाद चौक (प्रवरा बँक) या मार्गास **"डॉ.गोपाळराव रामराव मिरीकर मार्ग"** असे नामकरण करण्यास ही सभा मान्यता देत आहे. तसेच सदर निश्चित केलेल्या जागी नामफलक बसविण्यास व त्याकामी येणा-या खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

मा.महासभेत झालेल्या चर्चेनुसार अहमदनगर महानगरपालिकेच्या हद्दीतील पंपींग स्टेशन ते सत्यम हॉटेल पर्यंतच्या रस्त्याला **"कै.दत्तात्रय ठकाजी वाकळे पाटील मार्ग"** असे नामकरण करण्यास ही सभा मान्यता देत आहे. तसेच सदर निश्चित केलेल्या जागी नामफलक बसविण्यास व त्याकामी येणा-या खर्चास ही सभा मान्यता देत आहे. सदर बाबत प्रशासनाने संपूर्ण सोपस्कार पार पाडण्यात येउन नामकरणाबाबत कार्यवाही करण्यात यावी.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सूचक - मा.सौ.दिपाली नितीन बारस्कर,
अनुमोदक - मा.श्री.कुमार बबनराव वाकळे,
ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक :- ११** **दिनांक : ०२/०८/२०१८.**

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका स्थायी समितीने नेहरु मार्केट बाबतचा सभा क्रमांक ६ विषय क्रमांक ६९ दिनांक २०/०२/२०१६ रोजी पारीत केलेला ठराव अंतिमतः विखंडीत झाले व तद्नंतर घ्यावयाच्या धोरणा बाबत.

संदर्भ :- मा.शासनाचे समक्रमांकाचे दिनांक ०९ नोव्हेंबर २०१६ चे पत्र.

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

संदर्भ :- १) मा.शासन निर्णय क्र.अमपा २०१६/प्र.क्र.४०६/नवि-२५ दिनांक १२ जुन २०१६ चे पत्र.

२) अति.आयुक्त अहमदनगर महानगरपालिका यांचे पत्र क्र.१६६६ दि.२३/११/२०१६ चे पत्र

३) कक्ष अधिकारी यांचेकडील क्रमांक अमपा २०१६ /प्र.क्र.४०६/नवि-२५ दिनांक ०२ डिसेंबर २०१६ रोजीचा ई मेल.

उपरोक्त विषय व संदर्भिय पत्रान्वये सादर की, कक्ष अधिकारी यांनी संदर्भीय पत्र क्रं.३ अन्वये मा.नगरसेवक श्री. दत्तात्रय हरीभाऊ कावरे, यांनी दिनांक ०२/१२/२०१६ अन्वये शासनाकडे सादर केलेल्या निवेदना प्रकरणी वस्तुस्थितीदर्शक अहवाल खालील प्रमाणे

| अ. नं. | मुद्दे | खुलासा |
|---|---|---|
| १ | सिटी सर्व्हे नं २०८ हि नेहरु मार्केटची जागा चितळेरोड येथे असुन सदर लोकेशन अहमदनगर येथील अत्यंत मोक्याच्या ठिकाणी आहे व सदर जागेसंदर्भात २FSI आहे. सदर जागा विकसित करणे बाबत FBT तत्वावर विकसित करणे कामी विकासकाला देण्याचे दि.२०/२/२०१६ रोजी स्थायी समितीने ठराव मंजुर केला आहे. | सदर बाबत मा, महासभा ठराव क्रमांक २१ दिनांक १०/८/२००९ अन्वये नेहरु मार्केट सि.स. नं २०८ या जागेवर FBT तत्वावर भाजीमंडई सह व्यापारी संकुल उभारणे बाबत ठराव पारीत करण्यात आलेला आहे त्यामुळे सदरचे ठिकाणी भाजीमंडई व व्यापारी संकुल बाबत धोरणात्मक निर्णय सर्वसाधारण सभेत घेण्यात आलेला आहे. |
| २ | Maharashtra Municipal Corporation Act चे कलम ७९ ( ब) प्रमाणे स्थायी समितीला फक्त रक्कम रुपये ५०००/- पर्यंत मुल्य असलेल्या मिळकतीबाबत विक्री किंवा प्रिमियमची रक्कम रुपये ५०,०००/- पर्यंत असलेल्या मिळकती भाड्याने देण्याचा निर्णय घेण्याचा हक्क आहे. त्यामुळे सदर सिटी सर्व्हे नं २०८ हि नेहरु मार्केटची मिळकत विकसित करण्याचा व त्याकामी प्रिमीयमची रक्कम ठरविण्याचा स्थायी समितीला कुठलाही कायदेशीर हक्क व अधिकार नव्हता व नाही , कारण सदर जागेचे मुल्य खुप मोठ्या प्रमाणात आहे. | सर्व्हे नं २०८ हि नेहरु मार्केट या जागेवर FBT तत्वावर भाजी मार्केट व व्यापारी संकुल विकसित करणे बाबत धोरणात्मक निर्णय Maharashtra Municipal Corporation Act १९४९ चे कलम ,७९ ( क) अन्वये महासभेस अधिकार आहेत त्या तरतुदी नुसार मा. महासभा ठराव क्रमांक २१ दिनांक १०/८/२००९ अन्वये मान्यता घेण्यात आली आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात आलेली आहे. |

| | | |
|---|---|---|
| ३ | Maharashtra Municipal Corporation Act चे कलम ७९ ( क) प्रमाणे सदर मिळकत विक्री किंवा भाड्याने देण्याचा अधिकार फक्त महासभेला आहे, कारण सदर जागेचे मुल्य खुप मोठ्या प्रमाणात आहे. तसेच Maharashtra Municipal Corporation Act चे कलम ७९ (ड) प्रमाणे महानगरपालिकेच्या मिळकतीबाबत प्रिमियम निश्चित करतेसमयी चालु प्रचलीत बाजार भावाप्रमाणे प्रिमियम किंमत निश्चित करणे आवश्यक आहे. | Maharashtra Municipal Corporation Act चे कलम ७९ ( क) प्रमणे सदरचे अधिकार महासभेला आहे त्यानुसारच मा, महासभा ठराव क्रमांक २१ दिनांक १०/८/२००९ अन्वये कार्यवाही करणेत आली आहे.मिळकतीचे मुल्यांकन महानगरपालिकेचे नगररचनाकार यांनी सन २०१६ च्या रेडीरेकनर नुसार जागेचे मुल्यांकन केले आहे |
| ४ | सदर सिटी सर्व्हे नं २०८ हि नेहरु मार्केट जागेची प्रचलित बाजार भावाप्रमाणे किंमत रुपये ९,२६,७८,०००/- आहे. | तक्रारदाराने नमुद केलेले प्रचलीत बाजारभावाप्रमाणे किमंत ९,२६,७८,०००/- एवढी दिलेली आहे.ही किमंत / मुल्याकंन कोणत्या आधारे केले आहे याचा बोध होत नाही तसेच सदर मुल्याकंन करतांना तक्रारदाराने नमुद जागा ही भाडे पटयाने देण्यात येणार आहे.त्यामुळे प्रिमियम कमी येणार आहे. |
| ५ | परंतु सदर जागेची किंमत स्थायी समितीने रुपये २,२८,६०,८३७/- निश्चित केली आहे व सदर मिळकत विकसित करणेकामी विकासकाकडुन प्रिमियम ची रक्कम रुपये २,२८,६०,८३७/- घेण्याचा ठराव मंजुर केला आहे. | मा. स्थायी समीतीने ठराव क्रमांक ६९ दिनांक २०/२/२०१६ अन्वये प्रिमियम रक्कम रु.२,२८,६०,८३७/- निश्चित केलेली आहे तदनंतर २०१६ रोजी नविन रेडिरेकनर नुसार नगररचनाकार यांनी जागेचे मुल्यांकन रु.२,४०,००,०००/- इतके केले आहे व सदरची रक्कम आधारभुत रक्कम धरुन निविदा मागविण्यात आलेली आहे. |
| ६ | सदर स्थायी समीतीच्या ठरावामुळे महानगर पालिकेचे सुमारे रुपये ७,००,००,०००/- चे आर्थिक नुकसान होईल व त्यामुळे महानगरपालिकेचे कधीही भरुन न येणारे आर्थिक नुकसान होईल. | महानगरपालिके मार्फत यापुर्वी ढोबळ पध्दतीने काढण्यात आलेले रु. ४.५० कोटी रक्कम आधारभुत धरुन व रु.२ कोटी रक्कम देखील वेळोवेळी ४ वेळेस ई - निविदा काढण्यात आलेली आहे परंतु सदर निविदेस कोणताही प्रतिसाद मिळाला नाही व विविध शासकीय योजनेतुन त्याचबरोबर जिल्हानियोजन मधुन निधि उपलब्ध झाला नाही त्यामुळे मा. महासभा ठराव क्रमांक २ दिनांक ५/७/२०१४ अन्वये नेहरु मार्केट करीता खाजगी करणाच्या माध्यमातुन तात्काळ निविदा मागविण्याची कार्यवाही करण्यात यावी व त्यास प्रतिसाद न मिळाल्यास महानगरपालिके मार्फत सदरचा प्रकल्प उभारला जाईल, असा ठराव पारीत करण्यात आला.त्यानुसार महानगरपालिका नगररचनाकार यांचे मार्फत चालु रेडीरेकनर नुसार त्यांचे मुल्यांकन काढुन ई- निविदा मागविण्यात आली. यामध्ये विकासकामार्फत महानगरपालिकेस ७० भाजी ओटे विनाशुल्क बांधुन देणार आहे व सदर ठिकाणी विस्थापीत झालेल्या गाळे |

| | | |
|---|---|---|
| | | धारकाचा केवळ बांधकामाचा खर्चा इतके मुल्य घेवुन गाळे विकासकामार्फत प्राधान्याने देणार आहे.सदर प्रकल्पा बात मा.उच्य न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे दावा चालु आहे, यामध्ये मे.न्यायालयाने कोर्टाचे आदेश होईपर्यंत निविदा अंतीम करु नये असे आदेश केले आहेत त्यानुसार अद्यापपर्यंत निविदेतील व्यापारी लिफाफा उघडण्यात आलेले नसल्यामुळे निविदा धारकाने प्रिमियम रकमेपोटी नमुद केलेले दर ज्ञात नाही. यास्तव महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाले किंवा कसे या बाबत भाष्य करता येणार नाही. |
| ७ | तसेच सन २०१० साली ता १०/१२/२०१० रोजी मंजुर झालेल्या ठरावामध्ये रुपये ४,५,००,०००/- प्रिमियमची रक्कम निश्चित करण्यात आली होती मात्र सन २०१६ साली प्रिमियमची रक्कम रुपये २,२८,६०,८३७/- निश्चित करण्यात आलेली आहे. वास्तविक पाहता जागेच्या किंमती दिवसेंदिवस वाढत असतांना परंतु सदर नेहरु मार्केटच्या जागेबाबत उलट प्रिमियमची रक्कम सहा वर्षानंतर कमी करण्यात आलेली आहे. सदरची बाब हि नैसर्गिक न्याय तत्वाला धरुन मुळीच नाही. | यापुर्वी सदरच्या प्रकल्पासाठी ठरविण्यात आलेली प्रिमियम रु. ४.५० कोटी ही ढ़ोबळ स्वरुपात काढण्यात आलेली होती. त्याचा कुठल्याही प्रकारचा तांत्रिक आधार नव्हता. सन २०१६ साली महानगरपालिकेचे नगररचनाकार यांनी मुल्यांकन २.४० कोटी केलेले आहे व तीच प्रिमीयम रक्कम धरण्यात आलेली आहे. |
| ८ | सध्याच्या स्थितीत महानगरपालिकेची आर्थिक स्थिती अत्यंत नाजुक व बिकट आहे व त्यामुळे कर्मचा-यांचे सुमारे २ महिन्याचे पगार थकलेले आहे. त्यामुळे सदर महानगर पालिकेच्या मालकीच्या जागा कवडीमोल भावात विकसित करण्यास दिल्यास महानगरपालिकेचे खुप मोठे आर्थक नुकसान आहे व त्यामुळे महानगरपालिकेचे उत्पन्नाचे स्त्रोत्र कमी होण्याची दाट शक्यता आहे. | सदरची जागा FBT च्या माध्यमातुन विकसीत करण्यात आले नंतर महानगरपालिकेस किमान रु२.४० कोटी इतका प्रिमियम प्राप्त होणार आहे. अधिक महानगरपालिकेस ७० भाजी ओटे बांधुन मिळणार आहेत. विस्थापित गाळे धारकांचे विकासकामार्फत पुर्नवसन करण्यात येणार आहे तसेच महानगरपालिकेस रु.१.००.प्रति चौ मी. या प्रमाणे संकुलामधील भाडेक-याकडुन भाडे मिळणार आहे तसेच सदरचा प्रकल्प विकसित करणेबाबत प्रोजेक्ट डेव्हलपमेंट फंड रु.२० लाख महानगरपालिकेस विकासकाकडुन प्राप्त होणार आहे. या व्यतिरीक्त ७० भाजी ओट्याचे डिपॉजीट व भाडे महानगरपालिकेस उत्पन्नापोटी प्राप्त होणार आहे. |
| ९ | विमुद्रिकरणमुळे सध्या महानगरपालिकेकडे सुमारे कर वसुलीपोटी रक्कम रुपये ११,००,००,०००/- जमा झाली असुन त्यामधुन महानगरपालिकेने नेहरु मार्कट बांधणेकामी आर्थिक तरतुद केल्यास सदर प्रकल्प महानगरपालिकेस स्वतः बांधणे शक्य होईल व त्यामुळे सर्व बांधकामाचा खर्च वजा जाता महानगरपालिकेस सुमारे रक्कम रुपये | मा.महासभा ठराव क्रमांक २, दिनांक ५/७/२०१४ अन्वये नेहरु मार्केट सि.स.नं २०८ या ठिकाणी भाजी मंडईसह व्यापारी संकुल उभारणे बाबत FBT तत्वावर निविदा मागविण्यात आलेली आहे.सदर निविदेस प्रतिसाद प्राप्त झालेला आहे. अद्यापपर्यंत व्यापारी लिफाफे उघडण्यात आलेले नाही. व्यापारी लिफाफे उघडल्यानंतर प्राप्त दर अवाजवी असल्यास महानगरपालिके मार्फत सदरचे व्यापारी संकुल व भाजी मार्केट विकसित करणे बाबत |

| | | |
|---|---|---|
| | १३,००,००,०००/- ते १५,००,००,०००/- चा निव्वळ आर्थिक लाभ होईल कारण सदर प्रकल्प उभारणी कामी २FSI प्रमाणे २३०००.०० चौरस फुट बांधकाम होईल व सदरचे सर्व बांधकाम वानिज्य बांधकाम होईल. | पुढील कार्यवाही करण्यात येईल. |
| १० | तसेच बुरुडगांव रोड येथील अहमदनगर महानगरपालिकेच्या जागेवर अशाच प्रकारचे भाजी मार्केट व व्यापारी गाळे संकुल बांधण्यात आलेले आहे व त्यामध्ये देखील विकासकाकडुन घेण्यात आलेली प्रिमियमची रक्कम कमी करण्यात आलेली होती व त्यामुळे लेखापरीक्षा अहवाल वर्ष २०११-२०१२ नुसार सदर प्रकल्पा संदर्भात रक्कम रुपये ६,६१,००,००/- ची वसुली निघालेली आहे. त्याच प्रमणे नेहरु मार्केट विकसित करणेकामी देखील प्रिमियमची रक्कम कमी करण्याचा स्थायी समीतीने बेकायदेशीर निर्णय घेतलेला आहे. | बुरुडगांव भाजी मार्केट व व्यापारी संकुल बांधणे बाबत लेखापरीक्षण सन २०११-२०१२ मध्ये आक्षेप क्रमांक १५ अन्वये अधिमुल्य कमी करणे रु ६,६१,२८,०००/- इतके म .न पा. चे. आर्थिक नुकसान झाले बाबतचा आक्षेप घेण्यात आला होता. परंतु त्या बाबत अनुपालन सादर करुन आक्षेप वगळण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. |
| ११ | Maharashtra Municipal Corporation Act चे कलम ७९ मधील नमुद तरतुदी प्रमाणे सदरचा स्थायी समीतीने मंजुर केलेला ठराव हा पुर्णपणे बेकायदेशीर आहे त्यामुळे सदरचा ठराव महानगरपालिकेच्या आर्थिक हिताच्या दृष्टीने विखंडीत होणे आवश्यक आहे. | सिटी सर्व्हे नं २०८ या ठिकाणी FBT तत्वावर भाजी मंडई व व्यापारी संकुल विकसित करणे बाबत प्रतीवास Maharashtra Municipal Corporation Act १९४९ चे कलम ७९ मधील तरतुदी प्रमाणे मा. महासभा ठराव क्रमांक २१ दिनांक १०/८/२००९ अन्वये प्रशासकीय मान्यता घेण्यात आली आहे. सदरचे जागेचे मुल्यांकन नगररचनाकार यांनी सन २०१६ चे रेडीरेकनर नुसार केले आहे. सदर प्रस्तावास मा. स्थायी समीती ठराव क्रमांक ६९ दिनांक २०/२/२०१६ अन्वये मान्यता घेण्यात आली असुन त्यानुसार निविदा मागविण्यात आलेल्या आहेत. सद्यस्थिती सदर प्रकल्पा बाबत मा. उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ येथे दावा चालु आहे.सदर बाबत मा.न्यायालयाच्या आदेशा नंतर पुढील कार्यवाही करणे उचीत होईल अशी या कार्यालयाची धारणा आहे. |
| १२ | महानगरपालिकेचे आर्थिक हित जपणेकामी ता २०/२/२०१६ रोजी स्थायी समीतीने मंजुर केलेला ठराव विखंडित होणे आवश्यक आहे व त्यानुषंगाने सदरचा ठराव विखंडीत करणेकामी आदेश करण्यात यावा हि विनती. | **वरील प्रमाणे.** |

तरी वरील प्रमाणे अहवाल सोबतच्या मसुद्या प्रमाणे मा.कक्ष अधिकारी, नगर विकास विभाग, मंत्रालय मुंबई यांना कळविणे रिपोर्ट मान्यतेस.

यावर शहर अभियंता यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

यावर मुख्यलेखापरीक्षक यांचा अभिप्राय की, पुर्व लेखा परीक्षण करण्यात आले लेखा परीक्षण अभिप्राय निरंक

यावर उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, ज्युनियर इंजिनियर, प्रोजेक्ट इंजिनियर, सिव्हील इंजिनियर समक्ष चर्चा करा. with संबंधीत सर्व ठराव,फाईलसह

यावर सार्वजनिक बांधकाम विभाग कनिष्ठ अभियंता यांचेकडुन दिनांक १६/०१/२०१७ रोजी फेरसादर रिपोर्ट की,

संदर्भ:- १) कक्ष अधिकारी यांचेकडील क्रमांक पत्र अमपा २०१६/प्र.क्र ४०६/नवि-२५ दिनांक २ डिसेंबर २०१६

२) शा नि. न.वि.वि दि ४/१/२०१७ चे पत्र.

३) श्री दत्तात्रय हरीभाऊ कावरे, नगरसेवक अहमदनगर महानगरपालिका यांचे दि ७/१/२०१७ चे पत्र

४) श्री .किशोर आसाराम डागवाले, नगरसेवक . यांचे दिनांक ९/१२/२०१६ चे पत्र

५) श्री बाळासाहेब मारुतीराव बोराटे ,नगरसेवक यांचे दि ६/१/२०१७ चे पत्र.

उपरोक्त संदर्भिय विषयाकरीता श्री. दत्तात्रय हरीभाऊ कावरे व इतर नगरसेवक व गटनेता यांनी दिनांक ८/११/२०१६ रोजीच्या शासनाकडे केलेल्या तक्रारीचा अहवाल कक्ष अधिकारी न.वि.वि यांनी ९/११/२०१६ रोजीच्या पत्रान्वये मागविण्यात आला होता.या मध्ये मा. स्थायी समिती, मा. महासभा यांनी वेळोवेळी केलेल्या ठारावातील विसंगती, बाजार मुल्य महानगरपालिकेने घ्यावयाचे प्रिमियम रक्कम हि आर्थिक हिताची नाही तसेच सदर विषयांकीत मा. उच्च न्यायालयातील याचिका क्र WP ५७५०/२०१६, PLI७५/२०१६ या बाबत देखील माहिती देण्यात आलेली होती व त्या कामाकरीता सदर याचीकेचा निकाल प्रलंबीत होता त्या नुसार ठराव विखंडीत करण्याची मागणी करण्यात आलेली होती त्या पत्रचे अनुषंगाने महानगरपालिकेने केलेली सर्व कार्यवाहीचा अहवाल / उत्तर सार्वजनिक बांधकाम विभाग जा क्र ६६६ दिनांक २३/११/२०१६ अन्वये सादर करण्यात आलेला होता. यामध्ये मा. उच्च न्यायालयाचा आदेश झालेनांतर पुनश्च अहवाल सादर करण्यात येइल, असे कळविले होते.

तदनंतर नागपुर विधिमंडळ कार्यकालामध्ये श्री. दत्तात्रय हरीभाऊ कावरे, गटनेते तथा नगरसेवक अहमदनगर महानगरपालिका यांनी दिनांक २/९/२०१६ रोजी पुनश्चः शासनाकडे तक्रार करण्यात आली व त्याचा, सुसष्ट अहवाल अभिप्राय देणे बाबत कक्ष अधिकारी न.वि.वि. यांनी दिनांक २/११/२०१६ रोजी कळविले होते यातील प्रमुख मुद्दे प्रिमीयम निश्चिती करणे रु. ५००००/- चे पुढील मुल्यांकनाकरीता अधिनियम तरतुद कलम ७९(क) प्रमाणे मा. महासभेची मंजुरी आवश्यक असलेने स्थायी समितीने ठरविलेला प्रिमियम चा ठराव रद्द करावा तसेच खाजगी व्हॅल्युअर कडुन तक्रारदाराने बाजार मुल्य रु.९,२६,७८,०००/- इतके नमुद केले आहे. त्यामुळे रु. २.४० कोटी प्रिमियम महानगरपालिकेचे हिताचे नाही असे कळविले आहे . तसेच सदरचा प्रकल्प महानगरपालिका मार्फत करावा त्यामुळे झालेला ठराव विखंडीत करावा व त्या प्रमाणे अहवाल व अभिप्रायासह उत्तर देणे करीता प्रस्ताव मंजुरीस्तरावर आहे.

दरम्यान न.वि.वि यांचा दिनांक ४/१/२०१७ रोजीच्या शा. नि. अन्वये महा. म. न. पा अधिनियम कलम ७९(क) ,७९(ड) अन्वये महासभेमध्ये प्रिमियम निश्चित करणे व अधिमुल्य भाडे बाजारमुल्यापेक्षा कमी असु नये या कारणास्तव व मा. स्थायी समीती विषय ६९ दिनांक २०/२/२०१६ अन्वये केलेला ठराव आर्थिक नुकसान होण्याची शक्यता आहे. या विसंगतीमुळे कलम ४५१(१) नुसार प्रथमतः सदरचा विषय, ठराव निलंबित केलेला आहे व सदर आदेशा विरुध्द ३० दिवसात अभिवेदन न केल्यास नियमानुसार ठराव विखंडीत होईल त्यामुळे उपरोक्त अभिवेदन करीता व नंतर ४/१/२०१६ चे अधिवेशन असे दोन्ही उत्तर खालील प्रमाणे देणे उचीत वाटते.

प्रथम नेहरु मार्केट FBT तत्वावर बांधणे कामाची घटनाक्रम खालील प्रमाणे .

नेहरू मार्केट एफ.बी.टी.(F.B.T.) तत्वावर बांधणेकामी ई निविदा क्र.१३९१ नुसार निविदा प्रसिद्ध झालेनुसार व मे.कोर्टाचे दि.२४/१०/२०१६ चे दि.१५/१२/२०१६ चे झालेल्या आदेशाबाबत मनपाचे विधी सल्लागार यांचे मत घेवून निविदाबाबतची

कार्यवाही करण्यात आली यामध्ये प्रथम तांत्रिक लिफाफा उघडण्यात आला व निविदा अटी शर्तीनुसार आवश्यक कागदपत्रांची खातरजमा करून सदर निविदेचा व्यावसायीक लिफाफा उघडण्यात आला त्याचा तपशिल खालीलप्रमाणे

| विकासकाचे नांव | प्रिमीयम रक्कम |
|---|---|
| १) डी.एन.व्ही.रियालिटी,पुणे | - रु.२,४४,४४,०००/- |
| २) मे.ए.सी.शेख,अहमदनगर | - रु.२,२५,००,०००/- |
| ३) मे.ए.सी.कोठारी, अहमदनगर | - रु.२,५१,००,०००/- |

त्यानुसार सर्वांत जास्तीचा देकार विकासक मे.ए.सी.कोठारी,अहमदनगर यांचा रू. २,५१,००,०००/- म्हणजे ई निविदा मधील किंमत देकार रू.२,४०,००,०००/- पेक्षा जादा भरलेला आहे. सदरचे दर निविदेतील किमान प्रिमियम रकमेपेक्षा जास्त असले तरी मनपाचे आर्थिक हिताकरिता विकासकास वाटाघाटी करून घेणेकामी मा.छाननी समिती मधील सदस्यासमोर घेणे उचित वाटते व सदरची बाब प्रिमियम स्वरूपातील असलेने त्याची आधारभुत रक्कम म्हणून जमीनीचे मुल्यांकन घेतलेले आहे. त्याकरिता मा.छाननी समितीमध्ये मा.उपायुक्त (सा.) हे अध्यक्ष व सदस्यामध्ये मा.उपायुक्त (कर) , मा.नगररचनाकार, मा.मुख्यलेखाअधिकारी, मा.मुख्यलेखापरिक्षक , मा.शहर अभियंता,प्रकल्प अभियंता व संबंधित अभियंता व संबंधित विषयाचे प्रकल्प सल्लागार मे.अविष्कार ग्रृप,सावेडी यांचे समिती संघटीत करून निविदेच्या उचित निर्णयासाठी मा.स्थायी समिती समोर घेणे उचित वाटते.

परंतु या अगोदरच्या व चालू असलेल्या घटनेचा माहिती या रिपोर्ट समवेत देणे उचित वाटते तो खालीलप्रमाणे:-

- नगरपरिषद ठराव क्र.१७ दि.२२/०८/२००० नुसार विषयांकित प्रकल्प एकात्मिक विस्तारीत प्रस्तावामधून वगळून खाजगीकरणामधून विकसित करण्यात यावा असा ठराव.
- नगरपरिषद ठराव क्र.२१ दि.१५/०५/२००१ नेहरू मार्केट, गंजबाजार, विद्यमान गॅरेज ठिकाणी मार्केट , गाळे धारकांचे पुनवसनावरून संकुल खाजगीकरणातून बांधणेस मंजुरी
- दरम्यान मे.नगर कोर्टात रे.मु.नं.२१/२००५ ते २८/२००५ , ३६/२००५ ते ३७/२००५ व ४६/१/२००७ तसेच ७५९४/२००७ ,४६१०/०७, ४७२७/०७, ८८३/०८ ,४६१२/०७, १९१५/०८, ६३५८/०७ इत्यादी दाव्यामध्ये मनपा अधिनियम ८१ ब नुसार आयुक्त निर्णयाला आवाहनामध्ये गाळे धारकांचे पुनर्वसनानंतरचे प्रतिज्ञापत्रानुसार अपिल मंजुर तसेच मा.उच्च न्यायालय PIL ७५/२०१६ व W.P. No.५७५०/२०१६ यामध्ये वेळोवेळी झालेल्या अंतरीम आदेशानुसार मनपाने वेळोवेळी दिलेले प्रतिज्ञापत्रानुसार दि.१५/१२/२०१६ रोजी याचिका फेटाळली अशी माहिती मनपाचे विधी सल्लागार यांनी दिली.
- मा.महासभा ठराव क्र.२१ दि.१०/०८/२००९ अन्वये मनपा अधिनियम ७९ क अन्वये रु.१.५ कोटी प्रिमियम व एफ.बी.टी.(F.B.T.) या खाजगीकरणाचे धोरणात्मक निर्णय घेण्यात आला व तसेच मे.अविष्कार ग्रृप , सावेडी (श्री.मनोज जाधव) यांची विषयांकित प्रस्तावाकरिता नेमणूक करण्यात आलेली आहे व निविदा स्विकृती मा.महापौर, मा.आयुक्त यासह सर्व रिपोर्टला मंजुरी देवून मा.महासभेने मान्यता दिली. तदनंतर वेळोवेळी बदल झालेल्या प्रिमियमच्या रकमेची निश्चीती मा, स्थायी समीतीने केलेली आहे. त्यामुळे मा.महासभा ठराव क्र.२१ दि.१०/०८/२००९ नंतर उपरोक्त विषय मा. महासभेत आलेला आही.
- दि.७/१०/२०१० च्या रिपोर्टनुसार प्रिमियम रु.२.०० कोटी +रु. ५० कोटी चितळे रस्त्याकरिता असे तत्कालीन मा.नगररचनाकार यांचे रिपोर्टवर तत्कालिन मा.शहर अभियंता यांनी दि.१५/०९/२०१० रोजी ढोबळमानाने प्रिमियम रु.४.०० कोटी + रु.५० लक्ष रस्त्याकरिता असे सुचविलेनुसार रिपोर्ट मा.स्थायी समिती समोर निर्णयासाठी पाठविला.
- मा.स्थायी समिती ठराव क्र.७२ दि.१६/१२/२०१० अन्वये प्रिमियम रु.४.५ कोटी + रु.५० लक्ष चितळे रस्त्याकरिता असा ठराव मंजुर त्यानुसार ई निविदा राबविली सदर प्रिमियम घेवून एकूण ४ वेळा ई निविदा मागवून प्रतिसाद मिळाला नाही

- मा.स्थायी समिती ठराव क्र.६५ ,दि.१३/१२/२०१० नुसार प्रिमियम विसंगतीमुळे व निविदा प्रतिसाद मिळत नसलेने प्रशासनाने ठराव फेरसादर करावा असा निर्णय झाला.
- मा.स्थायी समिती सभा क्र.०२ ठराव क्र.४, दि.१३/०४/२०१२ नुसार प्रिमियम २.० कोटी + ५० लक्ष रस्त्याकरिता असा ठराव प्राप्त ४, वेळा विविध ई निविदा प्रक्रिया राबवून प्रतिसाद मिळाला नाही
- मा.महासभा ठराव क्र.४९ दि.१५/०३/२०१३ अन्वये नेहरू मार्केट मनपा मार्फत बांधण्यात यावे त्याकरिता जिल्हा नियोजनकडून अर्थ सहाय्य मिळवावे किंवा कर्ज उभारावे. सर्व समावेशक नगरसेवक व कृती समितीपैकी एक यांची महापौर यांचे अधिकारात समिती गठीत करण्यात यावी असा ,ठराव झाला.
- मा.महासभा ठराव क्र.०२ दि.५/०७/२०१४ चे अर्थसंकल्पीय ठरावामध्ये विषयंकित संकुल उभारणेकामी निविदा तात्काळ मागविण्यात यावी व खाजगीकरणातून प्रतिसाद न मिळाल्यास मनपामार्फत उभारावा असा ठराव
- दि.१२/०२/२०१५ रोजी मा.नगररचनाकार यांनी जमीनीचे मुल्यांकन (प्रिमियम नव्हे)रु.२.२४ कोटी इतके केले होते. ई निविदा क्र.४९,२७०,३४३ व ५०२ ला वेळोवेळी ८ वेळा निविदा मागवून प्रतिसाद मिळाला नाही
- खाजगी व्हॅल्युअर यांना बाजारदर निश्चितीबाबत जा.क्र.प्रकल्प २४१ दि.२५/०३/२०१५ अन्वये विचारणा केली परंतु मनपा करीता जागेचे व्हॅल्युशन देणेबाबत उदासिनता दाखवून कोणत्याही प्रकारचे व्हॅल्यूशन दिले नाही
- तद्नंतर दि.९/०१/२०१६ रोजी मा.नगररचनाकार यांनी Belting Method व्दारे जमीनीचे मुल्यांकन (प्रिमियम नव्हे) रु.२.११ कोटी कळविले व निर्णयाकरिता मा.स्थायी समितीकडे पाठविले
- तद्नतर दि.२८/०१/२०१६ नुसार नवीन दराचे मुल्यांकन (प्रिमियम नव्हे) २.२८ कोटी कळवून निर्णयासाठी मा.स्थायी समितीसमोर पाठविले
- मा.स्थायी समिती ठराव क्र.६९ , दि.२०/०२/२०१६ अन्वये नगररचनाकाराचे मुल्यांकन रु.२.२८ कोटी हेच प्रिमियम म्हणुन घेण्याचा निर्णय घेण्यात आला व रस्ता विकसित करणेकरिता रु.५० लक्षची अट रद्द करण्यात आली
- दि.१/०४/२०१६ चे मा.नगरसेवक श्री.बाळासाहेब बोराटे यांचे पत्रानूसार सुधारीत रेडीरेकनर दर मा.नगररचनाकार यांनी रू.२.४० कोटी दिले व त्यानुसार ई निविदा क्र.१३९१ प्रसिद्ध
- एफ.बी.टी.(F.B.T.) चे सर्वसाधारण वर्णन खालीलप्रमाणे

  आरक्षण क्र.२१६- भाजी मंडई व दुकान केंद्र

  एकूण क्षेत्र - १०६२.७० चौ.मी.

  F.S.I. - २

  रस्ता / चतुसिमा दक्षिण बाजु - १५.२४ मी.

  पुर्व बाजू - ६ मी.

  पश्चिम बाजू - ४.५० मी.

  मनपाने बांधावयाचे झाल्यास दि.३०/०६/२०१४ चे मे.अविष्कार ग्रुप, सावेडी यांनी दिलेले बांधकामाचे अंदाजपत्रक रू.६.२४ कोटी

  ई निविदा १३९१ करिता प्रिमियम - रु.२.४० कोटी + मनपास ७० भाजी ओटे मोफत देणे (त्यांचे क्षेत्र एफ.एस.आय.मध्ये ) + मे.कोर्टातील प्रतिज्ञापत्र नुसार काही कामे फक्त बांधकाम खर्च घेवून देणे + Basement Parking
- मनपाचा फायदा - मनपास संपुर्ण इमारत पार्किंगसह बांधून विना मोबदला हस्तांतरीत होणार आहे

  ठराविक दराने मनपास इमारतीचे क्षेत्रफळानूसार मासीक भाडे मिळणार आहे, ७० भाजी ओटे बांधुन देणार आहे म न पा चे उत्पन्न मिळाणार आहे. प्रिमियम रक्कम ३ टप्प्यामध्ये मिळणार आहे व रु.२०.०० लक्ष विकासक फी मिळणार आहे.

- दरम्यानच्या काळात मा.नगरसेवक श्री.कावरे यांनी नगरविकास विभागाकडे केलेली तक्रारीनुसार कक्ष अधिकारी यांचे पत्र जा.क्रअमपा-२०१६/प्र.क्र.४०६/नवि-२५ दि.०९/११/२०१६ अन्वये विचारणा केली असता इकडील पत्र जा.क्र.१६६६ दि.२३/११/२०१६अन्वये अहवाल देण्यात आला तद्नंतर पुनश्च वेगळया प्रकारची तक्रार पत्रानुसार कक्ष अधिकारी, यांनी दि.०२/१२/२०१६ नुसार विचारणा केली असता त्याचे अहवाल सादर करण्यात येत आहे.
- उपरोक्त संदर्भिय पत्र क्र ३ नुसार मा. शासनाने कलम ४५१(ब) अन्वये ठराव निलंबीत केलेला असलेने राबविण्यात आलेली निविदा प्रक्रीया म्हणजे ई निविदा १३९१ रद्द करणेची मागणी केलेली आहे.
- तसेच संदर्भिय पत्र क्र ४ नुसार FBT तत्वावरील निविदा प्रकियेला प्रतिसाद मिळाला परंतु देकार रकमे बद्दल वेगवेगळे मतप्रवाह असलेने इमारत महानगरपालिके मार्फत बांधणेची कार्यवाही करावी असे कळविले आहे व त्याच मताप्रमाणे सहमती श्री बाळासाहेब बोराटे यांनी संदर्भिय पत्र क्र ५ देवुन कळविले आहे.
- दरम्यान श्री.संजय झिंजे, श्री.दत्तात्रय कावरे व श्री.बाळासाहेब बोराटे यांचे दि.२१/१२/२०१६ चे निवेदन मा.महापौर, मा.आयुक्त यांना दिलेले आहे. त्याचबरोबर दि.२२/१२/२०१६ चे महासभेमध्ये देखील सदर तक्रारीचे वाचन करून सदरची एक प्रत श्री.दत्तात्रय कावरे व श्री.बाळासाहेब बोराटे नगरसेवक यांनी मा.महापौर व मा.आयुक्त यांना देण्यात आलेली आहे. यामध्ये प्रामुख्याने प्रिमियम निश्चीतीबाबत महाराष्ट्र मनपा अधिनियम कलम७९ (क) नुसार निर्णयाची तक्रार केली आहे. तसेच तक्रारीसमवेत ROHIDARCH & ASSOCIATES, M.G.road , Camp पुणे ४११००१ मो.नं.९८५०६४८९७६ यांनी Valuating रु.९.२६ कोटी असे कळविलेले प्रत सोबत जोडलेली आहे. तसेच मनपाचा आर्थिक हिताचा योग्य निर्णय होणे कामी चर्चाकरिता विषय मा.महासभेकडे सादर करण्याचे कळविलेले आहे. त्यामध्ये अर्जदार एकूण २३ असून त्यापैकी १ माजी नगरसेवक + १ वकील + १ सामाजिक कार्यकर्ता + २ स्विकृत नगरसेवक + १८ नगरसेवकांचे स्वाक्षरींचा समावेश आहे. त्यामुळे सदरील अर्जाबाबत देखील निर्णय होणे अपेक्षित आहे.

तसेच तक्रारदारांपैकी एक श्री संजय झिंजे व इतर यांनी वरील सर्व मुद्दे घेवुन मा.उच्च न्यायालयामध्ये औरंगाबाद खंडपीठात PIL ७५/२०१६ व WP५७५०/२०१६ या याचीका २ वेळा म्हणजेच दिनांक २४/१०/२०१६ व २२/११/२०१६ च्या अंतरीम आदेश दिला त्यामध्ये महानगरपालिकेने वेळोवेळी प्रतिज्ञापत्र सादर केली व त्यानुसार दिनांक १५/१२/२०१६ रोजी दोन्ही याचीकेचा निर्णय लागला आहे.

दरम्यान ई निविदा १३९१ ला मिळालेल्या प्रतिसादाला निविदा मान्यता घ्यावयाची कार्यवाही प्रगतीत असतांना दिनांक ४/१/२०१६ चा शासन निर्णयान्वये महाराष्ट्र म्न.पा अधिनियम कलम ४५१ /(१) अन्वये च्या निलंबनामुळे पुढील कार्यवाही करण्यात आली नाही.

त्यानुसार कक्ष अधिकारी यांचे दिनांक २/१२/२०१६ चे पत्रातील रिपोर्टला फेर सादर करतांना खालील मुद्यांचे बदल करणे योग्य वाटते .

| अ. नं. | मुद्दे | खुलासा |
|---|---|---|
| १ | सिटी सर्व्हे नं २०८ हि नेहरु मार्केटची जागा चितळेरोड येथे असुन सदर लोकेशन अहमदनगर येथील अत्यंत मोक्याच्या ठिकाणी आहे व सदर जागेसंदर्भात २FSI आहे. सदर जागा विकसित करणे बाबत FBT तत्वावर विकसित करणे कामी विकासकाला देण्याचे दि.२०/२/२०१६ रोजी स्थायी समितीने ठराव मंजुर केला आहे. | सदर बाबत मा, महासभा ठराव क्रमांक २१ दिनांक १०/८/२००९ अन्वये नेहरु मार्केट सि.स. नं २०८ या जागेवर FBT तत्वावर भाजीमंडई सह व्यापारी संकुल उभारणे बाबत ठराव पारीत करण्यात आलेला आहे त्यामुळे सदरचे ठिकाणी भाजीमंडई व व्यापारी संकुल बाबत धोरणात्मक निर्णय सर्वसाधारण सभेत घेण्यात आलेला आहे. |

| | | |
|---|---|---|
| २ | Maharashtra Municipal Corporation Act चे कलम ७९ ( ब) प्रमाणे स्थायी समितीला फक्त रक्कम रुपये ५०००/- पर्यंत मुल्य असलेल्या मिळकतीबाबत विक्री किंवा प्रिमियमची रक्कम रुपये ५०,०००/- पर्यंत असलेल्या मिळकती भाड्याने देण्याचा निर्णय घेण्याचा हक्क आहे. त्यामुळे सदर सिटी सर्व्हे नं २०८ हि नेहरु मार्केटची मिळकत विकसित करण्याचा व त्याकामी प्रिमीयमची रक्कम ठरविण्याचा स्थायी समितीला कुठलाही कायदेशीर हक्क व अधिकार नव्हता व नाही , कारण सदर जागेचे मुल्य खुप मोठ्या प्रमाणात आहे. | सर्व्हे नं २०८ हि नेहरु मार्केट या जागेवर FBT तत्वावर भाजी मार्केट व व्यापारी संकुल विकसित करणे बाबत धोरणात्मक निर्णय Maharashtra Municipal Corporation Act १९४९ चे कलम ,७९ ( क) अन्वये महासभेस अधिकार आहेत त्या तरतुदी नुसार मा. महासभा ठराव क्रमांक २१ दिनांक १०/८/२००९ अन्वये मान्यता घेण्यात आली आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात आलेली आहे. व सदर बाब मा. उच्च न्यायालयाचे निदर्शनास आलेली आहे . |
| ३ | Maharashtra Municipal Corporation Act चे कलम ७९ ( क) प्रमाणे सदर मिळकत विक्री किंवा भाड्याने देण्याचा अधिकार फक्त महासभेला आहे, कारण सदर जागेचे मुल्य खुप मोठ्या प्रमाणात आहे. तसेच Maharashtra Municipal Corporation Act चे कलम ७९ (ड) प्रमाणे महानगरपालिकेच्या मिळकतीबाबत प्रिमियम निश्चित करतेसमयी चालु प्रचलीत बाजार भावाप्रमाणे प्रिमियम किंमत निश्चित करणे आवश्यक आहे. | Maharashtra Municipal Corporation Act चे कलम ७९ ( क) प्रमणे सदरचे अधिकार महासभेला आहे त्यानुसारच मा, महासभा ठराव क्रमांक २१ दिनांक १०/८/२००९ अन्वये कार्यवाही करणेत आली आहे.मिळकतीचे मुल्यांकन महानगरपालिकेचे नगररचनाकार यांनी सन २०१६ च्या रेडीरेकनर नुसार जागेचे मुल्यांकन केले आहे. बाजार मुल्याबाबत खाजगी व्हॅल्युअर जानं २४१ दिनांक २५/३/२०१५ अन्वये कळविले परंतु कोणत्याही खाजगी व्हॅल्युअर यांनी त्यास प्रतिसाद दिला नाही शेवटी महानगरपालिकेचे नगररचनाकार यांनी प्रीमीयम बाबतचे कार्यवाही करणेचे ठरले त्यानुसार त्यांनी रेडीरेकनर नुसार जमीनीचे मुल्यांकन रु.२.२८ कोटी (प्रिमीयम नव्हे ) असे कळविले व त्यास मा. स्थायी समीतीने ठराव ५९ दिनांक २०/२/२०१६ अन्वये मान्यता दिली व त्यानंतर देखील सुधारीत रेडिरेकनर २०१६-२०१७ चे दर वापरुन जमीनीचे मुल्यांकन रु.२.४० कोटी काढुन प्रिमीयम साठी ती रक्कम आधारभुत धरुन ई -निविदा राबविण्यात आली. |
| ४ | सदर सिटी सर्व्हे नं २०८ हि नेहरु मार्केट जागेची प्रचलित बाजार भावाप्रमाणे किंमत रुपये ९,२६,७८,०००/- आहे. | सदर बाब दिनांक २/१२/२०१६ चे तक्रारी सोबतच्या पत्रामध्ये नमुद नव्हती परंतु मा महासभेमध्ये मा. नगरसेवक श्री बाळासाहेब बोराटे, श्री दत्तात्रय कावरे व इतर यांनी दिलेल्या पत्रासोबत रु. ९.२६ कोटीच बाजारमुल्य अंकगणितीय अहवाल दिलेला आहे. तथापि सदर मूल्यांकन अहवालाचे अवलोकन केले असता विचारात घेतलेल्या दराचा आधार नमूद नाही. |
| ५ | परंतु सदर जागेची किंमत स्थायी समितीने रुपये २,२८,६०,८३७/- निश्चित केली आहे व सदर मिळकत विकसित करणेकामी विकासकाकडुन प्रिमियम ची रक्कम रुपये २,२८,६०,८३७/- घेण्याचा ठराव मंजुर केला आहे. | मा. स्थायी समीतीने ठराव क्रमांक ६९ दिनांक २०/२/२०१६ अन्वये प्रिमियम रक्कम रु.२,२८,६०,८३७/- निश्चित केलेली आहे तदनंतर २०१६ रोजी नविन रेडिरेकनर नुसार नगररचनाकार यांनी जागेचे मुल्यांकन रु.२,४०,००,०००/- इतके केले आहे व सदरची रक्कम आधारभुत रक्कम धरुन निविदा मागविण्यात आलेली आहे. |

| | | |
|---|---|---|
| ६ | सदर स्थायी समीतीच्या ठरावामुळे महानगर पालिकेचे सुमारे रुपये ७,००,००,०००/- चे आर्थिक नुकसान होईल व त्यामुळे महानगरपालिकेचे कधीही भरुन न येणारे आर्थिक नुकसान होईल. | महानगरपालिके मार्फत यापुर्वी ढोबळ पध्दतीने काढण्यात आलेलेरु. ४.५० कोटी रक्कम आधारभुत धरुन व रु.२ कोटी रक्कम देखील वेळोवेळी ४ वेळेस ई - निविदा काढण्यात आलेली आहे परंतु सदर निविदेस कोणताही प्रतिसाद मिळाला नाही व विविध शासकीय योजनेतुन त्याचबरोबर जिल्हानियोजन मधुन निधि उपलब्ध झाला नाही त्यामुळे मा. महासभा ठराव क्रमांक २ दिनांक ५/७/२०१४ अन्वये नेहरु मार्केट करीता खाजगी करणाच्या माध्यमातुन तात्काळ निविदा मागविण्याची कार्यवाही करण्यात यावी व त्यास प्रतिसाद न मिळाल्यास महानगरपालिके मार्फत सदरचा प्रकल्प उभारला जाईल, असा ठराव पारीत करण्यात आला.त्यानुसार महानगरपालिका नगररचनाकार यांचे मार्फत चालु रेडीरेकनर नुसार त्यांचे मुल्यांकन काढुन ई-निविदा मागविण्यात आली. यामध्ये विकासकामार्फत महानगरपालिकेस ७० भाजी ओटे विनाशुल्क बांधुन देणार आहे व सदर ठिकाणी विस्थापीत झालेल्या गाळे धारकाचा केवळ बांधकामाचा खर्चा इतके मुल्य घेवुन गाळे विकासकामार्फत प्राधान्याने देणार आहे.सदर प्रकल्पा बात मा.उच्य न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे दावा चालु आहे दिनांक १५/१२/२०१६ रोजी दाव्याचा निर्णय लागल्याने ई- निविदा १३९१ चा व्यापारी लिफाफा उघडलेला आहे यामध्ये सर्वाधिक प्रिमियम धारक मे.ए.सी.कोठारी. अहमदनगर यांची निविदा रु. २.५१ कोटी इतकी आहे. तक्रारदारानुसारच्या किंमतीनुसार रक्कम कमी असली तरी प्रशासकिय किंमत रु. २.४० कोटी पेक्षा जास्त आहे. |
| ७ | तसेच सन २०१० साली ता १०/१२/२०१० रोजी मंजुर झालेल्या ठरावामध्ये रुपये ४,५,००,०००/- प्रिमियमची रक्कम निश्चित करण्यात आली होती मात्र सन २०१६ साली प्रिमियमची रक्कम रुपये २,२८,६०,८३७/- निश्चित करण्यात आलेली आहे. वास्तविक पाहता जागेच्या किंमती दिवसेंदिवस वाढत असतांना परंतु सदर नेहरु मार्केटच्या जागेबाबत उलट प्रिमियमची रक्कम सहा वर्षानंतर कमी करण्यात आलेली आहे. सदरची बाब हि नैसर्गिक न्याय तत्वाला धरुन मुळीच नाही. | यापुर्वी सदरच्या प्रकल्पासाठी ठरविण्यात आलेली प्रिमियम रु. ४.५० कोटी ही ढ़ोबळ स्वरुपात काढण्यात आलेली होती .सन २०१६ साली महानगरपालिकेचे नगररचनाकार यांनी शासनाच्या मुल्यांकन २.४० कोटी केलेले आहे व तीच प्रिमीयम रक्कम म्हणुन मा. स्थायी समीतीने निश्चित केलेली आहे. |
| ८ | सध्याच्या स्थितीत महानगरपालिकेची आर्थिक स्थिती अत्यंत नाजुक व बिकट आहे व त्यामुळे कर्मचा-यांचे सुमारे २ महिन्याचे पगार थकलेले आहे. त्यामुळे सदर महानगर पालिकेच्या मालकीच्या जागा कवडीमोल भावात विकसित करण्यास दिल्यास महानगरपालिकेचे खुप मोठे आर्थक नुकसान आहे व त्यामुळे महानगरपालिकेचे उत्पन्नाचे स्त्रोत्र कमी होण्याची दाट शक्यता आहे. | सदरची जागा FBT च्या माध्यमातुन विकसीत करण्यात आले नंतर महानगरपालिकेस किमान रु२.४० कोटी इतका प्रिमियम प्राप्त होणार आहे. अधिकार महानगरपालिकेस ७० भाजी ओटे बांधुन मिळणार आहेत. विस्थापित गाळे धारकांचे विकासकामार्फत प्राधान्याने पुर्नवसन करण्यात येणार आहे तसेच महानगरपालिकेस रु.७.००.प्रति चौ मी. या प्रमाणे संकुलामधील भाडेक-याकडुन भाडे मिळणार आहे तसेच सदरचा प्रकल्प विकसित करणेबाबत प्रोजेक्ट डेव्हलपमेंट फंड रु.२० लाख महानगरपालिकेस विकासकाकडुन प्राप्त होणार आहे. या व्यतिरीक्त ७० भाजी ओट्याचे डिपॉजीट व भाडे महानगरपालिकेस उत्पन्नापोटी प्राप्त होणार आहे. |

| | | |
|---|---|---|
| ९ | विमुद्रिकरणमुळे सध्या महानगरपालिकेकडे सुमारे कर वसुलीपोटी रक्कम रुपये ११,००,००,०००/- जमा झाली असुन त्यामधुन महानगरपालिकेने नेहरु मार्केट बांधणेकामी आर्थिक तरतुद केल्यास सदर प्रकल्प महानगरपालिकेस स्वतः बांधणे शक्य होईल व त्यामुळे सर्व बांधकामाचा खर्च वजा जाता महानगरपालिकेस सुमारे रक्कम रुपये १३,००,००,०००/- ते १५,००,००,०००/- चा निव्वळ आर्थिक लाभ होईल कारण सदर प्रकल्प उभारणी कामी २FSI प्रमाणे २३०००.०० चौरस फुट बांधकाम होईल व सदरचे सर्व बांधकाम वानिज्य बांधकाम होईल. | मा.महासभा ठराव क्रमांक २, दिनांक ५/७/२०१४ अन्वये नेहरु मार्केट सि.स.नं २०८ या ठिकाणी भाजी मंडईसह व्यापारी संकुल उभारणे बाबत FBT तत्वावर निविदा मागविण्यात आलेली आहे.सदर निविदेस प्रतिसाद प्राप्त झालेला आहे. |
| १० | तसेच बुरुडगांव रोड येथील अहमदनगर महानगरपालिकेच्या जागेवर अशाच प्रकारचे भाजी मार्केट व व्यापारी गाळे संकुल बांधण्यात आलेले आहे व त्यामध्ये देखील विकासकाकडुन घेण्यात आलेली प्रिमियमची रक्कम कमी करण्यात आलेली होती व त्यामुळे लेखापरीक्षा अहवाल वर्ष २०११-२०१२ नुसार सदर प्रकल्पा संदर्भात रक्कम रुपये ६,६१,००,००/- ची वसुली निघालेली आहे. त्याच प्रमणे नेहरु मार्केट विकसित करणेकामी देखील प्रिमियमची रक्कम कमी करण्याचा स्थायी समीतीने बेकायदेशीर निर्णय घेतलेला आहे. | बुरुडगांव भाजी मार्केट व व्यापारी संकुल बांधणे बाबत लेखापरीक्षण सन २०११-२०१२ मध्ये आक्षेप क्रमांक १५ अन्वये अधिमुल्य कमी करणे रु ६,६१,२८,०००/- इतके म .न पा. चे. आर्थिक नुकसान झाले बाबतचा आक्षेप घेण्यात आला होता. परंतु त्या बाबत अनुपालन सादर करुन आक्षेप वगळण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. सदरचा आक्षेप पब्लिक ऑडीट कमेटीकडे पाठविण्यात आलेल्या परिच्छेदामधुन वग़ळण्यात आलेला आहे. |
| ११ | Maharashtra Municipal Corporation Act चे कलम ७९ मधील नमुद तरतुदी प्रमाणे सदरचा स्थायी समीतीने मंजुर केलेला ठराव हा पुर्णपणे बेकायदेशीर आहे त्यामुळे सदरचा ठराव महानगरपालिकेच्या आर्थिक हिताच्या दृष्टीने विखंडीत होणे आवश्यक आहे. | सिटी सर्व्हे नं २०८ या ठिकाणी FBT तत्वावर भाजी मंडई व व्यापारी संकुल विकसित करणे बाबत प्रतीवास Maharashtra Municipal Corporation Act १९४९ चे कलम ७९ मधील तरतुदी प्रमाणे मा. महासभा ठराव क्रमांक २१ दिनांक १०/८/२००९ अन्वये प्रशासकीय मान्यता घेण्यात आली आहे. सदरचे जागेचे मुल्यांकन नगररचनाकार यांनी सन २०१६ चे रेडीरेकनर नुसार केले आहे. सदर प्रस्तावास मा. स्थायी समीती ठराव क्रमांक ६९ दिनांक २०/२/२०१६ अन्वये मान्यता घेण्यात आली असुन त्यानुसार निविदा मागविण्यात आलेल्या आहेत. सदरची बाब मा. उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठामध्ये PLI७५/२०१६ व WP७५०/२०१६ मध्ये दावा चालु होता. सदर दाव्यामध्ये वरील सर्व बाबी निदर्शनास आलेल्या आहे व त्याचा विचार करता सदरची जनहित याचीका मा. उच्च न्यायालयाने अनुक्रमे याचीका दिनांक १३/१२/२०१६ निर्णय लागलेला आहे. प्रत सोबत जोडत आहे. |

| | | |
|---|---|---|
| १२ | महानगरपालिकेचे आर्थिक हित जपणेकामी ता २०/२/२०१६ रोजी स्थायी समीतीने मंजुर केलेला ठराव विखंडित होणे आवश्यक आहे व त्यानुषंगाने सदरचा ठराव विखंडीत करणेकामी आदेश करण्यात यावा हि विनती. | या बाबत मा. शासनाने योग्य ते निर्णय होणेस विनंती करणे योग्य वाटते. |

वरील प्रमाणे दिनांक २/१/२०१६ चे पत्राला सोबत प्रमाणे अहवालात बदल करुन तसेच महाराष्ट्र म न पा अधिनियम ७९(ड) व ७९ (क) व बाजारमुल्य रक्कम रुपये ९.२६ कोटीच्या अभिप्रायाबाबत सक्षम प्राधकरणाचे मत घेवुन मा. शासनाचे दिनांक २/१/२०१६ चे पत्रास उत्तर पाठविणेस अवलोकनार्थ तथा आदेशार्थ सादर.

यावर शहर अभियंता यांचा अभिप्राय की, अहवाल अवलोकनार्थ व आदेशास्तव सादर.

यावर उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, यशस्वी विकासकाने बांधून द्यावयाचे उक्त नमूद भाजी ओटे व पुनर्वसनासाठीची दुकाने यामुळे उपलब्ध २ एफएसआय बराचसा वापरला जाणार आहे. तसेच यापुढे उपलब्ध वाणिज्य क्षमता तशाच प्रमाणात वापरली जाणार असून तपासून विकासकास काहीही लाभ नाही.

उक्त नमुद मुद्दा याठिकाणी समाविष्ट करणे तसेच केलेल्या दुरुस्तीसह अहवाल मान्यतेस्तव सादर.

यावर मा.अति.आयुक्त साहेब, यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

यावर मा.आयुक्त साहेब, यांचा अभिप्राय की, दिनांक २ डिसेंबर २०१६ चे पत्रास अनुसरुन आतापर्यंत वस्तुस्थितीदर्शक अहवाल शासनास तातडीने पाठवावा. कुठल्याही परिस्थितीत विलंब करु नये तसेच दिनांक ०४ जानेवारी २०१७ रोजीचा मा.शासनाने पारीत केलेला सदर विषयाबाबतचा शासन निर्णय मा.स्थायी समिती व मा.महासभेच्या निदर्शनास आणणेची कार्यवाही करावी.

**चर्चा :-**

**मा.श्री.कुमार वाकळे :-** आम्हाला जी टिप्पणी दिली त्यात जो मजकूर वाचला तो नाही.

**नगरसचिव :-** मुळ फाईलला आहे.

**मा.अति.आयुक्त श्री.वालगुडे :-** टिपणी सर्वांना दिलेली आहे. त्यांनी टिप्पणी सभागृहात आणायला पाहीजे होती.

**नगरसचिव :-** नगरसचिव विभागाकडे ज्या विभागाकडुन शॉर्ट टिपणी दिली जाते तीच टिप्पणी आपण अजेंडया सोबत जोडुन पाठवतो.

प्रस्तावाचे वाचन करण्यांत आले.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** दिनांक १६/१०/२०१८, सन २००१ चा ठराव वाचला. ठराव क्रमांक ६९ दिनांक २०/०२/२०१६ चा ठराव विखंडीत झाला तर या गोष्टी आम्हाला का सांगता. महानगरपालिका २००३ ला झाली. २०१६ चा ठराव विखंडीत केल्यानंतर पूर्वीचे ठराव अस्तीत्वात आहे का. खालचा विखंडीत झाला तर वरचा ॲटोमॅटीक विखंडीत होतो. २०१६ ला शासनाने ठराव विखंडीत केल्यानंतर पुन्हा मांडायची गरज काय. आत्ताची पार्श्वभूमीच्या ठरावाची काही नाही. नविन रेडीरेकनरने रेट का काढले नाही. २००१ पासून हिस्ट्री लिहली आता रेट का नाही. रेडीरेकनरने आले नाही.

**शहर अभियंता श्री.सोनटक्के :-** १२ जून २०१७ चा हा विषय विखंडीत झाला आहे.

**नगरसचिव :-** हा प्रस्ताव प्रशासनाकडून पीठासीन अधिका-याकडे पाठवतो आमची सही वगैरे नसते. मा.अधिकारी यांचे स्वाक्षरी होवून पिठासीन अधिकारी यांचे सही नंतर प्रस्ताव नगरसचिव विभागाकडे येतो. तद्नंतर मा.महापौर अहमदनगर महानगरपालिका यांचेकडुन महासभेपुढे विषय घेणे असा शेरा असतो. त्याप्रमाणे माझे काम विषय घेण्याचे आहे.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** सध्याचे रेडीरेकनर रेट किती व किती पैसे मिळणार आहेत.

**शहर अभियंता श्री.सोनटक्के :-** २०१४ साली किंमत ६ कोटी २० लाख होते.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** आता महानगरपालिकेने केली तर किती रक्कम खर्च येईल.

**शहर अभियंता श्री.सोनटक्के :-** ७ ते ७.५ कोटी खर्च येईल. नविन डीएसआर नुसार एस्टीमेट करावे लागेल. महानगरपालिकेने जर बांधायचे असते तर एस्टीमेट काढावे लागेल.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** चुकीच्या पध्दतीने विषय घेतला.

**मा.श्री.सुवेंद्र गांधी :-** महापौर साहेब तुम्ही यांच्यावर कारवाई करा. सभागृहाची दिशाभुल केली.

**शहर अभियंता श्री.सोनटक्के :-** आपण एफबीटी चा प्रस्ताव दिला.

**मा.अति.आयुक्त श्री.वालगुडे :-** हा प्रस्ताव विखंडीत केला हे महासभेच्या निदर्शनास आणावे लागेल. शेवटचे दोन पॅरा वाचल्यानंतर लक्षात येईल आम्ही एफ.बी.टी. किंवा बीओटी वर करायचे ते आम्ही सांगीतले नाही. दुसरामुद्दा अप्रत्यक्ष असा तोटा चालू आहे. जोपर्यंत धोरण निश्चित होत नाही. तोपर्यंत मार्केट विभागाकडून शॉर्ट ई निविदा पार्किंग यासाठी प्रक्रीया राबवावी लागेल.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** अगोदर सविस्तर माहिती द्या.

**मा.श्री.सचिन जाधव :-** एफबीटी ने घ्यायचे का बीओटी ने घ्यायचे ते ठरवा. एस्टीमेट सादर करा.

**मा.श्री.किशोर डागवाले :-** पार्किंगचे नियोजन चुकीचे आहे. जे रोडवर भाजीवाले बसतात त्यांना आत बसायला सांगा त्यांचे मार्केटमध्ये गाळे होते. त्यांना आत बसण्यास परवानगी द्या उद्या पासुन सुरवात करा.रस्त्यावर चालणे मुश्कील आहे.

**मा.श्री.अभिषेक कळमकर :-** चितळेरोड हातगाडी विक्रेते संघटना यांनी १ तारखेला आयुक्तांना निवेदन दिले आहे. त्यात सर्व मुद्दे समाविष्ट केले आहे. तिथे वाहनतळ निश्चीत करतो. पार्किग रहाण्याकरीता ती मान्य करावी व ती दुसरीकडे निश्चीत करावी.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** पे अ‍ॅण्ड पार्किंगची जाहीरात वृत्तपत्रात आली. त्याला मा.महासभेची मान्यता घेतली का.

**मा.श्री.अभिषेक कळमकर :-** ढगे साहेबांच्या काळातील अभिप्राय वाचन केले. प्रशासनाशी निगडीत सर्व नस्ती आहे. स्टॅडींग मध्ये मंजूर होते येथे तहकुब होते. शासनाकडून पत्र व्यवहार होवून विखंडीत होते.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** जागेवर जागा तेवढी भरती का तेथे वॉल कंम्पौड झालेले महानगरपालिकेचे आहे का

**मा.श्री.अभय आगरकर :-** मा सर्व सदस्यांनी सविस्तर चर्चा केली या संदर्भात सभागृहाची मानमर्यादा लक्षात घेता कायदेशीर मुद्दे उपस्थित झाले. ठराव केंव्हा झाला. विखंडीत केंव्हा झाला. परिपूर्ण असा प्रस्ताव महासभेकडे आणा प्रायव्हेट मधुन बांधकाम करा. त्यामध्ये महानगरपालिकेने हित साधायचे असे स्टेटमेंट सादर करा. जागेचे मोजमाप घेण्यात यावे. आणि तशी कार्यवाहीसह प्रस्ताव महासभेपुढे ठेवा.

**मा.महापौर मॅडम :-** सविस्तर संबंधित विभागाकडुन फेरप्रस्ताव सादर करावा. तोपर्यंत तात्पुरत्या स्वरुपात भाजीवाल्यांना तेथे बसवावे.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** पुढच्या सभेला पे अ‍ॅण्ड पार्कचा विषय महासभेत घ्या.

**मा.श्री.अभय आगरकर :-** प्रश्न विचारण्याचा अधिकार तरतुदीचे वाचन केले. जर या सभागृहात जर नियम नियमावली केली तर या तीन दिवस महासभेसाठी जो खर्च करतो सर्व सदस्यांना आवाहन करा. प्रश्नोत्तरे सदस्यांकडुन मागवा. त्या प्रश्नांची उत्तरे दिली तर हा प्रसंग उद्‌भवणार नाही. मी सभापती असतांना मी नियम दिले आहेत. किमान दोन महिनयात त्याचा फॉलोअप करावा. नियमानुसार सभागृह चालवावे. अशी सुधारणा करावी. नगरसचिवांकडे प्रश्न दिलेला नाही. ते तक्रार सचिवांना आधी कळवावे वा चर्चा आवश्यक असेल तर तशी चर्चा करावी. या सभेच्या झालेल्या खर्चास कोण जबाबदार सर्वांनी याचे चिंतन करावे.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** सभागृहातील झालेल्या खर्चाची बिले आम्ही भरण्यास तयार आहोत. दर महिन्याला सभा ठेवली तर प्रश्न उपस्थित होत नाहीत. चार-चार महिने जर सभा होत नाही. विषय आमचे खाजगी नसतात. नगरकरांचे विषय असतात. अधिका-यांना शिस्त कोण लावणार.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** महानगरपालिका सभेचे नियम बीपीएमसी ॲक्टने ठरविले आहे. लोकप्रतिनिधीला सभागृहाच्या वेळेचे बंधन नाही. ४४ सेक्शन नुसार नगरसेवक बोलणार तुम्ही प्रश्नोत्तराचा तास घेत नाही.

**नगरसचिव :-** चव्हाण साहेबांनी सांगीतलेली तरतुद बरोबर आहे.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** केव्हाही प्रश्न आम्ही उपस्थीत करु शकतो. सेक्शन ४४ शिवाय नागरिकांचे प्रश्न आम्ही उपस्थित करु शकतो. पॉलिसी करण्याचा अधिकार महासभेला आहे. एखाद्या विषयावर १५-१५ दिवस निर्णय होत नाही. मग तो काय खर्च, कायद्याची नियम पहाण्याची जबाबदारी प्रशासनाची आहे. नियम पहायची त्यांची जबाबदारी आहे. पालन करण्याची जबाबदारी पिठासीन अधिकारी व नगरसचिव यांची जबाबदारी आहे.

**मा.महापौर मॅडम :-** मोजणीसह फेरप्रस्ताव सादर करा.

**मा.श्री.अभिषेक कळमकर :-** झोपडी कॅन्टीन ते तोफखाना पोलीस स्टेशन या रोडचे काम झाले. मध्यंतरी अधिकारी यांच्या बदल्या झाल्या. प्रशासनाचा हलगर्जीपणा म्हणायचा ७४ सालची ड्रेनेज गटार आहे गेलया १५ दिवसापासून वेळोवेळी केअर टेकर, एस.आय., प्रभाग अधिकारी यांना सांगीतले. चार ठिकाणी रोड फोडला गेला १८ दिवसानंतर प्रश्न मार्गी लागला आता याची जबाबदारी कोणाची प्रभाग क्रमांक ३ चे एस.आय. सारसर यांना बोलवण्यात आले. २ दिवस ते तेथे आले आणि प्रश्न मार्गी लागला. नविन एस.आय. यांना माहिती नव्हते. जेटींग मशीन जर असती तर हा रस्ता फोडावा लागला नसता या जेटींग मशीनचा पार्ट बदलावा लागणार होता तो बदलण्यासाठी रिपोर्ट तयार असून तो पेंडींग आहे. आता या रस्त्याचे पॅचींग करावे लागणार ते करुन देणार का. बल्लाळ जी बदली केली ती चुकीची झाली त्यांना वेळोवेळी धारेवर धरले आहे.

**शहर अभियंता श्री.सोनटक्के :-** ड्रेनेज लाईन चोकअपसाठी जेटींग मशीन उपलब्ध आहे. जेटींग मशीन कायम स्वरुपी चालू असावे अशी आमची धारणा आहे. जेटींग मशीन आहे पण ते का वापरत नाही. रस्ता जर ठेकेदाराच्या चुकीमुळे खराब झाला असेल ठेकेदाराकडून दुरुस्त करावा लागेल.

**मा.श्री.अभय आगरकर :-** रस्त्याचे खड्डे पडल्यावर त्याची जबाबदारी ठेकेदाराची आहे. नगरमधील अनेक रस्ते खराब झाले पण त्याची दुरुस्ती करुन घेतलेली नाही. महापौर जेवढा रस्ता खराब झाला तेवढी पॅचींग करुन घेता येईल.

**शहर अभियंता श्री.सोनटक्के :-** डब्ल्यु.बी.एम. व कारपेट या पध्दतीने करुन घेतले जाईल.

**मा.श्री.अभिषेक कळमकर :-** मोकाट कुत्र्याचे २ वेळा वेगळे प्रसंग आहेत. मोकाट कुत्र्यामुळे लहान बालकांवर प्रसंग ओढावला आहे. बोरगे हजर नाहीत. म्हसे हजर नाहीत. अधिकारी येथे उपस्थीत नाही त्यांचेवर कारवाई करा. श्वान निर्बिजीकरण प्रकल्प चालू आहे का.

**मा.अति.आयुक्त श्री.वालगुडे :-** आरोग्य अधिकारी यांचेकडे विषय आहेत म्हसेकडे हे कामकाज आहे. म्हसेंचा निलंबीतचा प्रस्ताव मी दिला आहे. येथे उपस्थीत नाही. आस्थापना विभागाने कारवाई करावी.

**मा.श्री.अभिषेक कळमकर :-** ६०-७० लाख खर्च निर्बिजीकरणावर होतो. टंचाई असतांना खर्च झालेला आहे. अधिका-यांचे रजेचा अर्ज आपण घेता येथे उत्तर कोण देणार. अति.आयुक्त पिठासीन अधिकारी यांची परवानगी घेवून ते रजेवर गेले आहेत. म्हसे, बोरगे त्यानंतर उपायुक्त हे माहिती देवू शकतील का.

**मा.महापौर मॅडम :-** डॉ.बोरगे हे काही कामा निमित्त, मिटींगसाठी औरंगाबादला गेले आहेत.

**मा.श्री.अभिषेक कळमकर :-** किती श्वानांची नसबंदी करण्यात आली. कुणाच्या निगराणी खाली निर्बिजीकरण प्रक्रीया चालू आहे. चार प्रभाग अधिकारी यांच्या अखत्यारीत निर्बिजीकरण चे काम चालू आहे का.

प्रभाग निहाय बंदीस्त वाहन १ चार प्रभाग निहाय कर्मचारी उपलब्ध करुन दिले आहे. प्रभाग निहाय वाहन क्रमाक उपलब्ध करुन दिले त्याचे क्रमांक वाचन केले.

यामध्ये आमच्या राष्ट्रवादी युवा संघटनेच्या कार्यकर्त्यांनी १९ जुन रोजी सूचीत केले. ऑपरेशन क्लनीक या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसवा. यासाठी आपण खर्च करतो. एक हेल्पर, डिझेल इत्यादी साठी लागतो. शस्त्रक्रीया व्यवस्थीत पार पडलेली नाही. यासाठी एकदा पुणे येथे महानगरपालिकेचे केंद्रावर योग्य रितीने काम होत नसल्याने महापौरांनी संबंधितास निलंबीतचे आदेश दिले व आयुक्तांनी आदेश काढले.

श्वान निर्बीजीकरण खाद्य ३०० रुपये , ३१० रुपये ऑपरेशन वर आत्ताच्या चालू वर्षी १८०० रुपये श्वान का देण्यात येते एवढी तफावत या महिन्यात का आली. वर्षाचे ६४,८००/- होतात १० कुत्र्यांचे होतात. यावर्षी हा दर कसा देण्यात आला. नागरिकांच्या घामाचा पैसा असाच उधळला जाणार.

**मा.महापौर मॅडम :-** उत्तर द्यायला जे अधिकारी पाहीजे ते यथे नाही.

**मा.श्री.अभिषेक कळमकर :-** इम्पीरियल हॉटेल समोर ५०-५५ रुपयांत हे काम होते. काम फक्त ६०० चे आहे. १२०० रुपये खर्च कशा कशासाठी मग हा भ्रष्टाचार कशासाठी.

**मा.महापौर मॅडम :-** ते अधिकारी आले की माहिती घेवून कारवाई करु प्रशासनाने माहिती घ्यावी. आता सध्या काम बंद केले आहे. परत कुत्र्याचा प्रश्न निर्माण होईल. तुम्हाला जे काही कागदपत्र द्यायचे ते द्या.

**मा.अति.आयुक्त श्री.वालगुडे :-** ओपन टेंडर भरण्यास संधी होती. विभाग प्रमुख उपस्थित नसल्याने व्हेग माहिती मी देवू शकत नाही. अतिरिक्त आयुक्त म्हणुन आस्थापना व बदल्या माझ्याकडे येत नाही. पिठासीन अधिकारी यांना मी विनंती केली तुम्ही माहिती घ्या व बैठक घ्या.

**मा.महापौर मॅडम :-** २-३ दिवसात याबाबत मिटींग लावू प्राणी संघटनेचे नियम नव्याने आले आहेत जिथुन उचलले तेथेच सोडावे लागतात.

**मा.श्री.अभिषेक कळमकर :-** कडक कारवाई अपेक्षित आहे.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** आमचे वॉर्डातील कुत्र्यांना रॅबीज आलेले आहे.

**मा.श्री.विजय गव्हाळे :-** म्हसेंना माझे वॉर्डातील किती कुत्रे पकडले याची विचारणा केली तर त्यांनी १० कुत्रे पकडले सांगीतले. आमच्या कार्यकर्त्यांना विचारले तर दोन कुत्रे पकडलेची माहिती दिली.

**मा.महापौर मॅडम :-** ८ तारखेला शिक्षकांची मिटींग घेवू. श्वान निर्बिजीकरण ९ तारखेला मिटींग लावा.

---*---

**ठराव :-**

ऑफीस रिपोर्ट व महासभेत झालेल्या चर्चेनुसार सर्व्हे नंबर २०८ या नेहरुमार्केटच्या जागेवर भाजी मंडई व व्यापारी संकुल एफबीटी तत्वावर बांधणे कामी प्रशासनाने सविस्तर फेरप्रस्ताव तयार करणे बाबत पुढील योग्य ती कार्यवाही करावी. यास ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सूचक - मा.श्री.गणेश खंडेराव कवडे,

अनुमोदक - मा.श्री.सचिन तुकाराम जाधव,

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.